नागपूर महानगरपालिकेच्या दि.20.06.2017 मंगळवार रोजी सकाळी 12.30 वाजता राजे रघोजीराव भोसले नगर भवन, महाल येथे भरलेल्या स्थगित सर्वसाधारण सभेचे कार्यवृत्त

## उपस्थित सदस्य

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|---|---|
| 1. | **37** | **क** | **नंदा शरद जिचकार** | **महापौर** |
| 2. | **20** | **ड** | **दिपराज भैय्याजी पार्डीकर** | **उपमहापौर** |
| 3. | 1 | अ | महेन्द्रप्रसाद रमेश धनविजय | सदस्य |
| 4. | 1 | ब | सुषमा संजय चौधरी | सदस्या |
| 5. | 1 | क | प्रमिला प्रितम मंथरानी | सदस्या |
| 6. | 1 | ड | विरेन्द्र उर्फ विक्की घनश्यामदास कुकरेजा | सदस्य |
| 7. | 2 | अ | भावना संतोष लोणारे | सदस्या |
| 8. | 2 | ब | दिनेश बसंतलाल यादव | सदस्य |
| 9. | 2 | क | नेहा राकेश निकोसे | सदस्या |
| 10. | 2 | ड | मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |
| 11. | 3 | अ | परसराम काशीनाथ मानवटकर | सदस्य |
| 12. | 3 | ब | गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| 13. | 3 | क | भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| 14. | 3 | ड | खान नसीम बानो मो. इब्राहिम | सदस्या |
| 15. | 4 | अ | निरंजना महेश पाटील | सदस्या |
| 16. | 4 | ब | शेषराव शंकरराव गोतमारे | सदस्य |
| 17. | 4 | क | मनिषा चक्रधर अतकरे | सदस्या |
| 18. | 4 | ड | राजकुमार पुनाराम साहु | सदस्य |
| 19. | 5 | अ | दुर्गा चंद्रभुषण हत्तीठेले | सदस्या |
| 20. | 5 | क | अभिरूची अनिल राजगिरे | सदस्या |
| 21. | 5 | ड | संजय अरूणराव चावरे | सदस्य |
| 22. | 6 | अ | जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| 23. | 6 | ब | वंदना राजू चांदेकर | सदस्या |
| 24. | 6 | ड | मो. इब्राहिम तौफीक अहमद | सदस्य |
| 25. | 7 | अ | विरंका मुरलीधर भिवगडे | सदस्या |
| 26. | 7 | क | मंगला योगीराज लांजेवार | सदस्या |
| 27. | 7 | ड | संदीप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| 28. | 8 | अ | आशा नेहरू उईके (आयेशा) | सदस्या |
| 29. | 8 | ब | अंसारी सय्यदा बेगम मो.निजामुद्दीन | सदस्या |
| 30. | 8 | क | जिशानमुमताज मो. इरफान अंसारी | सदस्या |
| 31. | 9 | अ | स्नेहा विवेक निकोसे | सदस्या |
| 32. | 9 | ब | संजय श्यामराव बुर्रेवार | सदस्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 33. | 9 | ड | नरेन्द्र नत्थुजी वालदे | सदस्य |
| 34. | 10 | अ | साक्षी विपीन राऊत | सदस्या |
| 35. | 10 | ब | रश्मि निलमनी धुर्वे | सदस्या |
| 36. | 11 | अ | संदिप चंद्रभान जाधव | सदस्य |
| 37. | 11 | ब | संगीता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 38. | 11 | क | अर्चना विवेक पाठक | सदस्या |
| 39. | 12 | अ | दर्शनी स्वानंद धवड | सदस्या |
| 40. | 12 | क | हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |
| 41. | 12 | ड | जगदीश शिवदास ग्वालबंशी | सदस्य |
| 42. | 13 | अ | अमर हरीष बागडे | सदस्य |
| 43. | 13 | क | परिणिता परिणय फुके | सदस्या |
| 44. | 13 | ड | वर्षा जयंत ठाकरे | सदस्या |
| 45. | 14 | अ | शिल्पा इशांत धोटे | सदस्या |
| 46. | 14 | ब | प्रमोद ताराचंद कौरती | सदस्य |
| 47. | 14 | क | कमलेश दिलीप चौधरी | सदस्य |
| 48. | 15 | अ | सुनिल दुलीचंद हिरणवार | सदस्य |
| 49. | 15 | ब | उज्वला प्रकाश शर्मा | सदस्या |
| 50. | 15 | क | रूपा शेखर राय | सदस्या |
| 51. | 15 | ड | संजय अनंत बंगाले | सदस्य |
| 52. | 16 | अ | लखन सुमेरा येरवार | सदस्य |
| 53. | 16 | ब | वनिता सुनिल दांडेकर | सदस्या |
| 54. | 16 | क | तारा (लक्ष्मी) ओमप्रकाश यादव | सदस्या |
| 55. | 16 | ड | संदीप दिवाकर जोशी | सदस्य |
| 56. | 17 | अ | विजय गोपालराव चुटेले | सदस्य |
| 57. | 17 | ब | लता सुनिल काडगाये | सदस्या |
| 58. | 17 | क | हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे | सदस्या |
| 59. | 17 | ड | प्रमोद छत्रपाल चिखले | सदस्य |
| 60. | 18 | अ | प्रवीण प्रभाकर दटके | सदस्य |
| 61. | 18 | ब | सुमेधा श्रीकांत देशपांडे | सदस्या |
| 62. | 18 | क | नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| 63. | 18 | ड | ऋषिकेश (बंटी) नारायण शेळके | सदस्य |
| 64. | 19 | अ | संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| 65. | 19 | ब | विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |
| 66. | 19 | क | सरला कमलेश नायक | सदस्या |
| 67. | 19 | ड | दयाशंकर चंद्रशेखर तिवारी | सदस्य |
| 68. | 20 | ब | यशश्री देवराम नंदनवार | सदस्या |
| 69. | 20 | क | रमेश गणपती पुणेकर | सदस्य |
| 70. | 21 | ब | नितीन रामभाऊ साठवणे | सदस्य |
| 71. | 21 | क | आभा विजयकुमार पांडे | सदस्या |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 72. | 22 | अ | राजेश श्रावणजी घोडपागे | सदस्य |
| 73. | 22 | ब | वंदना वसंतराव यंगटवार | सदस्या |
| 74. | 22 | क | श्रद्धा विजय पाठक | सदस्या |
| 75. | 22 | ड | मनोज केशवराव चापले | सदस्य |
| 76. | 23 | ब | मनिषा आशिष धावडे | सदस्या |
| 77. | 23 | क | नरेंद्र (बाल्या) गोविंद बोरकर | सदस्य |
| 78. | 24 | अ | अनिल शौकीलाल गेंडरे | सदस्य |
| 79. | 24 | ब | सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| 80. | 24 | क | चेतना राजू टांक | सदस्या |
| 81. | 24 | ड | प्रदीप वसंतराव पोहाणे | सदस्य |
| 82. | 25 | अ | जयश्री योगेश्वर रारोकर | सदस्या |
| 83. | 25 | ब | पुरूषोत्तम नागोराव हजारे | सदस्य |
| 84. | 25 | क | वैशाली देवचंद रोहणकर | सदस्या |
| 85. | 25 | ड | दिपक मोतीरामजी वाडीभस्मे | सदस्य |
| 86. | 26 | अ | धर्मपाल नत्थुजी मेश्राम | सदस्य |
| 87. | 26 | ब | समीता राजेश चकोले | सदस्या |
| 88. | 26 | क | मनिषा सुनिल कोठे | सदस्या |
| 89. | 26 | ड | जितेंद्र धनराज कुकडे | सदस्य |
| 90. | 27 | अ | तानाजी सुकलाजी वनवे | सदस्य |
| 91. | 27 | क | वंदना राजेश भुरे | सदस्या |
| 92. | 27 | ड | हरिष सिताराम दिकोंडवार | सदस्य |
| 93. | 28 | अ | किशोर रतनलाल कुमेरिया | सदस्य |
| 94. | 28 | ब | मंगलाबाई प्रशांत गवरे | सदस्या |
| 95. | 28 | क | रेखा राजु साकोरे | सदस्या |
| 96. | 28 | ड | विजय शंकरराव झलके | सदस्य |
| 97. | 29 | अ | लीला अजय हाथीबेड | सदस्या |
| 98. | 29 | ब | विद्या योगेश मडावी | सदस्या |
| 99. | 29 | क | भगवान भाऊराव मेंढे | सदस्य |
| 100. | 29 | ड | स्वाती चंद्रकांत आखतकर | सदस्या |
| 101. | 30 | अ | नागेश गोविदराव सहारे | सदस्य |
| 102. | 30 | ब | रिता अशोक मुळे | सदस्या |
| 103. | 30 | ड | संजय मधुकर महाकाळकर | सदस्य |
| 104. | 31 | अ | उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| 105. | 31 | ब | सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| 106. | 31 | क | शीतल प्रशांत कामडे | सदस्या |
| 107. | 31 | ड | रविंद्र प्रभाकर भोयर | सदस्य |
| 108. | 32 | अ | अभय प्रल्हाद गोटेकर | सदस्य |
| 109. | 32 | ब | कल्पना राम कुंभलकर | सदस्या |
| 110. | 32 | क | रूपाली प्रशांतसिंह ठाकुर | सदस्या |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 111. | 32 | ड | दिपक मारोतराव चौधरी | सदस्य |
| 112. | 33 | अ | वंदना भानुदास भगत | सदस्या |
| 113. | 33 | ब | भारती विकास बुंडे | सदस्या |
| 114. | 33 | क | विशाखा शरद बान्ते | सदस्या |
| 115. | 33 | ड | मनोजकुमार धोंडुजी गावंडे | सदस्य |
| 116. | 34 | अ | नागेश महादेव मानकर | सदस्य |
| 117. | 34 | ब | राजेन्द्र विठ्ठलराव सोनकुसरे | सदस्य |
| 118. | 34 | क | माधुरी प्रवीण ठाकरे | सदस्या |
| 119. | 34 | ड | मंगला शशांक खेकरे | सदस्या |
| **120.** | **35** | **अ** | ------(रिक्त १०.४.२०१७ पासून) | **रिक्त पद** |
| 121. | 35 | ब | जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| 122. | 35 | क | विशाखा प्रकाश मोहोड | सदस्या |
| 123. | 35 | ड | अविनाश निलकंठ ठाकरे | सदस्य |
| 124. | 36 | अ | मिनाक्षी नितीन तेलगोटे | सदस्या |
| 125. | 36 | ब | पल्लवी अशोक श्यामकुळे | सदस्या |
| 126. | 36 | क | लहु दत्तुजी बेहते | सदस्य |
| 127. | 36 | ड | प्रकाश सिताराम भोयर | सदस्य |
| 128. | 37 | अ | प्रमोद हरिभाऊ तभाने | सदस्य |
| 129. | 37 | ब | सोनाली शालीक कडु | सदस्या |
| 130. | 37 | ड | दिलीप वामनराव दिवे | सदस्य |
| 131. | 38 | अ | उज्वला वसंतराव बनकर | सदस्या |
| 132. | 38 | ब | प्रफुल्ल विनोदराव गुडधे | सदस्य |
| 133. | 38 | क | प्रणिता चंद्रप्रकाश शहाणे | सदस्या |
| 134. | मानद सदस्य | | मा.श्री. अग्रवाल सुनिल जिवराज | सदस्य |
| 135. | मानद सदस्य | | मा.श्री.वानखेडे किशोर रामकृष्ण | सदस्य |
| 136. | मानद सदस्य | | मा.श्री.गांधी निशांत गिरीश | सदस्य |
| 137. | मानद सदस्य | | रिक्त | |

## अनुपस्थित सदस्य

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|---|---|
| 1. | 5 | ब | प्रविण विलासराव भिसीकर | सदस्य |
| 2. | 6 | क | वैशाली अविनाश नारनवरे | सदस्या |
| 3. | 7 | ब | शेख मोहम्मद जमाल मोहम्मद इब्राहीम | सदस्य |
| 4. | 8 | ड | भुट्टो जुल्फेकार अहमद | सदस्य |
| 5. | 9 | क | ममता महेश सहारे | सदस्या |
| 6. | 10 | क | नितिश गंगाप्रसाद ग्वालबंशी | सदस्य |
| 7. | 10 | ड | गार्गि प्रशांत चोपरा | सदस्या |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 8. | 11 | ड | भूषण कृष्णराव शिंगणे | सदस्य |
| 9. | 12 | ब | माया चिंतामन इवनाते | सदस्या |
| 10. | 13 | ब | रूतिका योगेश मसराम | सदस्या |
| 11. | 14 | ड | प्रगती अजय पाटील | सदस्या |
| 12. | 20 | अ | शकुंतला वामन पारवे | सदस्या |
| 13. | 21 | अ | ज्योती श्रीधर भिसीकर | सदस्या |
| 14. | 21 | ड | महेश केशवराव महाजन | सदस्य |
| 15. | 23 | अ | कांता राधेश्याम लारोकर | सदस्या |
| 16. | 23 | ड | दुनेश्वर सूर्यभान पेठे | सदस्य |
| 17. | 27 | ब | दिव्या दिपक धुरडे | सदस्या |
| 18. | 30 | क | स्नेहल सतीश बिहारे | सदस्या |
| 19. | मानद सदस्य | | मा.श्री.पोकुलवार गणेश उर्फ (मुन्ना) रामन्ना | सदस्य |

**उपस्थित अधिकारी**

श्री.अश्विन मुदगल, निगम आयुक्त
श्री.हरिश दुबे, निगम सचिव

महापौरः— सर्वांचे स्वागत आहे. सभेची कार्यवाही सुरू करण्यात येते.

**ठराव क्रमांक 36** :— मा. महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशानुसार निगम सचिव यांनी खालील अभिनंदन प्रस्ताव सभागृहात वाचून दाखविले व सभागृहाने त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मंजुरी प्रदान केली.

**अभिनंदन प्रस्ताव**

**म.न.पा. 10 वी परीक्षेत उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता 10 वीच्या परीक्षेत नागपूर महानगरपालिकेच्या बॅरिस्टर शेषराव वानखेडे विद्यानिकेतनची विद्यार्थीनी तन्वी भीमराव मोटघरे ही. 96.20 टक्के गुण प्राप्त करून म.न.पा. शाळांमधून प्रथम आली, हिंदी माध्यमातून संजयनगर हिंदी माध्यमिक शाळेचा विद्यार्थी भूपेंद्र शाहू हा 94.80 टक्के गुण घेऊन तर उर्दू माध्यमातून सानिया परवीन अब्दुल कादीर ही साने गुरूजी उर्दू माध्यमिक शाळेची विद्यार्थीनी 88.40 टक्के गुण घेऊन अव्वल आली आहे.

महानगरपालिके अंतर्गत मराठी, हिंदी, उर्दू माध्यमातील 28 शाळांमधून 2074 विद्यार्थी परिक्षेला बसले होते. त्यापैकी 1397 विद्यार्थी उत्तीर्ण झाले. ही टक्केवारी 67.36 इतकी आहे. मराठी माध्यमातून जयताळा माध्यमिक शाळेचा रूतिक ढोंगडे (92टक्के) याने द्वितीय तर बॅरि. शेषराव वानखेडे विद्यानिकेतनची कु. मोनिका नेवारे (90.80 टक्के) आणि जयताळा माध्यमिक शाळेचा आशीष येडे (90.80टक्के) यांनी संयुक्तपणे तिसरा क्रमांक पटकाविला. हिंदी माध्यमातून विवेकानंदनगर हिंदी माध्यमिक शाळेची रोशनी शुक्ला (87.40 टक्के) आणि लाल बहादूर शास्त्री हिंदी माध्यमिक शाळेची जान्हवी सोनकुसरे (85.40टक्के) यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविला. उर्दू माध्यमातून साने गुरूजी माध्यमिक शाळेचा हुसेन शेख सलीम खान (87.80 टक्के) आणि एम.ए.के आझाद उर्दू माध्यमिक शाळेचा मो. रशीद मो. गुलाम मुस्तफा (84.60टक्के) यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविला. दिव्यांग विद्यार्थ्यांमधून डॉ. बाबासाहेब आंबेडकर माध्यमिक शाळेची प्रिती पांडुरंग ब्राम्हणकर (77.80 टक्के) हिने म.न.पा. शाळेतून प्रथम क्रमांक पटकाविला. कुंदनलाल गुप्तानगर उर्दू माध्यमिक शाळेचा निकाल 100 टक्के लागला. सर्व गुणवंत विद्यार्थ्यासह शाळेचे मुख्याध्यापक मो. शकील अख्तर व राजेंद्र पुसेकर यांचेसह सर्व गुणवंत विद्यार्थी व शिक्षकांचे म.न.पा.ची ही सभा विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

## म.न.पा. 10 वी परीक्षेत उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावीच्या परिक्षेत नागपूरातील सोमलवार हायस्कूल रामदासपेठ येथील आदित्य उमेश लोटे याने 98.60 टक्के (493 गुण) मिळवीत प्रथम स्थान पटकाविले. याच शाळेची राधिका ढोक ही 98.40 टक्के (492) गुणांसह द्वितीय क्रमांकावर तर जे.पी. इंग्रजी शाळेचा प्रंजन भोयर याने 98.20 टक्के (491) गुणांसह तिसरा क्रमांक मिळविला. परिक्षेत चांगले यश संपादन करून नगरीचे नांव लौकीक केल्याबद्दल सर्व गुणवंत विद्यार्थ्यांसह शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षकांचे नागपूर महानगरपालिकेची ही सभा विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

## अखिलेष हळवे / मोनिका चतुर्वेदी

विश्व संवाद केंद्र नागपूर तर्फे नारद जयंती पत्रकारिता पुरस्कार झी–चोवीस तासचे वार्ताहर अखिलेश हळवे आणि वृत्त छायाचित्रकार गटातील पुरस्कार दै. लोकसत्ताच्या छायाचित्रकार मोनिका चतुर्वेदी यांना प्रदान करण्यात आल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

## मनीष अवस्थी / अशोक वानखेडे

विदर्भ गौरव प्रतिष्ठान नागपूर आणि नागपूर श्रमिक पत्रकार संघाच्यावतीने पत्रकारिता क्षेत्रात भरीव कामगिरी करणारे इंडीया न्युजचे ज्येष्ठ पत्रकार मनीष अवस्थी व दिल्ली येथील एबीपी समुहाचे स्तंभलेखक व विश्लेषक अशोक वानखेडे यांना 2016 चे स्व. अनिलकुमार पत्रकारिता पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

## दक्षदिगपाल नंदेश्वर / स्वप्नील लोखंडे

देशाची पहिली आणि जगातील दुसऱ्या क्रमांकाची कठीण समजल्या जाणाऱ्या केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (युपीएससी) परीक्षेच्या निकालात स्वनील लोखंडे व दक्षदिगपाल नंदेश्वर यांनी सुयश मिळविल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा दोघांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

## जयेश उरकुडे

एम्स एमबीबीएस प्रवेश या परिक्षेत आयकॅडच्या जयेश उरकुडे या विद्यार्थ्यांने अखिल भारतीय स्तरावर 323 वा आणि विदर्भातील दुसरा क्रमांक मिळविला आहे. आयकॅडच्ऱ्या पहिल्या बॅचमधील विद्यार्थ्यांने विदर्भातील टॉपरमध्ये स्थान मिळविले आहे. त्याची ओबीसी रँक 47 असून 99.88 टक्के गुण मिळावत नगरीचे नांव गौरवांन्वीत केल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

## हिमांश्यु भोयर / समीर पांडे

संयुक्त प्रवेश परीक्षा (जेईई) ॲडव्हान्स परीक्षेत शहरातून अव्वल ठरलेला हिमांशु भोयर विदर्भातून प्रथम तर दुसऱ्या क्रमांकावर शिवाजी विज्ञान महाविद्यालयाचा विद्यार्थी समीर पांडे यांनी बाजी मारल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा दोघांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

## वैभव अंधारे

शहरातील प्रतिभावान धावपटू वैभव अंधारे याने 86.73 किलोमीटर अंतराची दक्षिण आफ्रिकेतील कॉमरेड्स मॅरेथॉनमध्ये यशस्वी कामगिरी करीत आंतरराष्ट्रीय स्तरावर शहराचे नांवलौकिक उंचावल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

## 'सीबीएसई तर्फे घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेत उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन

सेंट्रल बोर्ड ऑफ स्कुल एज्युकेशन सीबीएसई तर्फे घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेत नारायणा विद्यालयम् च्या ईशान प्रयागी व नंदिनी चलाख यांनी 99.04 टक्के गुणांस पहिल्या क्रमांकावर बाजी मारली असून, बी.पी. भवन्स विद्यामंदीर (सिव्हील लाईन्स) ची विद्यार्थिनी कनक गजभिये व बी.पी. भवन्स विद्यामंदीर (श्रीकृष्णनगर) येथील विद्यार्थ्यांनी आयुषी आंबिलकर यांनी 99.02 टक्के (496) गुण प्राप्त करीत संयुक्तपणे दुसरा क्रमांक पटकाविला. तिसऱ्या क्रमांकावर 'नारायणा विद्यालयम्) चे ऋतुजा कोलते, शिवानी पाटील, बी. पी. भवन्स विद्यामंदीर (सिव्हील लाईन्स) ची ऋषिका जोशी व 'मॉर्डन स्कूल (कोराडी रोड) येथील अनंत सोहल हे चौघे आहेत. या चौघांनाही प्रत्येकी 99 टक्के (495) गुण प्राप्त झाले. निकालामध्ये विद्यार्थिनींनी बाजी मारल्यामुळे नागपूर महानगरपालिकेची ही सभा सर्व गुणवंत विद्यार्थीनीचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**ठराव कमांक 37 :–** नागपूर महानगरपालिका, सभेचे खालील कार्यवृत्त कायम करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून म.न.पा. स्थगित साधारण सभा दिनांक 08.05.2017 सकाळी 11.00 वाजता चे कार्यवृत्तात मा. सदस्य श्री.नितीश ग्वालबंशी हया नावाऐवजी मा.सदस्य श्री.हरीश ग्वालबंशी अशी दुरूस्ती करावी या मा. महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

1. म.न.पा. साधारण सभा दिनांक 20.04.2017 सकाळी 11.00 वाजता चे कार्यवृत्त
2. म.न.पा. स्थगित साधारण सभा दिनांक 20.04.2017 सकाळी 11.05 वाजता चे कार्यवृत्त
3. म.न.पा. स्थगित साधारण सभा दिनांक 20.04.2017 सकाळी 11.25 वाजता चे कार्यवृत्त
4. म.न.पा. स्थगित साधारण सभा दिनांक 08.05.2017 सकाळी 11.00 वाजता चे कार्यवृत्त
5. म.न.पा. साधारण सभा दिनांक 01.06.2017 सकाळी 11.00 वाजता चे कार्यवृत्त
6. म.न.पा. स्थगित साधारण सभा दिनांक 01.06.2017 सकाळी 11.12 वाजता चे कार्यवृत्त
7. म.न.पा. स्थगित साधारण सभा दिनांक 01.06.2017 सकाळी 11.30 वाजता चे कार्यवृत्त

**ठराव कमांक 38 :–** नागपूर महानगरपालिका, विशेष समित्यांच्या सभेचे खालील कार्यवृत्त कायम करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून सोमवार दिनांक 29.05.2017 रोजी दुपारी 12.00 वाजता भरलेल्या कर आकारणी व कर संकलन समितीचे कार्यवृत्त देखील कायम करण्यास यावे .या मा. सत्तापक्ष नेते यांनी केलेल्या सूचनेसह कार्यवृत्त कायम करण्यास मान्यता प्रदान केली.

1 स्थापत्य विद्युत व प्रकल्प विशेष समिती.

   1. शनिवार दिनांक दि. 29.04.2017 दुपारी 12.00 वाजता चे कार्यवृत्त
   2. सोमवार दिनांक दि. 29.05.2017 दुपारी 03.00 वाजता चे कार्यवृत्त

2 वैद्यकिय सेवा व आरोग्य विशेष समिती

   1. गुरुवार दि. 13.04.2017 दुपारी 02.00 वाजता चे कार्यवृत्त
   2. गुरुवार दि. 11.05.2017 दुपारी 02.00 वाजता चे कार्यवृत्त

3 शिक्षण समिती

   1. गुरुवार दि. 27.04.2017 सकाळी 11.00 वाजता चे कार्यवृत्त

4 गलिच्छ वस्ती निर्मुलन घर बोधणी विशेष समिती

   1. मंगळवार दि. 25.04.2017 दुपारी 04.00 वाजता चे कार्यवृत्त
   2. गुरुवार दि. 04.05.2017 दुपारी 04.00 वाजता चे कार्यवृत्त

5 क्रिडा विशेष समिती

   1. मंगळवार दि. 16.05.2017 दुपारी 03.00 वाजता चे कार्यवृत्त

6 महिला बाल कल्याण विशेष समिती

   1. बुधवार दि. 03.05.2017 सकाळी 11.30 वाजता चे कार्यवृत्त

7 अग्निशमन व विद्युत विशेष समिती

   1. सोमवार दि. 24.04.2017 दुपारी 12.00 वाजता चे कार्यवृत्त

<u>ठराव क्रमांक 39 :–</u> नागपूर महानगरपालिका, स्थायी समितीचे खालील तिमाही अहवाल कायम करण्यास सभागृहाने मान्यता प्रदान केली.

1. म.न.पा. स्थायी समिती सभा **दिनांक 18–03–2017** रोजी **दुपारी 03–00** वाजता
2. म.न.पा. स्थायी समिती सभा **दिनांक 24–03–2017** रोजी **दुपारी 03–00** वाजता
3. म.न.पा. स्थायी समिती सभा **दिनांक 17–04–2017** रोजी **दुपारी 12–00** वाजता
4. म.न.पा. स्थायी समिती सभा **दिनांक 29–04–2017** रोजी **दुपारी 03–00** वाजता
5. म.न.पा. स्थायी समिती सभा **दिनांक 12–05–2017** रोजी **दुपारी 03–00** वाजता
6. म.न.पा. स्थायी समिती सभा **दिनांक 12–05–2017** रोजी **दुपारी 03–00** वाजता
7. म.न.पा. स्थायी समिती सभा **दिनांक 15–05–2017** रोजी **दुपारी 12–00** वाजता
8. म.न.पा. स्थायी समिती सभा **दिनांक 29–05–2017** रोजी **दुपारी 03–00** वाजता
9. म.न.पा. स्थायी समिती सभा **दिनांक 09–06–2017** रोजी **दुपारी 03–00** वाजता

निगम सचिव :– मा.महापौरजी, महानगरपालिकेमध्ये नविन चार अधिकारी रुजु झाले आहे. मी त्यांचा थोडक्यात परिचय देतो, विस्तृत परिचय ते स्वतः या सभागृहाला देतील. श्री. विजय बनगीनवार, मुख्य अभियंता हे महानगरपालिकेत 9 जुन रोजी रुजु झाले आहे. श्री. दिपक सोनटक्के हे अधिक्षक अभियंता म्हणुन महानगरपालिकेमध्ये दिनांक 16/05/2017 रोजी रुजु झाले आहे. श्रीमती.मोना ठाकुर या महानगरपालिकेमध्ये 15/06/2017 रोजी उपसंचालक, लेखा परिक्षक, या पदावर रुजु झाल्या आहेत आणि सौ.संध्या विनोद मेडपल्लीवार यांना 08/06/2017 पासुन शिक्षणाधिकारी या पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला आहे. मी संबंधित अधिका–यांना विनंती करतो की, त्यांनी आपला सदनासमक्ष परिचय दयावा.

श्री.विजय बनगिनवार (मुख्य अभियंता) :– मा.महापौरजी, आणि सन्माननिय सदन, मी विजय रामभाऊ बनगिनवार, मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासनाच्या आदेशानुसार मी 9 जुन 2017 रोजी महानगरपालिके मध्ये मुख्य अभियंता या पदावर रुजु झालेलो आहे. महानगरपालिकेमध्ये काम करतांना जास्तीत जास्त चांगले काम करण्याचा मी प्रयत्न करेल, सर्वांना माझा नमस्कार.

श्री.दिपक सोनटक्के (अधिक्षक अभियंता) :– मा.महापौर मॅडम, मा.सदन, मी दिपक गोविंदराव सोनटक्के, अधिक्षक अभियंता म्हणुन 16 मे 2017 ला माध्यांना नंतर येथे रुजु

झालेलो आहे. या आधी मी सार्वजनिक बांधकाम विभाग, व्हिजीलन्स ॲन्ड क्वॉलिटी कंट्रोल सर्कल, नागपूर येथे कार्यकारी अभियंता म्हणुन कार्यरत होतो आणि येथे येण्याआधी मी रत्नागिरी जिल्हा, चंद्रपुर जिल्हा, नागपुर जिल्हा आणि गडचिरोली जिल्हामध्ये काम केलेले आहे.

श्रीमती मोना ठाकुर :– मा.महापौरजी, सभागृहात उपस्थित सर्व मा. सभासद मी मोना कृष्णकुमार ठाकुर, महाराष्ट्र लेखा व वित्त विभाग, वर्ग 1 ची अधिकारी आहे. या पुर्वी वरिष्ठ कोषागार अधिकारी होते, दि.15/06/2017 रोजी मी महानगरपालिकेच्या उपसंचालक लेखा व परिक्षक म्हणुन येथे रुजु झालेली आहे.

सौ.संध्या मेडपल्लीवार (शिक्षणाधिकारी) :– मा.महापौरजी, मा.आयुक्त, आणि सभागृहातील सर्व आदरणिय सदस्य, मी सौ.संध्या मेडपल्लीवार मुख्याध्यापक म्हणुन 17 वर्षाचा अनुभव आणि 4 वर्ष असिस्टंट टिचर म्हणुन राम मनोहर लोहिया या शाळेतुन तसेच वाल्मीकी नगर, प्राथमिक शाळा येथे 14 वर्ष काम केले आहे आणि तेथुन दत्तात्रय नगर येथील मराठी माध्यमिक शाळेत 4 वर्ष काम केले आणि तेथुन मला 8 तारखेला अतिरिक्त भार शिक्षणाधिकारी पदाचा दिलेला आहे. आमच्या समोर विद्यार्थी हाच केंद्रबिंदु आहे असे समजुन मी आज पर्यत काम केले तसेच काम करण्याची प्रेरणा परमेश्वर मला देवो, हीच परमेश्वर चरणी प्रार्थना करते.

महापौर :– सन्माननिय सदस्यगण, प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात करण्यात येते.

**<u>प्रश्न क. 5</u>** :– दि. 29.03.2017 रोजी शहर बस वाहतूक सेवा पूर्णतः बंद संदर्भात

श्री.प्रफुल गुडधे:– मा.महापौरजी, 29 मार्चला शहरबस वाहतुक सेवा पुर्णतः बंद झाली होती आणि कर्मचाऱ्यांनी जो संप केला आणी त्यामुळे ही सेवा बंद झाली आपल्या बहुतांश ज्या सुविधा आहे त्या खाजगी ऑपरेटरच्या माध्यमातुन सुरु करतो. 29 मार्चच्या झालेल्या घटनेत जे उत्तर देण्यात आले आहे यात साधारणतः 12 ते 13 लाख रुपयाच यात नुकसान झाले आहे अश्या पध्दतीचे उत्तर दिले, आणि दुस–या उत्तरामध्ये असे सांगण्यात आले आहे की याची जबाबदारी अद्याप पर्यत निश्चित केलेली नाही. या संपकर्त्या संघटना आहे त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्याकरीता आपण अप्पर कामगार आयुक्त यांचेकडे निवेदन दिलेले आहे आणि या आर्थीक नुकसानीची भरपाई आपण केव्हापर्यत करणार या संदर्भात अजुनही याबाबत आपण कोणतेही उत्तर दिलेले नाही. त्यामुळे ही जबाबदारी आपण कोणावर निश्चित करणार आहे आणि कधीपर्यत निश्चीत करणार आहात, याबाबत विभागातर्फे माहिती देण्यात यावी.

श्री.जगताप (परिवहन व्यवस्थापक) :– मा.महापौरजी, सन्माननीय सभागृह दिनांक 29.3. 2017 रोजी सकाळ पासुन शहर बस वाहतुकीमधील चालक वाहक या प्रवर्गातील कार्यरत कर्मचा–यांनी संगनमत करुन जो अचानकपणे बस वाहतुक पूर्णपणे बंद पाडली. यामध्ये महानगरपालिकेस अंदाजे 12ते 13 लाख रुपयाचे उत्पन्न मिळू शकले नाही. यामध्ये सर्वप्रथम आम्ही ज्या दिवशी संप झाला त्या दिवशी आम्ही तातडीने सर्व कर्मचारी वर्गाशी मी प्रत्यक्ष बोलणी केली आणी ताबडतोब आम्ही अप्पर कामगार आयुक्ताकडे हे प्रकरण रेफर केले त्याच दिवशी आम्ही मिटींग घेवून मनपा तर्फे अपर कामगार आयुक्त यांना त्या वाटाघाटी बैठकीतच सांगितले की या प्रकरणामध्ये म.न.पा.ची कुठलीही चुक नसल्यामुळे या संपासाठी आम्ही

| |
|---|
| जबाबदारी निश्चित करणे आम्हाला आवश्यक आहे. याच्यात आम्ही आयडेन्टीफाय केलेल्या जे काही कर्मचारी आणि जुने संघटनेचे प्रतिनिधी होते ते 16 नाव आयडेन्टीफाय केले, त्या बाबतीत आम्ही पोलीस स्टेशन इथे सुध्दा नोंद केली. तथापि अप्पर कामगार आयुक्त यांचे त्यावेळी मत पडले की  दि.01.3.2017 ला वाहतुक सुरु झालेली आहे. औद्योगिक शांतता अबाधित ठेवण्यासाठी मुख्यतः यामध्ये कुठलीही नोटीस दिलेली नाही अचानक संगनमत करुन झालेला हा जो संप होता. त्या आयडेन्टीफाय केलेल्या 16 लोकांचे नाव पोलीस स्टेशनला कळविले आहे. |
| श्री. प्रफुल गुडधेः— मा.महापौरजी, ज्या कर्मचा—यांनी संप केला ते कर्मचारी महानगरपालिकेचे कर्मचारी आहे काय ? |
| श्री.जगताप (परिवहन व्यवस्थापक) :— मा.महापौरजी, ते महानगरपालिकेचे कर्मचारी नाही. हीच सर्वात मोठी अडचण होती अपर कामगार आयुक्त कार्यालयांनी सुध्दा त्या गोष्टीकडे निर्देश केले. तथापि उत्तरामध्ये जे दिले आहे की, त्यानंतर  24/04/2017 च्या बैठकीमध्ये पुनश्चः आयडेण्टीफाय केलेल्या लोकांवर कार्यवाही केली. |
| श्री प्रफुल गुडधेः— मा.महापौरजी, जर ते कामगार महानगरपालिकेचे नाही तर त्याच्यावर जबाबदारी कशी निश्चित करणार आहोत. ती जी जबाबदारी आहे सेवा देण्याची ती जबाबदारी कंत्राटदार कंपनीची आहे. त्यामुळे कंत्राटदार कंपनीवर हा जो दंड आहे तो कंत्राटदार कंपनीवर आकारायचा आहे. त्यामुळे जबाबदारी निश्चीतीसाठी आपण पुन्हा वेगळे सेकंड, थर्ड करण्याची आवश्यकता नाही. दुसरा माझा प्रश्न असा आहे की 12 ते 13 लाख रुपये अंदाजे नुकसान आपण येथे काढले याचा आधार काय आहे ? कुठल्या आधारावर नुकसान अपेक्षीत धरलेले आहे. |
| श्री.जगताप (परिवहन व्यवस्थापक) :— मा.महापौरजी, मुळात ज्या दिवशी संप झाला त्या दिवशी 1200 कि.मी. बस चाललेली होती. जर वाहतुक चालली असती तर साधारणपणे 41,800 कि.मी किंवा 42,000 कि.मी. चालली असेल असे  गृहीत धरणे भाग पडले त्यानंतर उत्पन्न प्रति.कि.मी त्या दिवसाचे म्हणजे मागील आठवडयातील उत्पन्न प्रति कि.मी. होते त्या हिशोबाने आपण साधारणपणे 40,000 कि.मी. होते कारण त्यावेळेस जेमतेम महिना व्हायचा होता महानगरपालिकेने बसेस अधिग्रहीत केल्यानंतर त्या 29 तारखेच्या सुमारामध्ये 40 हजार कि.मी सरासरी 30 रुपये प्रति.कि.मी. उत्पन्न होते त्या हिशोबाने वाहतुक चालली नाही चालली असती तर 12 ते 13 लाख रुपयांचे उत्पन्न त्या दिवसाचे झाले असते. |
| श्री प्रफुल गुडधेः— मा.महापौरजी, 12 ते 13 लाख रुपये उत्पन्न आपल्या करारनाम्याप्रमाणे ती जी जबाबदारी आहे ती कंत्राटदारावर कंपनीवर जबाबदारी निश्चीत करण्यासाठी कां टाळाटाळ करण्यात येत आहे. |
| श्री.जगताप (परिवहन व्यवस्थापक) :— मा.महापौरजी, कुठलीही टाळाटाळ आपल्या परिवहन विभागातर्फे होत नाही परंतु या संप कालावधीतील कुठलेही पेमेंट कंपनीला केलेले नाही. |
| श्री प्रफुल गुडधेः— मा.महापौरजी, या संदर्भातील जबाबदारी अजुन निश्चित व्हायची आहे. यामध्ये कंत्राटदारावर जबाबदारी निश्चितीची कारवाई करण्यात येईल. आता कंत्राटदार कंपनीवर जबाबदारी निश्चितीची कारवाई  प्रशासनाने करणे अपेक्षित होते मा.महापौरजी, मात्र ते जे कर्मचारी आहे जे कर्मचारी प्रिसिंपल एम्प्लॉयर म्हणुन आपणच मालक आहे त्यांचे ते |

| |
|---|
| आपले एम्प्लॉयर आहे. त्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी महानगरपालिकेची पण आहे. त्यांच्या मिनीमम वेजेसच्या संदर्भात पाठपुरवा मोठया प्रमाणावर सुरु आहे. परंतु कंत्राटदार कंपनी त्या कर्मचाऱ्यांना मिनीमम वेजस देत नाही म्हणुन ते लोक संपावर गेले आणि ही परिस्थिती निर्माण झाली. कदाचित हा जरी कायदेशीर संप केला नसेल जर उद्या कायदेशीर नोटीस देवुन जर संप केला तर या शहरातील संपुर्ण वाहतुक विस्कळीत होवु शकते म्हणुन मा.महापौरजी, अशा पध्दतीने त्यांना मिनीमम वेजस देण्याच्या संदर्भामध्ये प्रशासनाची कुठलीही भुमिका नाही. आणि मग संप झाला याची जबाबदारी पण आपण कंत्राटदार कंपनीवर करीत नाही तर आपण त्या कामगारांवर जबाबदारी निश्चित करण्याकरिता आपण पुढाकार घेवुन राहिलो हे पुर्णतः चुक आहे. त्या कंत्राटदाराकडुन 12 ते 13 लाख रुपयांची जी नुकसान भरपाई आहे, ती त्यांच्यावर इंम्पोज केली पाहिजे. आणि ते जे कर्मचारी आहे त्या कर्मचा–यांचे वेतन हे मिनीमम वेजस प्रमाणे करण्याच्या कारवाईचा निर्णय या सभागृहाने घेतला पाहिजे, जेणेकरुन अशाप्रकारचे संप आहे तो वांरवांर होणार नाही. संप का करतात कारण त्यांना वेतन मिळाले नाही म्हणुन ते संप करतात म्हणुन मा.महापौरजी आपण प्रशासनाला निर्देश दयावे जो 2014 चा जो मिनीमम वेजेसचा जो कायदा आहे त्या कायदयाप्रमाणे मिनीमम वेजस देण्याची कार्यवाही करावी. |
| श्री.संदीप जोशी :– मा.महापौरजी, या प्रश्नामध्ये जबाबदारी फिक्स करण्याचा जो विषय आहे तो निश्चीतच बरोबर नाही. कंपनीवर जबाबदारी फिक्स करणे हे अत्यंत गरजेचे आहे. आणि त्याच्यामुळे आपण प्रशासनाला आदेश दयावे की कंपनीवरती जबाबदारी 100 टक्के फिक्स करण्यात यावी. मला असे वाटते तेवढाच विषय आहे. त्याच्यामुळे मिनीमम ॲक्टचा जो विषय आहे तो कंपनी आणि त्यांचे इम्पॉईज बघत बसतील. त्यांच्याशी आपला काही संबंध नाही, आपल्याला कंपनीवरती जबाबदारी फिक्स कंपनीवरती केली पाहिजे. |
| श्री.प्रफुल गुडधे :– मा.महापौरजी, सन्माननिय सत्तापक्ष नेत्यांनी या ठिकाणी जी भुमिका मांडली मी त्यांच्या भुमिकेशी सहमत आहे. त्या कंपनीवर जबाबदारी फिक्स करुन 12 ते 13 लाख रुपये ताबडतोब वसुल केले पाहिजे. सोबतच त्या कर्मचा–यांचा आपल्याशी काही संबंध नाही हे काही बरोबर नाही. महानगरपालिकेमध्ये प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष जे कामगार काम करतात त्या संपुर्ण कामगारांचा महानगरपालिकेशी संबंध आहे, एक प्रिन्सीपल एम्प्लॉयर म्हणुन महानगरपालिका आहे. त्यामुळे अपर कामगार आयुक्तांनी सुध्दा या संदर्भात स्पष्ट पत्र दिले की या सर्व लोकांना मिनीमम वेजेस प्रमाणे या सर्व लोकांना वेतन दिले पाहिजे. त्या संदर्भातील भुमिका देखील परिवहन व्यवस्थापक यांनी क्लीअर करावी. |
| श्री.संदीप जोशी :– मा.महापौरजी, त्यांच्या ॲग्रीमेंट मध्ये काय आहे. |
| श्री.जगताप (परिवहन व्यवस्थापक) :– मा.महापौरजी, आपण नियुक्त केलेल्या ज्या नविन कंपनी आहे. याच्यामध्ये ग्रिन बस ऑपरेटर, आयबीटीम ऑपरेटर, असे जे 5 मल्टीपल ऑपरेटर आहे. ज्या 5 कंपन्या आहे त्यांच्याव्दारे किमान वेतन कायद्याव्दारे सर्व कमचा–यांना वेतन, घरभाडे, भविष्य निर्वाह निधी, तसेच विमा वैद्यकीय लाभ, उपदान कायद्याच्या तरतुदीप्रमाणे उपदान कर्मचाऱ्यांना देत आहे या मध्ये ज्या अवास्तव मागण्या ज्या कर्मचाऱ्यांच्या होत्या या संपामध्ये..... |
| श्री.प्रफुल गुडधे :– मा.महापौरजी, स्थानिक स्वराज्य संस्थेकरिता मिनीमम वेजेसचा जो कायदा आहे त्या परिपत्रका प्रमाणे किमान वेतन देत आहात काय,? |

| |
|---|
| श्री.जगताप (परिवहन व्यवस्थापक) :— मा.महापौरजी, मुळात शहर बस वाहतुकीमध्ये जे कार्यरत कर्मचारी आहे चालक, वाहक, यांत्रिकी हे सर्व जे आहे हे मोटर ट्रान्सपोर्ट या संधी मध्ये मोडतात. त्यामुळे उद्योग उर्जा आणि कामगार विभाग, मंत्रालय मुंबई यांनी निर्गमित केलेले 20.07.2010 ची जी अधिसुचना आहे जी पब्लीक मोटर ट्रान्सपोर्ट वर्करला जी लागु होते या तरतुदीप्रमाणे नियुक्त केलेल्या कर्मचा—यांना वेतन अदा करण्यात येत आहे. |
| श्री.प्रफुल गुडधे :— मा.महापौरजी, या आधी सन्माननिय वाहतुक व्यवस्थापक यांचे जुन्या बस ऑपरेटरला एक पत्र होते जे आपण स्थानिक स्वराज्य संस्थासाठी मध्ये किमान वेतनाचे परिपत्रक आहे, त्याप्रमाणे वेतन आपण दयावे असे आपण पत्र दिले होते काय? |
| श्री.जगताप (परिवहन व्यवस्थापक) :— मा.महापौरजी, होय, मी असे पत्र दिले होते. याबाबतीत कॉर्ट्रडीक्शन आले की महानगरपालिकेची वेतनश्रेणी त्यांना लागु करणे किंवा मोटर पब्लीक ट्रान्सपोर्ट वर्कर बद्यलची वेतनश्रेणी लागु करणे या संदर्भात सन्माननिय पालकमंत्री यांच्याकडे जेव्हा बैठक झाली होती तेव्हा ही गोष्ट स्पष्ट झाली होती की शासनाकडे याचा पाठपुरावा करुन या बाबतीत क्लॅरीफिकेशन मागविणे, त्यानुसार क्लॅरिफीकेशन मागितलेले आहे. तथापि हा कर्मचारी किंवा मोटर ट्रान्सपोर्ट वर्कर या संधी मध्ये मोडत असल्यामुळे त्यांचे वेतन अदा करण्यात येईल. |
| श्री.प्रफुल गुडधे :— मा.महापौरजी, समजा ही शहरबस वाहतुक सेवा महानगरपालिकेनी स्वतः चालविली असती ती कुठल्या कॉर्ट्रक्टरच्या माध्यमातुन जर चालविली नसती तर महानगरपालिका त्यांना वेतन कुठल्या नियमाप्रमाणे दिले असते. |
| श्री.संदीप जोशी :— मा.महापौरजी, जर चालवित असतो तर आपण दिले असते आज आपण चालवितो आहे काय? दुसरा विषय असा आहे की जुन्या कंत्राटामध्ये चुकी असल्यामुळेच आपण तो संपुर्ण कंत्राट रद्य करुन नविन केला आहे. आणि त्यामुळे नविन याच्यामध्ये मिनीमम वेजस ॲक्ट नुसार आपण जर पगार देतो आहे तर मला असे वाटते तेवढे सफिसिएंट आहे. |
| श्री.प्रफुल गुडधे :— मा.महापौरजी, मा.सत्तापक्ष नेते, यामध्ये माझा प्रश्न असा आहे की महानगरपालिका ज्या ज्या सर्व्हीसेस स्वतः चालविणार असेल त्या त्या सर्व सर्व्हीसेस आपण थर्ड पार्टी कडुन चालवित असु तरी त्याचा मिनीमम वेजस अंतर्गत देय असलेला वेतन आहे त्याप्रमाणे देय आहे आता त्यामध्ये कंन्फुजन क्रीयेट करण्यासाठी सर्व खाजगी कंपन्यांनी वेगवेगळे जी.आर. आणत आहे. उदाहरण सांगतो की, आपल्या महानगरपालिकेमधल्या सफाई कर्मचा—यांच्या संदर्भात सुध्दा स्थानिक स्वराज्य संस्थाचा जो जी.आर. आहे त्या ही वेळेस असाच जी.आर. आणला होता तो येथे आपल्याला हा लागुच होत नाही अशी भुमिका सुरुवातीला प्रशासनाने घेतली होती. त्यामध्ये आपण सभागृहाने मिळुन निर्णय घेतला की, स्थानिक स्वराज्य संस्थेमधील सर्व लोकांना जे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष महानगरपालिकेमध्ये सेवा करीत आहे त्या सर्व लोकांना मिनीमम वेजेस प्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थेमधले कर्मचा—यांना त्या प्रमाणेच किमान वेतन दिले पाहिजे असा नियम आपण केला आहे. हा नियम राज्य शासनाचा आहे माझा नाही. |
| श्री.संदीप जोशी :— मा.महापौरजी, जो प्रश्न सन्माननिय प्रफुलजीने विचारला होते त्या प्रश्नानुसार जबाबदारी फिक्स करणे अत्यंत आवश्यक आहे ते आपण करुन घ्यावे आणि जे काही ॲग्रीमेंट मध्ये असेल आणि अपर कामगार आयुक्तांचे पत्र असेल त्याप्रमाणे मिनीमम |

| |
|---|
| वेजस त्यांना देण्यात यावे. |
| महापौर :— सन्माननिय सत्तापक्ष नेते श्री.संदीपजी जोशी यांनी ज्या सुचना केल्या आहे त्यानुसार हा विषय मंजुर करावा आणि प्रशासनानी कार्यवाही करावी.<br>**<u>प्रश्न क्र 8</u>** श्री.मोहम्मद जमाल :— नागपूर महानगरपालिका ने पटवर्धन मैदान की जगह के लीज के नुतनीकरण संदर्भात माहिती<br>**<u>प्रश्न क्र 9:—</u>** नागपूर महानगरपालिकेतील ग्रंथालय अधिक्षक या पदाकरिता नियमावली नुसार शैक्षणिक पात्रता तसेच अनुभवाचा कालावधी संदर्भात माहिती |
| श्री.संदीप सहारे :— मा.महापौरजी, आज ज्यांचा विरोधामध्ये हा प्रश्न आहे तर सभागृहाचा असा नियम आहे की ज्यांच्या विरोधात जर एखादयाचा विरोधात्मक जर प्रश्न असेल त्यांना प्रथम या सभागृहामधुन जावे लागते असा नियम आहे. |
| श्री.सुनिल अग्रवाल :— मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉरर्मेशन, संदीपजीने कहा जिस व्यक्ती के उपर प्रश्न है उसने बाहर जाना चाहिये आपके प्रश्न मे उनका नाम नमुद है क्या? |
| श्री.संदीप सहारे :— मा.महापौरजी, नाम नमुद नही है। |
| श्री.सुनिल अग्रवाल :— मा.महापौरजी, आप कैसे कह सकते है उनको तो पर्सनल है तो उस हिसाब से प्रश्न पुछना था। |
| श्री. संदीप सहारे :— मा.महापौरजी, ठिक है अभी नाम आ जायेंगा। |
| श्री. सुनिल अग्रवाल :— मा.महापौरजी, नाम कब आयेंगा, कब घटेंगा उसकी बात नही है। जब आपका कहना है की जिसके उपर मे प्रश्न है उनको बाहर जाना चाहिये, इसलिये उनका नाम ही नमुद नही है तो उनको बाहर जाने का प्रश्न ही नही उठता। |
| श्री.तानाजी वनवे :— मा.महापौरजी पॉइंट ऑफ इन्फॉरर्मेशन, आपल्याकडे ग्रंथालय अधिक्षक म्हणुन कोण आहे. |
| श्री.संदीप सहारे :— मा.महापौरजी, जेव्हा हा प्रश्न टाकला होता तेव्हा ग्रंथालय अधिक्षक कोण होते ? |
| श्री.सुनिल अग्रवाल :— मा.महापौरजी, ग्रंथालय अधिक्षक कौन है यह विषय नही है। ग्रंथालय अधिक्षक की शैक्षणिक अर्हता क्या है, कौन है, ऐसा विषय है । |
| श्री.संदीप सहारे :— मा.महापौरजी, श्री.सुनिल अग्रवाल यांनी माझा प्रश्न वाचला नाही मी त्यामध्ये असा उल्लेख केला आहे की, सद्या कार्यरत ग्रंथालय अधिक्षक कोण आहे. सद्या ते येथे बसले तरी मला काही प्रॉब्लेम नाही. मा.महापौरजी मुळात जो माझा प्रश्न होता त्याचे येथे उत्तरही देण्यात आले आहे. प्रश्न असा होता की, नागपूर महानगरपालिकेतील ग्रंथालय अधिक्षक या पदाकरिता नियमावलीनुसार शैक्षणिक पात्रता कोणत्या प्रकारे देण्यात आली ? |
| महापौर :— प्रशासनाने उत्तर दयावे. |
| सहा.आयुक्त (श्री.धामेचा) :— मा.महापौरजी, सन्माननिय सदस्य श्री.संदीपजी सहारे यांनी जो प्रश्न विचारला होता त्यामध्ये असे लिहीले होते की, नागपूर महानगरपालिकेतील ग्रंथालय अधिक्षक या पदाकरिता नियमावली नुसार शैक्षणिक पात्रता कोणत्या प्रकाराने देण्यात आली आहे. या संदर्भात सर्वप्रथम मी हे सांगु इच्छितो की, महानगरपालिकेत शासनाने मंजुर केलेली नियमावली नव्हती आतापर्यंत फक्त आपण जो 12/04/1976 ला जो ठराव क्र 31 केलेला होता आणि वेळोवेळी त्यामध्ये ज्या सुधारणा केल्या होत्या, त्या सुधारणा व ठरावाच्या अनुषंगाने आपण महानगरपालिकेतील कर्मचारी व अधिकारी यांची पदोन्नती आणि सेवाप्रवेश |

| |
|---|
| नियम करीत होतो. नुकतेच मागील वर्षी सन्माननिय माजी महापौर श्री.दटके साहेब यांच्या अध्यक्षतेखाली एक महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यासाठी सेवाप्रवेश नियमावली तयार करण्यासाठी 11 सदस्यीय समिती तयार करण्यात आली होती त्या समितीमध्ये सन्माननिय सदस्य श्री. दयाशंकर तिवारीजी, सन्माननिय सदस्य श्री.प्रफुल गुडधेजी, सन्माननिय सदस्य श्री.संदीप जाधवजी, सन्माननिय सदस्य श्री.सुनिल अग्रवालजी, सन्माननिय सदस्या श्रीमती निता ठाकरे अशा पदाधिकाऱ्यांपैकी सदस्य होते आणि 5 सदस्य अधिकाऱ्यातर्फे होते या समितीने सर्व विभागाचा अभ्यास करुन आकृतीबंध आणि सेवा प्रवेश नियमावली शासनाकडे पाठविलेली आहे. या पुर्वी आतापर्यंत महानगरपालिकेने विविध ठराव केलेले आहे त्याला आपण 12/04/1976 असे संबोधन केले असले तरी वेळोवेळी त्यात आपण संशोधन केलेले आहे. 12/04/1976 मध्ये ग्रंथालय पदाकरिता शैक्षणिक आवश्यक पात्रता होती ती पदवीधर व लायब्ररी सायन्स मधील डिग्री किंवा डिप्लोमा तसेच ग्रंथपाल या पदाचा 3 वर्षाचा अनुभव असलेली शैक्षणिक पात्रता होती. यानंतर 03/10/1996 ला महानगरपालिका ठराव क्र 116 अन्वये सुधारणा........ |
| श्री.संदीप सहारे :— मा.महापौरजी, पहिल्यांदा एका प्रश्नाचे उत्तर देण्यात यावे. जी ग्रंथालय अधिक्षक पदाकरिता जी अर्हता होती पदवीधर ग्रॅज्युएशन आणी त्याच्यासोबत बीलीप ची पदवी असणे आवश्यक आहे, पण जेव्हा यांना ग्रंथालय अधिक्षक पदाचा पदभार दिला तेव्हा त्यांच्याजवळ ही शैक्षणिक अर्हता होती काय? ते या पदासोबत होते काय? |
| सहा.आयुक्त (श्री.धामेचा) :— मा.महापौरजी, त्यासाठी मी पार्श्वभुमी सांगत आहे सुरुवातील हे पदोन्नतीचे पद नव्हते, 76 ला हे पद सरळसेवेचे होते 12/4/76 च्या नियमावलीनुसार त्यानंतर ठराव क्र 116 अन्वये दि. 31/10/1996 ला महानगरपालिकेने एक ठराव केला होता त्यामध्ये हे पद पदोन्नतीने भरण्यासंदर्भात सुधारणा करण्यात आलेली होती. यामध्ये ग्रंथपाल आणि अधिक्षक हे दोन्ही पदे सारखेच पद आहे आणि हे पदे पदोन्नतीने भरण्याबाबत सुधारणा करण्यात आली होती त्या ठरावा नुसार. तदनंतर परत 1997 ला ठराव केलेला होता हा जो ठराव केलेला होता दि. 31/10/1996 पदोन्नतीने भरण्याबाबत सुधारणा होती या संदर्भात एक श्री. पानतावणे यांची पदोन्नतीसुध्दा करण्यात आली होती. |
| श्री.संदीप सहारे :— मा.महापौरजी, आता तुम्ही पानतावणे यांचा उल्लेख केला त्यावेळेस पानतावणे जे होते ते दुबे पेक्षा सिनिअर होते त्यांच्याकडे आवश्यक असलेली डिग्री होती हे असतांना पानतावणे यांना डावलण्यात आले. |
| सहा.आयुक्त (श्री.धामेचा) :— मा.महापौरजी, यामध्ये श्री.पानतावणे यांना डावललेले नाही. |
| श्री.सुनिल अग्रवाल :— पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन मा.महापौरजी, मै मा.महापौरजी के माध्यमसे प्रशासनसे जानना चाहॅुगा की एक आदमी को दो जगहा अपॉइंट कर सकते है क्या। |
| सहा.आयुक्त (श्री.धामेचा) :— मी तेच सांगत आहे सर मा.महापौरजी, यामध्ये श्री. पानतावणे यांना डावललेले नाही आहे त्यांना ग्रंथपाल या पदावर प्रथम पदोन्नती दिलेली आहे. |
| श्री.सुनिल अग्रवाल :— मा.महापौरजी, अपने यहा दो पोस्ट है लायब्ररी अधिक्षक और लायब्रिरीअन करके अलग पोस्ट है। तो एक व्यक्ती को दो जगह कैसे रख सकेंगे। एक तो पानतावणे को लायब्रिरीयन बनाना पडेगा नही तो लायब्ररी अधिक्षक बनाना पडेगा। |
| श्री.संदीप सहारे :— लायब्ररी सुप्रीटेंड पर दोनों के दोनो लोग थे और मै नही बोल |

| |
|---|
| रहा मेरे पास जो कागज है आपको पता भी होगा इसके लिये जो कोर्ट ने आर्डर किया मा. महापौरजी, 1996 चा कागद महानगरपालिकेच्या प्रशासनाकडुन प्राप्त झाला आहे याच्यामध्ये श्री.एस.के. पानतावणे, आणि श्री.एच.एन.दुबे, श्री.एस.के पानतावणे यांना दिलेली वेतनश्रेणी श्री. एच.एन.दुबे ला दिलेली वेतनश्रेणी आणि दोन्ही एकाच कॅटीगिरीचे मग दोघही एकाच कॅटेगिरीचे असतांना श्री.एस.के. पानतावणे यांना का नाही देण्यात आली जेव्हा की त्यांच्याकडे शैक्षणिक अर्हता ही होती अनुभव ही होता हे बि.कॉम सर्टीफिकेट कोर्स सोबत त्यांच्याकडे डिग्री असुन त्यांच्याकडे लायब्ररी सायन्स ची डिग्री असुन तरी तुम्ही त्यांना डावलुन यांना कसे दिल. तुम्ही आता नियमाच मला सांगू नका हे कागद तुमच्याच ऑफीसचा आहे. |
| सहा.आयुक्त (श्री.धामेचा) :– इसके बारे में मै पुरी इंन्फॉर्मेशन दे रहा हूँ सर मा.महापौरजी, यामध्ये श्री.पानतावणे यांना यापुर्वीच पदोन्नती ग्रंथपाल या पदावर दिलेली होती 25.8.97 याच्याबाबतीत ठराव केला होता त्याबाबत कोर्टाचे प्रकरण होते त्या संदर्भात मी सांगत आहे. |
| श्री.संदीप सहारे :– मा.महापौरजी, यामध्ये ग्रंथपाल हे पद मोठे आहे की ग्रंथालय अधिक्षक हे पद मोठे आहे. |
| सहा.आयुक्त (श्री.धामेचा) :– मा.महापौरजी, दोन्ही पद समान आहे. |
| श्री.संदीप सहारे :– परंतु वेतनश्रेणी मध्ये कोण जास्त होता अधिक्षक की तो मा. महापौरजी, ज्या अटी आणि शर्ती होत्या त्या अटी आणि शर्तीची पुर्तता झाली नाही. श्री.हरीश दुबे हे 25.03.1981 ला रोजंनदारी कर्मचारी म्हणुन सहा.ग्रंथपाल या पदावर 6 महिन्याकरिता दर महा 290 रुपये या वेतनश्रेणीवर घेतले. रोजगार कर्मचारी म्हणुन मग महानगरपालिकेच्या पदोन्नतीचा नियमाचा भंग करुन महानगरपालिकेचे दिनांक 02.12.1997 रोजी आयोजित केलेल्या सभेत विषय क्र 95 सोबत उपसुचना लावली होती. |
| श्री.सुनिल अग्रवाल :– पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन मा.महापौरजी, श्री.हरीश दुबे इनकी अपॉइंटमेंट रोजंनदारी कर्मचारी करके हुयी थी। लेकीन तत्कालीन ॲडमीनीस्टर ने उनको कंन्फर्म किया था क्या ? ये थोडा पढके बताये। |
| सहा.आयुक्त (श्री.धामेचा) :– मा.महापौरजी, 19/03/1982 ला यांना सहा.ग्रंथपाल म्हणुन प्रशासनव्दारा ऑर्डर दिलेला होता त्याला कंटीन्युशन असा ऑर्डर देण्यात आलेला होता. |
| श्री.सुनिल अग्रवाल :– मा.महापौरजी, ऑर्डर प्रशासन व्दारा दिया था। जिनको तिनो पॉवर है। हाउस का भी पॉवर है, स्टॅडींग कमेटी का भी पॉवर है, और कमीश्नर का भी पावर है। |
| श्री.संदीप सहारे :– मा.महापौरजी, श्री.एस.के पानतावणे होते ते यांच्यापेक्षा वरीष्ठ होते आणि वरीष्ठ असल्यामुळे आता जो प्रकार सांगितले तो ग्रंथपाल आणि ग्रंथालय अधिक्षक या दोन्ही पदा करिता ठराव घेवुन असलेली तरतुद ही रद्य करुन आता हे पद रद्य केले यांनी जेवढे वेगवेगळे पद होते ते रद्य केले आणि ते रद्य करुन ग्रंथालय अधिक्षक हे पद निर्माण केले. माहिती कार्यालयानेच दिली मग ग्रंथालय अधिक्षकांचे पद निर्माण केल्यानंतर ग्रंथालय अधिक्षक म्हणुन जे बी.कॉम सर्टीफिकेट कोर्स करणारे तेथे बसवायला पाहिजे होते की श्री.एस. के.पानतावणे जे शैक्षणिक अर्हता प्राप्त करणारे त्यांना तेथे बसवायला पाहिजे होते. हा माझा खरा मुद्या आहे. श्री.अग्रवाल साहेब माझ्या पेक्षा सिनिअर सदस्य आहे ते या अगोदर उपमहापौरजी या पदावर राहिलेले आहे. यांना माझ्यापेक्षा सदनाची जास्त जानकारी आहे. आपण सर्व पदे गोठवुन ग्रंथपाल अधिक्षक या पदाचे निर्माण केल्यानंतर तेथे हे बसु शकत |

| |
|---|
| होते काय ? त्यावेळेस जी शैक्षणिक अर्हता होती ती पदवीधर आणि बी.लीप. ची पदवी होती त्यांना न बसविता यांना तेथे बसविले, उपसुचनेनुसार त्या वेळेसचे तत्कालीन महापौर जे आता पारदर्शकतेच्या गोष्टी करीत आहे श्री.देव्रेंद्रजी फडणवीस यांनी नोटमध्ये लिहीले. सोबत जेष्ठता आणि शैक्षणिक अर्हता आणि सेवाजेष्ठता मध्ये ते बसत नव्हते हे सर्टीफिकेट कोर्स वाले होते आणि ते पदवीधर आणि बि.लीप. ची डीग्री त्यांनी घेतली होती तरी त्यांना न बसविता यांना बसविले चुकीच्या पध्दतीने अधिक्षक पदावर नियुक्ती झाली असा माझा आरोप आहे. |
| श्रीमती आभा पांडे :— मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर, या प्रकरणामध्ये न्यायालयामध्ये कोणी याचिका दाखल केली होती काय ? आणि त्याचे काय निर्णय लागले, केव्हा केव्हा लागले, आणि कोणत्या दिवसापासुन ग्रंथालय अधिक्षक या पदावर आपण त्यांना रुजु केले ज्यांच्याबाबत हे माहिती विचारत आहे त्यांना म्हणजे आता किती वर्ष झाले ते ग्रंथालय अधिक्षक या पदावर ही सर्व माहिती देण्यात यावी. |
| सहा.आयुक्त (श्री.धामेचा) :— मा.महापौरजी, मा.सदस्या यांनी विचारल्या प्रमाणे महानगरपालिकेचा ठराव क्र 127 दि. 02/12/1997 ला श्री.दुबे यांना पदोन्नती देण्यासंदर्भात याच विषयाच्या अनुषंगाने इंडस्ट्रीयल कोर्टात याचिका दाखल झाली होती. श्री.जोहरी प्रसाद दुबे यांनी ती याचिका दाखल केली होती. त्या ठरावाला त्या वेळेस स्टेटस्को आला होता. नंतर मग तो स्टेटस्को 18 ऑगस्ट 1998 ला इंडस्ट्रीयल कोर्टाने रिजेक्ट केला. श्री.जोहरी प्रसाद यांची जी तक्रार आहे ती रिजेक्ट केली आणि त्या रिजेक्शन च्या तक्रारीमध्ये परत श्री. जोहरीप्रसाद दुबे हे हायकोर्टात गेले होते ती रिट पिटीशन 2697/98 ती याचिका हायकोर्टामध्ये चॅलेंज केली होती. ती याचिका सुध्दा कोर्टाने डिसमीस केली श्री.दुबे यांना पदोन्नती साधारणतः 19 वर्षापुर्वी देण्यात आलेली आहे. |
| श्री.संदिप सहारे :— मा.महापौरजी, हायकोर्टाने जो डिसीजन दिला होता त्या जजमेंटची कॉपी माझ्याजवळ आहे त्यामध्ये हाय कोर्ट असे म्हणते कंन्सीडरींग द कॉलीफिकेशन ऑफ अप्लीकांट ग्रॅज्युएशन विथ बॅचलर ऑफ लायब्रिरी सायन्स हा हायकोर्टाचा निर्णय आहे. हाय कोर्टाने दुबे यांना दया असे नाही म्हणाले, हायकोर्टाने जोहरीप्रसाद दुबे यांना दया असे नाही म्हणाले कारण त्यावेळेस जोहरीप्रसाद दुबे लायबल नव्हते आणि हरीश दुबे हे सुध्दा लायबल नव्हते. |
| श्री. सुनिल अग्रवाल :— मा.महापौरजी पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, मै आपके माध्यम से प्रशासन से जानना चाहूॅगा की, पानतावणेजी को पहले प्रमोशन मिला की दुबेजी को प्रमोशन पहिले मिला। |
| सहा.आयुक्त (श्री.धामेचा) :— मा.महापौरजी, श्री.पानतावणेजी को 25 अगस्त 1997 को प्रमोशन मिला था। |
| श्री.सुनिल अग्रवाल :— मा.महापौरजी, मेरे दोस्त संदीपजी सहारे पुरे कन्फुज हो रहे है, पानतावणेजी ऑलरेडी कोर्ट मे पहुच चुके थे । |
| श्री.संदीप सहारे :— मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, मै आपको जानकारी देना चाहता हुॅं, जब ग्रंथालय अधिक्षक पद का निर्माण किया गया तब अलग अलग पद थे । उनके उपर मै बहस कर रहा हुॅ। |
| श्री. सुनिल अग्रवाल :— मा.महापौरजी, उस समय दोनो पद थे । और दोनो कार्यरत थे। |

| |
|---|
| श्री.संदीप सहारे :– मा.महापौरजी, जब उन्हे पदोन्नती दी गयी तब उस पदोन्नती के संदर्भ मे कार्यालय ने दिया हुआ उत्तर है मै नही बोल रहा हुॅ। ग्रंथपाल पद रद्द करुन ग्रंथालय अधिक्षक पद निर्माण केले मग ग्रंथालय अधिक्षक हे पद निर्माण केल्यानंतर नियमानुसार त्याकरिता पदवीधर आणि बी.लीप. ची पदवी हवी होती परंतु यांच्याकडे बी.कॉम. चे सर्टीफिकेट होते ते नियमामध्ये बसत नाही. (बेल) |
| श्री.सुनिल अग्रवाल :– मा.महापौरजी, 1976 के अनुसार यदी कार्यरत व्यक्ती को पदोन्नती देना है तो उसमे कॉलिफीकेशन की अट शिथील की गयी थी की नही। |
| सहा.आयुक्त (श्री.धामेचा) :– मा.महापौरजी, ठराव क्र 80, 1985 पदोन्नतीने हे पद भरण्याकरिता ही अट शिथील करण्यात आली होती. |
| श्री.संदीप सहारे :– मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर, मुळ कायदयामध्ये बदल केला काय ते सांगा, हा सभागृहामध्ये झालेला विषय आहे आणि तो सभागृहामध्ये चुकीच्या मार्गाने विषय पास करुन घेतो. कायदयामध्ये बसत नसेल तरी तो लागु करु शकतो काय? |
| श्री.मनोज सांगोळे :– मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर, |
| श्री. सुनिल अग्रवाल :– मा.महापौरजी पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन मुझे पुछना है की, सन्माननिय सदस्य श्री.मनोज सांगोळेजी ने कोणसे विषय पर पॉइंट ऑफ ऑर्डर लिया है। आपको बोलना है तो पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन के माध्यम से बोलिये। उनका कोई भी विषय पर पॉइंट ऑफ ऑर्डर नही बनता। |
| श्री.मनोज सांगोळे :– मा.महापौरजी, पॉइंट इंन्फॉर्मेशन, मी 1997 पासुन या सभागृहाचा सदस्य होतो त्यामध्ये 5 ते 6 उपसुचना लागल्या होत्या त्यामध्ये तिळगुळे साहेब होते, दुबे साहेब होते, सिध्दीकी साहेब होते, मोहिते साहेब होते, राऊत साहेब होते आणि प्रल्हाद गजभिये साहेब होते हे होते पण त्यांची उपसुचना लागली होती. सभागृहामध्ये उपसुचना आलीच नव्हती त्यावेळी मिनिटस्ला दीड दीड वर्ष कंन्फर्म व्हायला वेळ लागत होता. (बेल) यामध्ये नंदलाल समितीचा रिपोर्ट मागावा त्याचा मध्ये खरे काय आणि खोटे ही सर्व सत्यता बाहेर येईल. माझी सुचना तुम्हाला पालन करायची असेल करा तो सेवानिवृत्त झालेला कर्मचारी आहे त्याच्याशी काही घेणेदेणे नाही येथे जे बसले आहे त्यांचे देखील घेणेदेणे नाही. शहराच्या विकासासाठी जे मदत करेल त्याच्याशी माझे घेणेदेणे आहे. या सभागृहाचा वेळ वाया न घालवता नंदलाल समितीचा रिपोर्ट मागवा आणि जे आरोपी असतील त्याच्या कारवाई करावी. |
| श्री.दीपक चौधरी :– मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन तेव्हा महानगरपालिकेमध्ये कोणाची सत्ता होती (बेल) |
| महापौर :– सदस्यगण प्रत्येक प्रश्नाला 6 मि. दिलेले आहे. |
| श्री.संदीप सहारे :– मा.महापौरजी, माझ्या प्रश्नावर जे प्रशासनाने उत्तर दिले आहे की सर्व पद गोठवुन ग्रंथपाल अधिक्षक हे पद निर्माण केल्यानंतर त्यांची शैक्षणिक पात्रता तसेच सहा.ग्रंथपाल या पदाचा मुळ वेतन व पगाराची माहिती हा कागद माझ्याजवळ आहे. |
| श्रीमती आभा पांडे :– मा.महापौरजी पॉइंट ऑफ इन्फॉरर्मेशन, मा.महापौरजी मैने आपसे दो प्रश्न किये थे। उसमे से एक प्रश्न का आपने जवाब दिया की कोई तो भी व्यक्ती इंडस्ट्रीअल कोर्ट मे गया वहा उसकी याचिका खारिज हुयी फिर हायकोर्ट मे गया, हायकोर्ट मे जानेके बाद मे उसकी याचिका खारिज हुयी। अब मै आपसे पुछ रही हुॅ, गंथालय अधिक्षक |

| |
|---|
| पद कबसे निर्माण हुआ और जिन व्यक्ती के बारे मे ये बोल रहे है वह अधिकारी कोणसे डेट से यहापर रुजु है। |
| सहा.आयुक्त (श्री.धामेचा) :— मा.महापौरजी, जी याचिका 43/98 कोर्टामध्ये दाखल झाली होती ती कोर्टामध्ये खारिज झाल्यानंतर परत हायकोर्टामध्ये रिटपिटीशन दाखल झालेली होती 269798 नंबरची श्री.जोहरीप्रसाद यांनी दाखल केली होती. ती डिसमीस झाल्यानंतर श्री.दुबे यांना ठराव क्र. 127 दि. 02/12/1997 रोजी ठराव झाल्यानंतर तब्बल 10 महिन्यानंतर श्री. दुबे यांना पदोन्नती देण्यात आली होती. तेव्हापासुन श्री.दुबे हे पदोन्नती होण्यापर्यत कार्यरत आहे. |
| श्रीमती आभा पांडे :— मा.महापौरजी, कोर्टाचा निर्णय लागल्यानंतर 10 महिन्यानंतर दुबे साहेब अधिक्षक पदावर रुजु झाले आणि आज त्यांना 19 वर्ष पुर्ण झाले. आता आमचे बंधु म्हणत होते के जर सदनामध्ये एखादा विषय चुकीच्या मार्गाने निर्णय नगरसेवकांनी घेतला असेल मै यहा इस बात का निषेध करती हुॅ, हमलोग जनप्रतिनिधी है और जनप्रतिनिधी और अधिकारी मिलकर इस शहर को अच्छा बनाने के लिये चाहे वह अधिकारी की बात हो चाहे वह विकासात्मक दृष्टीकोन हो कोई भी गलत निर्णय मे यहा पर बैठे जनप्रतिनिधी इसमे सहभागी नही होता। अगर आप इस तरीके की बात करेंगे सदस्य महोदय तो कही न कही हमारे उपर भी उंगली उठेंगी, अगर कल जो आने वाले नये नगरसेवक जो रहेंगे और लोग हमारे उपर उंगली उठायेंगे। |
| श्री.संदीप सहारे :— मा.महापौरजी पॉइंट ऑफ ऑर्डर, मेरा कहने का मकसद क्या था की या सभागृहामध्ये एखादा चुकीचा ठराव जो नियमबाहय कायद्याला सोडुन असेल, आणि यामध्ये नगरसेवक जर यामध्ये एखादा चुकीचा नियम आणुन.... |
| श्रीमती आभा पांडे :— मा.महापौरजी पॉइंट ऑफ ऑर्डर, चुकीचा निर्णय कसा काय झाला. ती डिग्रीची जी अट होती ती शिथील करण्यात आली. तेव्हा त्यांना पदावर रुजु करण्यात आले.(बेल) |
| महापौरजी :— एका तासामध्ये 10 प्रश्न विचारायचे आहे आणि आपण एका प्रश्नाला इतका वेळ घेत असेल तर बाकीचे प्रश्न केव्हा घेणार आहे. |
| श्री.प्रविण दटके :— मा.महापौरजी, हा विषय घोळात घोळ आहे मा.आयुक्तांना सुचना दयावी की हा विषय त्यांनी तपासुन घ्यावे, आणि पुढच्या सभागृहात याचे उत्तर ठेवावे. |
| श्री.तानाजी वनवे :— मा.महापौरजी, मा.सभासद श्री.संदीपजी यांचा प्रश्न आहे तो नियमाला धरुन आहे असे त्यांचे म्हणणे आहे. मा.सदस्या श्रीमती आभा पांडे पण या ठिकाणी बोलल्या अनेक प्रश्न आहे दटकेजींनी या ठिकाणी सांगितले की संदीपजी जे म्हणत आहे ते बरोबर आहे, कायदा म्हणतो ते बरोबर आहे. की नियमानुसार काय आहे याचे संपुर्ण अधिकार आयुक्तांना दयावे, आयुक्तांनी यांनी सविस्तर रिपोर्ट सादर करावा अशी मी आपणाला विनंती करतो. |
| श्री.संदीप सहारे :— मा.महापौरजी, एक माझी शेवटची सुचना आहे की, श्री.दुबे यांना निगम सचिव ही पदोन्नती दिली ही एक घोळावर घोळ आहे त्याचीही चौकशी व्हावी. निगम सचिव झाले ते ही चुकीच्या पध्दतीने झाले आहे. |
| महापौर :— तुमचा विषय लक्षात आलेला आहे. |
| श्री.संदीप जोशी :— मा.महापौरजी, श्री.दुबे यांची नौकरी लागलेल्या दिवसापासुन ते |

| |
|---|
| आजपर्यंतच्या संपुर्ण प्रकरणाची चौकशी मा.आयुक्तांनी करुन आपल्यापुढे अहवाल सादर करावा. |
| महापौर :— सत्तापक्ष नेत्यांनी दिलेल्या सुचनेनुसार रुलिंग ऐकुन घ्यावे. |
| श्री.संदीप सहारे :— मा.महापौरजी, 1.12.2016 ला राज्य शासनाचा एक ठराव पास झाला होता आणि त्या ठरावामध्ये निगम सचिव या पदाकरिता पदोन्नती देण्याकरिता जी शैक्षणिक पात्रता दिली होती. |
| श्री.सुनिल अग्रवाल :— मा.महापौरजी पॉइंट ऑफ ऑर्डर, यह प्रश्न यहापर नही है तो उनपर बोलने का इनको अधिकार ही नही है। (बेल) |
| महापौर :— मा.सत्तापक्ष नेते, मा.विरोधी पक्ष नेते यांनी दिलेल्या सुचनेसह मा.आयुक्तांनी या विषयात चौकशी करुन अहवाल सादर करावा व अहवालाची एक प्रत श्री.संदीप सहारे यांना देण्यात यावी. |
| **<u>प्रश्न क्र. 10</u>**:— प्र.क्र. 8 येथील इमारतीचे बांधकाम अवैधरित्या करण्यात आले आहे संदर्भात माहिती |
| सौ.आशा उईके (आयेशा) :— मा.महापौरजी अधिनियम 2011 कलम 44 अन्वये अवैध गैर कानुनी बांधकाम प्रभाग 8 येथील मोमिनपुरा, भानखेडा, अन्सार नगर, गोळीबार चौक, दादरा नगर, डोबीनगर विहीर या भागात बहुमंजीले इमारतीचे जाळे असुन येथे बांधकाम मंजुर नकाशा प्रमाणे करण्यात आले आहे काय किंवा तेथे बांधकाम अवैद्य करण्यात आले आहे त्या इमारत मालकावर संबंधित विभागाने कारवाई केली आहे काय किंवा 2000 ते 2016 या कालावधीत ज्या इमारतीचे बांधकाम अवैद्यरित्या करण्यात आले आहे त्या इमारत मालकास कायदेशीर नोटीस देण्यात आली आहे काय  व विभागाकडुन देण्यात आलेल्या नोटीसवर कारवाई करण्यात आली काय? असे अवैद्य बांधकाम असलेल्या एकुन किती इमारती आहे याची रितसर माहिती मला देण्यात यावी. |
| महापौर :— आपल्याला प्रश्नाचे उत्तर दिलेले आहे. |
| सौ.आशा उईके (आयेशा) :— मा.महापौरजी,  उत्तर दिलेले आहे परंतु संबंधितांवर 2007 पासुन कारवाई केव्हा करतील बनलेले घर आहे आणि मला एका घराची ज्या लोकांनी माहिती दिली महानगरपालिकेची परंतु दुसरे घर त्यांचेच असुन त्यांनी या घरापासुन त्या घराला म्हणजे आपल्या घरातुन दुस–या घरी जाण्याचा रस्ता वरुन केलेला आहे त्याची अनुमती घेतलेली आहे काय ? महानगरपालिकेकडुन त्याची माहिती दयावी. |
| महापौर :— प्रशासनाने हा विषय तपासुन हा अहवाल  सादर करावा.<br>**<u>प्रश्न क्र. 11</u>**:— मृतक रोजंदारी /ऐवजदार कर्मचाऱ्यांची नातेवाईकांची भरती /स्थायी संदर्भात माहिती |
| श्री.मनोज सांगोळे :— मा.महापौरजी, ऐवजदार कर्मचारी हा रोजंनदारी कर्मचारी आहे की नियमित काम करणारा कामगार आहे त्यांच्या जागी काम करणार आहे हे सांगावे. |
| महापौर :— प्रशासनाने माहिती दयावी. |
| वैद्यकीय अधिकारी (एस) :— मा.महापौरजी, ऐवजदार हा कर्मचारी जो रेगुलर कर्मचारी काम करतो त्याचा सब्स्टीटयुट म्हणुन घेण्यात आलेला आहे. |
| श्री.मनोज सांगोळे :— मा.महापौरजी, रोजंनदारी कर्मचारी मध्ये त्यांची नियुक्ती झालेली आहे कारण तो 26 दिवस काम करतो 2006 च्या परिपत्रकानुसार स्थायी आणि अस्थायी |

कर्मचारी असा भेदाभेद न करता अनुकंपाची केस लावावी. लाड व पागे समितीव्दारे अस्थायी कामगारांना नियुक्त करावे म्हणुन शासनाचे आदेश आहे माझी अशी विनंती आहे आता नविन कोणता सर्कुलर आला त्याची माहिती मिळाली नाही. सुप्रीम कोर्टाचा जजमेंट कुठे झाला त्याची माहिती मिळाली नाही आणि माझ्या आशीनगर झोनचे असे अनेक कर्मचारी आहे सचिन खारकर, संजु शिर्के, दिवाकर पेंदाम, दिवाकर मेश्राम, बलदेव...., रत्नदिप रामटेके, चक्रपाल समुद्रे, विजय सोमकुंवर, सुधीर कुर्वे, हंसराज सहारे, अजित मेश्राम, असे ऐवजदार कर्मचारी मृत्युमुखी पडले त्यांच्या घरची अवस्था इतकी दयनीय आहे की त्याच्यावर आधारीत जे लोक होते बाहेरचे काम करण्याकरिता जातात शोकांतिका आहे मा.महापौरजी आपण जर त्याच्या ऐवजी च्या कार्ड नविन दिले तर फरक पडणार नाही.

श्री.प्रविण दटके :— मा.महापौरजी, जवळपास 63 ते 64 लोक असे आहे की आपल्याकडे पध्दत सुरु होती परंतु आपल्याकडे माजी आयुक्त होते वर्धने साहेब त्यांनी अनेक असे निर्णय घेतले आणि त्यामध्ये हा एक निर्णय घेतला होता की त्यांना अनुकंपावर घेणे बंद केले. मा. सांगोळे साहेबांचा मुद्दा एकदम उचित आहे आणि ते परिवार असे आहे की त्यांच्या भरवशावर त्यांचा पुर्ण उदरनिर्वाह होता. मग या सभागृहात तो प्रस्ताव आला त्या प्रस्तावाला सभागृहाने मंजुरी दिली. प्रशासनाने तो ठराव विखंडीत करायला शासनाकडे पाठविला आपण शासनाला पत्र पाठविले की हा ठराव विखंडीत करु नये त्याला मंजुरी दयावी हा शासनाकडे आहे जर आपल्या स्तरावर तो होवु शकला तर शासनाकडे जाण्याची गरज नाही माजी आयुक्तांनी अनुकंपामध्ये देवु नये असा प्रस्ताव पाठविला तो आपण सभागृहात नामंजुर करुन तो मंजुर करावा असा निर्णय करुन तो शासनाकडे आहे. माझी आपल्या माध्यमातुन मा.आयुक्तांना विनंती आहे ते 62 ते 63 परिवार आहे त्या परिवारातील संबंधित व्यक्तींना नियमानुसार कार्ड दयावे जेणेकरुन ही प्रथा आपली सुरु राहील. भविष्यामध्ये आपण अनेक ऐवजदारांना परमनंट करणार आहे. टप्पाटप्पाने ते होणार आहे. त्यामुळे भविष्याचा प्रश्न संपुन जाईल. जो पर्यत आपण ऐवजदार परमनंट करीत नाही तो पर्यत हे अनुकंपा सुरु करावे.

श्री.प्रफुल गुडधे :— मा.महापौरजी, सर्कुलर मध्ये स्पष्ट लिहीले आहे की, अनुकंपाची नियुक्ती करीत असतांना स्थायी व अस्थायी असा भेद करु नये त्यामुळे अस्थायी जरी कर्मचारी असला तरी त्यांच्या वारसांना हा नियम लागु करण्यात यावा आणि शासनाकडे जो ठराव विखंडीत करण्यासाठी पाठविला तो शासनाने विहीत कालावधी मध्ये जर पाठविला नाही तर मा.आयुक्तांना ॲटोमॅटीकली तो अधिकार प्राप्त होतो.

महापौर :— आयुक्तांच्या अधिकारात ते आहे त्यामुळे ते कार्यवाही करतील.

श्री.प्रफुल गुडधे :— मा.महापौरजी, आपण असे दिशा निर्देश दयावे जो ठराव महानगरपालिका सभागृहाने मंजुर केला होता त्याला इम्प्लीमेंट करण्यासाठी प्रयत्न करावे.

महापौर :— महानगरपालिका आयुक्त या संबंधित प्रकरणाची चौकशी करुन कार्यवाही करावी.

**<u>प्रश्न क्र. 12</u>** :— मलेरिया फायलेरिया या विभागा तर्फे कोणत्या पद्धतीचे कामे करण्यात येत याची माहिती देण्या संदर्भात माहिती

श्री.प्रदीप पोहाणे :— मा.महापौरजी, मी प्रश्न विचारला होता की मलेरिया फायलेरिया या विभागाअंतर्गत कोणत्या पध्दतीने कामे करण्यात येते याची माहिती दयावी.

महापौर :— तुम्हाला लिखीत स्वरुपात माहिती दिली आहे

| |
|---|
| श्री.प्रदीप पोहाणे :— मा.महापौरजी, माहिती या सभागृहातील सर्व सदस्यांना माहिती झाली पाहिजे आणि ही जी माहती दिली आहे ती अर्धवट स्वरुपात दिलेली आहे. आणि यामध्ये लिहीले आहे की रात्रीच्या वेळी कर्मचारी काम करतात. येथे एवढे सर्व सदस्य आहे यांना खरचं विचारा की रात्रीच्या वेळी कर्मचारी ऐवुन या पध्दतीचे कामे करतात काय ? जो मलेरिया फायलेरिया हा विभाग आहे या विभागाची जी कार्यप्रणाली आहे त्या पध्दतीनुसार ते काम कुठलेही करीत नाही. आणि या विभागाची जबाबदारी कुणाकडे आहे ते माहित नाही. |
| महापौर :— प्रशासनाने माहिती दयावी. |
| श्रीमती थोटे (मलेरिया फायलेरिया अधिकारी) :— मा.महापौरजी, मा.सदन मी जयश्री थोटे मलेरिया फायलेरिया अधिकारी माझ्याकडे ही जबाबदारी आहे. |
| श्री.प्रदीप पोहाणे :— मा.महापौरजी, जे झोनमध्ये 10 सभापती आहे कधी यांनी येवुन आपला परिचय दिला की यांच्याकडे कोणता विभाग आहे की आम्ही फक्त याला त्याला फोनच लावायचा की मच्छरासाठी फवारणीची गाडी कोण पाठवेल, पाणी साचले आहे त्यामध्ये दवाई कोण टाकेल, त्याची जबाबदारी कोणाची आहे. जसे हेल्थ विभागाचे इन्सपेक्टर आहे तसे यांचे इन्स्पेक्टर आहे काय ? |
| श्रीमती थोटे (मलेरिया फायलेरिया अधिकारी) :— मा.महापौरजी, माझ्याखाली फायलेरिया आणि मलेरिया इन्स्पेक्टर असतात त्यांच्या खाली एस.एफ.डब्लु. म्हणुन वरीष्ठ क्षेत्र अधिकारी असतात, त्याच्याखाली फिल्डवर्कर क्षेत्र कर्मचारी असतात फिल्डमध्ये ते वर्कींग करतात |
| श्री.प्रदीप पोहाणे :— मा.महापौरजी, मलेरिया फायलेरिया याला कंट्रोल करण्यासाठी कुठल्या पध्दतीने कामे केल्या जाते मला एक माहिती आहे की साप्ताहीक आपण अळीनाशक फवारणी करण्याचे काम आहे. त्यांचा शोध घेवुन तेथे दवाई टाकण्याचे काम आहे, जेथे छोटेमोठे नाले आहे तेथे पाणी थांबले आहे त्याला सुरुळीत करणे या पध्दतीचे काम आहे. अशा पध्दतीचे आपल्याला काम करावे लागते त्याचबरोबर कुलर तपासणी करण्याचे काम आहे जनतेमध्ये जनजागृती करण्याचे काम आहे असे यामध्ये असे कुठलेही लिखीत स्वरुपामध्ये लिहीलेले नाही. |
| श्रीमती थोटे (मलेरिया फायलेरिया अधिकारी) :— मा.महापौरजी, प्रश्न क्र. 1 ला आहे त्यामध्ये मलेरिया फायलेरिया विभागातर्फे कोणत्या पध्दतीचे काम आहे त्यामध्ये मी विस्तीर्ण माहिती दिली आहे. |
| महापौर :— सर्व प्रश्नांची व्यवस्थित माहिती यामध्ये दिलेली आहे. |
| श्री.प्रदीप पोहाणे :— मा.महापौरजी, माहिती ही अर्धवट स्वरुपामध्ये आहे. |
| श्री.नरेंद्र उर्फ बाल्या बोरकर :— मा.महापौरजी त्याचा प्रश्न असा आहे की जे हत्तीरोग विभागाचे कर्मचारी आहे ते रात्री घुमतात ते खरच घुमतात काय ? हा प्रश्न आहे. |
| श्रीमती थोटे (मलेरिया फायलेरिया अधिकारी) :— मा.महापौरजी रात्रीच्या वेळी जो सर्व्हे चालतो तो मलेरिया फायलेरिया डिटेक्ट करण्यासाठी आणि तो स्लम एरियामध्ये चालतो तेथे फिल्ड वर्कर आणि एस.एफ.डब्लु. काम करतात. |
| श्री.नरेंद्र उर्फ बाल्या बोरकर :— मा.महापौरजी, ते नगरसेवकांना भेटुन सांगतात काय की आम्ही हत्तीरोगाच्या ऐवढे पेशंट डिटेक्ट केले हा त्यांचा प्रश्न आहे. |
| श्री.प्रदीप पोहाणे :— मा.महापौरजी, नागपूर शहरामध्ये क्षेत्रीय कर्मचारी म्हणुन 243 कर्मचा—यांची जी नियुक्ती आहे तेवढे कर्मचारी खरच आपल्याजवळ आहे काय ? मला असे |

| |
|---|
| उत्तर दिले आहे की जे क्षेत्रीय कर्मचारी आहे जे घरोघरी फवारणी करायला येतात यामध्ये माझ्या लकडगंज झोनध्ये 16 कर्मचारी आहे म्हणजे प्रत्येक प्रभागामध्ये 4 येथे कर्मचारी दिलेले आहे त्यामध्ये कमीत कमी प्रत्येक प्रभागामध्ये 35 ते 40 कर्मचारी पाहिजे. |
| श्रीमती थोटे (मलेरिया फायलेरिया अधिकारी) :— मा.महापौरजी, सन्माननिय सदस्यांचे म्हणणे बरोबर आहे मा.महापौरजी, आपल्याकडे स्टाफ कमी आहे परंतु अपु—या स्टाफ मध्ये आपण पुर्ण शहर कव्हर करण्याचे काम करतो. |
| श्री.अविनाश ठाकरे :— मा.महापौरजी, मलेरिया फायलेरिया विभागाची जी संपुर्ण माहिती आहे ती सर्व सन्माननिय नगरसेवकांपर्यत पोहचावी त्या अनुषंगाने आपण प्रशासनाला असे निर्देश दयावे की झोनमध्ये जे कोणी प्रमुख असतील त्यांनी नगरसेवकांना संपुर्ण माहिती दयावी मलेरिया फायलेरिया विभागाचे काम कसे चालते, कोण कोण कर्मचारी आहे कुणाकडे जबाबदारी आहे, नगरसेवकांना जावुन भेटावे अशी सन्माननिय सदस्य श्री.पोहाणे यांची इच्छा आहे. |
| महापौर :— मलेरिया फायलेरिया अधिका—यांनी त्या त्या भागातील नगरसेवकांना या सर्व ॲक्टीव्हीटीची माहिती दयावी.<br>**<u>प्रश्न क्र.13</u>** :— डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, पोस्ट ऑफिस जवळ नागपूर फ्लॅ. क्र. 101 व 102 निवासी गाळयात डॉ. भावतकर हयांचे सोनोग्रॉफि व फिजिओ थेरेपी केंद्र संदर्भात माहिती |
| ॲड. धर्मपाल मेश्राम :— मा.महापौरजी, माझा प्रश्न असा आहे की, डॉ.बाबासाहेब मार्ग, इंदोरा पोस्ट ऑफिस जवळ नागपूर, या निवासी इमारती मध्ये नागपूर फ्लॅ.क. 101 व 102 मध्ये डॉ.भावतकर यांचे सोनोग्राफी व फिजिओ थेरेपी सेंटर सुरु आहे हे खरे आहे काय? |
| डॉ.बहीरवार :— मा.महापौरजी, मी डॉ.बहीरवार सद्या डॉ.चिव्हाने रजेवर असल्यामुळे मी त्यांचा चार्ज बघत आहे. डॉ.भावतकर यांचे जे सेंटर आहे 25.03.2000 पासुन सुरु आहे. |
| ॲड.धर्मपाल मेश्राम :— मा.महापौरजी, माझ्या प्रश्नांचे उत्तर त्यांनी दयावे. |
| श्री.प्रविण दटके :— मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन धर्मपाल मेश्रामांचा प्रश्न एवढाच आहे की, निवासी गाळयामध्ये अशा डिस्पेन्सरी चालवु शकतो काय? इतका सोपा प्रश्न आहे. आणि मा.महापौरजी याच्यात आज पर्यतजी फाईल आहे त्याकरिता झोनच्या सहा. आयुक्तांना सुध्दा येथे बोलविण्यात यावे त्यांच्याकडे पण काही माहिती आहे दोघांनी मिळुन जर उत्तर दिले तर हा प्रश्न येथे सुटुन जाईल आणि यात कुठलेही प्रकरण न्यायप्रविष्ट नाही. महानगरपालिकेची कुठलीही केस न्यायालयामध्ये सुरु नाही अशी माझी माहिती आहे. पण याच्या पेक्षा जास्त माहिती जर तुमच्याकडे असेल तर ती पण द्यावी. |
| ॲड.धर्मपाल मेश्राम :— मा.महापौरजी,या सोबत मी विनंती करतो की, ए.डी.टी.पी. यांनी देखील या प्रश्नाच्या उत्तरासाठी यावे. |
| सहा.आयुक्त (श्री.हुमणे) :— मा.महापौरजी, मा.सभागृह सदर प्रकरण मी थोडे ब्रिफ करु इच्छितो या प्रकरणामध्ये श्री.रविंद्र गजभिये आहे हे तक्रारकर्ते आहे आणि डॉ.भावतकर..... |
| ॲड.धर्मपाल मेश्राम :— मा.महापौरजी या प्रश्नामध्ये कोणत्याही अर्जदाराचे नाव घेण्याची गरज मी समजत नाही. प्रश्नाला अनुरुप तुम्ही उत्तर दयावे. ब्रिफींग करायची आवश्यकता नाही अगोदर प्रश्नाचे उत्तर दिले पाहिजे. |
| श्री.प्रविण दटके :— मा.महापौरजी, सभागृह नियम निकषाप्रमाणे चालते जर प्रश्न |

| |
|---|
| विचारलेल्या माणसांनी जर चुकीचा प्रश्न विचारला असेल तर सांगावे प्रश्न चुकीचा आहे. |
| सहा.आयुक्त (श्री.हुमणे) :— मा.महापौरजी, प्रश्न एकदा रिपीट करावे. |
| श्री.प्रविण दटके :— मा.महापौरजी, प्रश्न त्यासोबतच जोडलेला आहे. |
| श्री.संदीप जोशी :— मा.महापौरजी, नगररचना विभागाने याचा अवैध वापर थांबवावा अशा पध्दतीची नोटीस संबंधितांना दिलेली होती काय ? |
| सहा.आयुक्त (श्री.हुमणे) :— मा.महापौरजी, होय हे खरे आहे. |
| श्री.संदीप जोशी :— मा.महापौरजी, तर झोनतर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली. |
| सहा.आयुक्त (श्री.हुमणे) :— मा.महापौरजी, नगररचना विभागाकडुन आशीनगर झोनला नोटीस प्राप्त झाल्यानंतर 1 फेब्रुवारी 2016 ला. नोटीस देण्यात आली त्या नोटीस मध्ये आवश्यक असलेल्या परवानगी शिवाय अनधिकृत वापर थांबवावा. या प्रकारची नोटीस दिली होती. |
| श्री.संदीप जोशी :— मा.महापौरजी, नोटीस दिल्यानंतर वापर थांबला काय? |
| सहा.आयुक्त (श्री.हुमणे) :— मा.महापौरजी, नाही. |
| श्री.संदीप जोशी :— मा.महापौरजी, कारवाईचा अधिकार कोणाला आहे. |
| सहा.आयुक्त (श्री.हुमणे) :— मा.महापौरजी,यामध्ये मा.उच्च न्यायालय यांनी 16मार्च 2016 रोजी यामध्ये निर्णय दिलेला आहे. |
| ॲड.धर्मपाल मेश्राम :— मा.महापौरजी, यामध्ये काय निर्णय दिलेला आहे जरा वाचुन सांगावे. |
| सहा.आयुक्त (श्री.हुमणे) :— मा.महापौरजी, यामध्ये निर्णय असा दिलेला आहे की जी पिटीशनर आहे पिटीशनरनी त्या परिसरामध्ये न्युसन्स आणि इनकनव्हीनिअन्स होते ते प्रुव्ह करावे. |
| श्री.प्रविण दटके :— मा.महापौरजी, कोणी प्रुव्ह करायचे आहे काय करायचे आहे हा मुद्दा नाही जर नगररचना अधिका—यांनी निर्णय दिला तर तो चुकीचा दिला काय? त्यांचा नोटीस चुकीचा होता काय? आणि जर नोटीस दिला तर ज्या ॲथॉरिटीला कारवाई करण्याचा अधिकार आहे त्यांनी काय केले. |
| सहा.आयुक्त (श्री.हुमणे) :— मा.महापौरजी, याच्यामध्ये नगररचना विभागाने कुठलाही निर्णय दिलेला नाही. |
| श्री.संदीप जोशी :— मा.महापौरजी, नगररचना विभागाने अवैद्य बांधकाम आहे असे स्पष्ट सांगितले |
| श्री.दयाशंकर तिवारी :— मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉरमेशन नगररचना विभागाने झोन को एक पत्र दिया की उस इमारत का वापर जिस परपझ के लिये सॅग्शन किया गया है उसके विपरीत किया जा रहा है, इसलिये उसपर कारवाई करो जिस के लिये काम सॅग्शन है उसके विपरीत वे काम कर रहे है इसके लिये कारवाई क्यों न की जाये, ऐसा पत्र देना चाहिये था। इन्होने पत्र यह दिया की आप जिस परपझ के लिये उपयोग कर रहे उसकी एन.ओ.सी. क्यों नही ली । इसका मतलब इसको न्यायालय से दाद मिलना चाहीये इसलिये इन्होने मदत की। मा.महापौरजी नगररचना विभगने सिधा लिखा जिस परपझ के लिये सॅग्शन मिला उसके विपरीत इसका उपयोग हो रहा है इसलिये कारवाई की जाये। इन्होने इसको |

| |
|---|
| यह प्रश्न पुछा की आप जिस काम के लिये उपयोग कर रहे है उसके लिये आवश्यक बातों की जानकारी आपने परिपुर्ण क्यों न की जब उपयोग ही गलत है तो तुरंत कारवाई होनी चाहिये थी। कही ना कही इनके मुलभाव जो कारवाई करने के नही है इसी के लिये सामने वाले व्यक्ती को मदत करने के लिये यह कर रहे है इन्हीपर दंडात्मक कारवाई होना चाहिये ऐसा निर्णय सभागृह ले। |
| श्री.प्रफुल गुडधे :— मा.महापौरजी सन्माननिय दयाभय्या ने जे सांगितले ते या ठिकाणी जो वापर आहे त्याचा गैरवापर होत आहे, तेथे हॉस्पीटल सुरु आहे आणि तेथील रहिवासी त्रस्त झाले त्यांनी सातत्याने तक्रारी करुन राहिले आणि तक्रारी केल्यानंतरही त्याच्यावर कुठलीही कारवाई करीत नाही. सहा.आयुक्त तेथे काही कारवाई करणार नाही आता पर्यत त्यांचा जो अनुभव राहिला. अनुभवावरुन ते काही कारवाई करतील असे काही वाटत नाही. आणि रहिवाशांनी किती दिवस कोर्टकचे—या कराव्यात हाय कोर्टामध्ये जावे सिव्हील कोर्टात जावे, त्यामुळे आपण स्पष्ट निर्देश दयावे की या संपुर्ण प्रकरणामध्ये डॉ.भावतकर बंधु यांचे जे हॉस्पीटल आहे ज्याच्यामुळे स्थानिक रहिवाशांना त्रास होत आहे तातडीने बंद करण्यात यावे त्याला सिल करण्यात यावे अशा प्रकारचे निर्देश मा.महापौरजी आपण दयावे. |
| श्री.प्रविण दटके :— मा.महापौरजी, प्रफुलजीने म्हटले तो तर विषय आहेच पण भावतकरांनी एक ॲफीडीव्हीट दिले आहे की येथे कुठल्याही प्रकारचे येथे डीन्स्पेन्सरी आणि क्लीनीक चालत नाही त्याची कॉपी आहे. त्याची कॉपी आपल्या प्रश्नाला लागली आहे हे असतांना सुध्दा आपले सहा.आयुक्त आपले प्रशासन त्यावर कारवाई करायला का मागे पुढे पाहत आहे हाच प्रश्न आहे. हा विषय गेल्या 3 वर्षापासुन सुरु आहे यात डॉ.मेश्राम, डॉ. गणवीर, डॉ.दासरवार, मा.सहा.आयुक्त,.ए.डी.टी.पी हे सर्वजण याच्यात आहे म्हणुन मा. महापौरजी या प्रकरणाची चौकशी आयुक्तांनी करावी आणि चौकशी अंती ताबडतोब हॉस्पीटल बंद करावे. |
| श्री.संदीप जोशी :— मा.महापौरजी आजच्या आज हे हॉस्पीटल त्या ठिकाणाहुन बंद करावे त्यानंतर चौकशी करुन जे काही होईल तो निर्णय त्यानंतर घेण्यात यावा. |
| श्री.मनोज सांगोळे :— मा.महापौरजी अशी जी काही प्रकरणे नागपूर शहरामध्ये असतील त्याचीही याच माध्यमातुन चौकशी करावी. |
| महापौर :— सन्माननिय सदस्यगण विषय अत्यंत गंभीर आहे या प्रकरणात आजच्या आज ते हॉस्पीटल बंद करुन आयुक्तांनी त्याच्यावर नियमानुसार कार्यवाही करायची आहे आणि जे अधिकारी यामध्ये दोषी असेल त्यांची चौकशी करुन त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी. |
| **<u>प्रश्न क्र.14</u>**:— नागपूर शहरात जागोजागी मोठया प्रमाणात अवैध बाजारपेठ लागत असल्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण संदर्भात माहिती |
| श्री.विजय झलके :— मा.महापौरजी, नागपूर शहरात असलेल्या अवैध बाजार या संदर्भात प्रश्न विचारला आहे त्या संदर्भात प्रशासनाने उत्तर दयावे. |
| महापौरजी :— प्रश्नाच्या संदर्भात उत्तर पण आपणाला दिलेले आहे. |
| श्री.विजय झलके :— मा.महापौरजी, उत्तरामध्ये आणखी विस्तृत माहिती पाहिजे. माझा पहिला प्रश्न होता नागपूर शहरात जागोजागी मोठया प्रमाणामध्ये अवैध बाजारपेठ लागत आहे त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. जे बाजार लावतात जे रस्त्यावर त्या सळाखीने खोदतात त्यामुळे महानगरपालिकेचे रस्ते खराब होतात त्यामुळे नागरिकांना त्याचा प्रचंड त्रास |

| |
|---|
| सहन करावा लागतो तसेच त्या अवैध बाजाराचे मोठया प्रमाणात चैन स्नॅचिंगचे प्रकार होतात त्यामध्ये नुसन्स तयार होते त्या करिता प्रशासनाने उत्तर दिले त्यामुळे बाजार विभाग संबंधित झोन व अतिक्रमण विभाग यांनी कारवाई करणे अपेक्षित आहे. मात्र काल आपल्या बजेटच्या चर्चेमध्ये मी बोलल्या प्रमाणे बाजार सायंकाळी लागतात आणि अतिक्रमण कारवाई दिवसा होते ती संध्याकाळी पण सुरु होणार काय ? या संदर्भात प्रशासनाने उत्तर दयावे. दुसरा जो प्रश्न होता त्या अनुषंगाने की या बाजारामुळे जो केरकचरा  निर्माण होतो त्याची विल्हेवाट लावण्यासंदर्भात मा.महापौरजी मी याकडे आपले विशेष लक्ष वेधु इच्छितो या संदर्भात काल दिनांक 19/06/2017 रोजी एक परिपत्रक काढले घनकचरा व्यवस्थापन 2017 चे घणकच–याची विल्हेवाट लावण्यासंदर्भात संबंधित बाजार निरीक्षक व संबंधित स्वच्छता निरीक्षक यांच्यावर जबाबदारी देण्यात आली आहे यासंदर्भात प्रश्न विचारल्यानंतर काल परिपत्रक काढले काय ? या संदर्भात प्रशासनाने उत्तर दयावे. |
| सहा.आयुक्त (श्री.मेश्राम) :– मा.महापौरजी, अवैध बाजारामुळे केर कचरा निर्माण होतो त्याच्यावर कारवाई करण्यासंदर्भात मा.सदस्यांनी प्रश्न विचारला होता प्रश्न म्हटल्यापेक्षा माहिती विचारली होती. अवैध बाजारामुळे केरकच–याची विल्हेवाट लावण्याकरिता महानगरपालिकेत अतिरिक्त बोजा सहण करावा लागत आहे गोष्ट खरी आहे. आपला स्वास्थ विभाग मॅन पॉवर वापरुन स्वच्छता करते परंतु हा अतिरिक्त पडणारा बोजा हा महाराष्ट्र अधिनियमामध्ये अवैध बाजार करणाऱ्यांना हॉकर्स पॉलिसी अंतर्गत नोंदणीकृत करुन घेवुन हॉकर्स पॉलिसी अंतर्गत शहर पथ विक्रेता समिती गठीत करण्यात आली होती त्या विरुध्द हे न्यायलयीन प्रकरणात जे आदेश पारीत झाले जी कारवाई करण्यात आली त्यावर स्टेटस्को आल्यामुळे जी नविन पथ विक्रेता समिती गठीत होईल त्या आधारे... |
| श्री.विजय झलके :– मा.महापौरजी, जे स्टेटस्को न्यायालयामध्ये आहे  ते प्रकरण 6215/2 दिनांक 30/1/2017 रोजी स्टेटस्को प्राप्त झाला आणि 30/1/2017 पासुन स्टेटस्को प्राप्त झाल्यानंतर आता न्यायालयामध्ये लिगल डिपार्टमेंटने या संदर्भात काही कारवाई केली आहे काय ? त्या संदर्भात माहिती दयावी. |
| सहा.आयुक्त (श्री.मेश्राम) :– मा.महापौरजी, संबंधित प्रकरणात महानगरपालिकेची बाजु मांडणारे कायद्याचे सल्लागार आहे त्यांनी आपले अभिमत दिले आहे स्टेटस्को असल्यामुळे पुर्वीच्या पथ विक्रेता समितीने घेतलेला निर्णय आणि आवंटीत केलेले हॉकर्स झोन यांच्यावरती कारवाई होवु शकणार नाही जो पर्यत स्टेटस्को रद्य होणार नाही, असे अभिप्राय कायद्याचे सल्लागार श्री.कासट साहेबांनी दिले आहे. |
| श्री.विजय झलके :– मा.महापौरजी, मी प्रश्न विचारला नागपूर शहरात विविध जागा डी. पी. रिझर्वेशन व्दारे आरक्षण दिले आहे त्या संदर्भात प्रशासनाने जे उत्तर दिले आहे या संदर्भात त्यांनी यादी दिलेली आहे नागपूर शहरात अधिकृत असलेल्या 25 बाजारांची यादी संलग्न आहे आणि डी.पी. प्रमाणे पॉइंट हेक्टर आर प्रमाणे डी.पी. मध्ये आरक्षीत करणे गरजेचे आहे. मला असे वाटते आपल्या शहराची लोकसंख्या 25 लाख जरी गृहीत धरली तरी 250 बाजाराचे डि.पी. मध्ये आरक्षण करणे गरजेचे आहे आता मात्र प्रत्यक्षात 25 मार्केट उपलब्ध आहे. मोठया प्रमाणात अवैध बाजार नागपूर शहरात लागत आहे. आपण स्मार्ट सिटीकडे चाललो आहे स्मार्ट सिटीचा पुर्ण सत्यानाश होत आहे वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे |

| |
|---|
| न्युसन्स क्रियेट होत आहे  या संदर्भात प्रशासनाने माहिती दयावी. |
| सहा.आयुक्त (श्री.मेश्राम) :- मा.महापौरजी, सन्माननिय सदस्यांनी उपस्थित केलेली माहिती ही खरी आहे. डी.सी.आर नुसार 10 हजार पॉप्युलेशन करिता पॉइंट 2 हेक्टर म्हणजे 2000 स्केअर फुट वैध मार्केट असायला पाहिजे. पॉप्युलेशन जर 25 लाख पकडले तर 250 वैध मार्केट नागपूर शहरात असायला पाहिजे आणि जो डि.पी. तयार केलेला होता 10/09/2001 ला त्या तरतुदी त्या वेळेस ठेवलेल्या होत्या त्या तरतुदीच्या अनुषंगाने 25 मार्केट करिता जागा आरक्षीत ठेवण्यात आली  ती माहिती सदस्यांना दिलेली आहे. जेव्हा नविन डि.पी तयार होईल 2019-2020 ला या बाबींचा अंतर्भाव करण्याकरिता नगररचना विभागास विनंती करण्यात येईल. |
| श्री.विजय झलके :- मा.महापौरजी, या अनुषंगाने जी समिती आहे ती समिती स्थापन करुन जे अवैध बाजार आहे त्याचा पुर्ण सर्व्हे करुन जे मासिक शुल्क आपण आकारणार आहे ते शुल्क किती प्रमाणात व किती राहणार आहे त्याची माहिती सांगावे. |
| सहा.आयुक्त (श्री.मेश्राम) :- मा.महापौरजी, पथशुल्क आकारण्याचा अधिकार हा पथविक्रेत्या समितीला दिलेला आहे 2016 महाराष्ट्र पथविक्रेत्या नियमा अंतर्गत |
| महापौर :- प्रश्नोत्तराचा 1 तास संपलेला आहे 3 प्रश्न उरलेले आहे आपली संमती असेल तर पुढील 3 प्रश्न घेता येईल व त्यांना प्रत्येकी 5 मी. देण्यात येईल. |
| सहा.आयुक्त (श्री.मेश्राम) :- मा.महापौरजी, जेव्हा पथविक्रेता समिती गठीत होईल आणि पथविक्रेता समितीला तो निर्णय घ्यायचा आहे की पथविक्री शुल्क किती आकारायचे त्या निर्णयानुसार आकारणी करण्यात येईल. |
| श्री.विजय झलके :- मा.महापौरजी, प्रशासनाने जे आता उत्तर दिले परंतु 2016 -17 ची पथविक्रेता समिती केव्हा स्थापन होणार आहे. |
| महापौर :- मा.सदस्यांनी विचारलेले प्रश्न खुप चांगले आहे आपल्या समाजाच्या हिताचे आहे त्याच्यावर विचार करुन मार्गक्रमण करावे. |
| **प्रश्न क 15**:- स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक या पदाच्या पदोन्नती संदर्भात माहिती |
| श्रीमती हर्षला साबळे :- मा.महापौरजी, मला प्रश्नाचे उत्तर मिळालेले आहे ही प्रक्रीया आपण कधी पर्यत पुर्ण करणार आहात. |
| महापौर :- प्रशासनाने उत्तर दयावे. |
| सहा.आयुक्त (श्री.धामेचा) :- मा.महापौरजी, सन्माननिय सदस्या श्रीमती हर्षला साबळे यांनी कनिष्ठ अभियंता यांच्या पदोन्नती बाबत काही सुचना केलेल्या आहे. या संदर्भात मी सांगु इच्छितो की या पुर्वी एक्झीकेटीव्ह इंजिनिअर, यानंतर उपअभियंता यांचे प्रमोशन केल्यामुळे 40 जागा उपअभियंताच्या रिक्त झालेल्या आहेत त्यामुळे सद्याच्या घडीला कनिष्ठ अभियंतांच्या 61 जागा रिक्त आहे या जागा भरण्यासाठी रोस्टर तपासण्याची कार्यवाही विभागीय कार्यालयाकडुन केलेली आहे. रोस्टर प्रक्रीया पुर्ण झाल्यावर पदोन्नतीची  प्रक्रीया पुर्ण करु ही प्रक्रीया साधारणतः 1 महिन्यामध्ये होवु शकेल |
| **प्रश्न क्र. 16** :- नागपूर शहरातील म.न.पा. कडून देण्यात येणाऱ्या मुलभूत सुविधेत (आरोग्य, शिक्षण, पाणी वितरण प्रणाली व रस्ते) संदर्भात माहिती |
| श्री.ऋषिकेश उर्फ बंटी शेळके :- मा.महापौरजी, प्रश्न असा होता की आपल्या शहरामध्ये महानगरपालिकेकडुन मुलभुत सुविधा प्रदान करतो ते आरोग्या सबंधित असो, |

| |
|---|
| शिक्षणासंबंधित असो, रस्त्यासंबंधित असो, की पाण्यासंबंधित असो, जी काही विस्तृत माहिती या कागदावरती प्रशासनाकडुन मिळालेली आहे, पण यात विस्तृत माहिती अजुन चांगल्या पदधतीने दयावी, ही माहिती काय आहे या माहिती मध्ये म्हटले आहे की तुम्ही या संकेत स्थळावर जा तुम्हाला माहिती मिळेल. |
| निगम आयुक्त :— मा.महापौरजी, सन्माननिय सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे तो असा आहे की नागपूर महानगरपलिकेत आपण आयुक्त म्हणुन नियुक्त झाल्यानंतर आरोग्य,शिक्षण, पाणीवितरण, प्रणाली व रस्ते यात कोणकोणते परिवर्तन करणार आहात याच्या बाबतीत आपली भुमिका स्पष्ट करावी. परिवर्तनचा जो विषय आहे तर परिवर्तनच्या बाबतीत मी सांगु इच्छितो की सद्यस्थिती मध्ये आरोग्य, शिक्षण, पाणी वितरण व रस्त्यांच्या बाबतीत कालच सन्माननिय सभागृह जे आहे त्यांनी अत्यंत विस्तीर्ण अशी चर्चा केलेली आहे महानगरपालिकेचे धोरण या चारही विषयाच्या बाबतीत आहे याची सर्व सदस्यांना विस्तृत माहिती दिलेली आहे. माझा आयुक्त म्हणुन प्रयत्न असा राहणार आहे की या सर्व सभागृहाने जे निर्णय घेतले आहे त्यांना विहीत मुदतीमध्ये आणि पारदर्शीपणे करण्याच्या दृष्टीकोनातुन माझी भुमिका राहणार आहे. आणि यामध्ये प्रामुख्याने आपला पुढचा जो प्रश्न विचारला आहे की स्मार्ट सिटीकडे आपले शहर वाटचाल करत आहे स्मार्ट शहराकडे वाटचाल करीत असतांना नागपूर शहरामध्ये रस्ते, स्वच्छता, पाणी वितरण आणि शिक्षण, आरोग्य या ज्या सुविधा उत्कृष्ट दर्जाच्या असायला पाहिजे या करिता सभागृहाने जे धोरण ठरविले आहे त्याला चांगल्या पध्दतीने इम्प्लीमेंट करण्याचे माझे धोरण राहणार आहे. |
| महापौर :— सन्माननिय सदस्यांचे उत्तर मा.आयुक्तांनी दिले आहे परंतु प्रश्न थ्रु द पॉइंट नाही आहे व्हेग प्रश्न आहे. |
| श्री.ऋषिकेश उर्फ बंटी शेळके :— मा.महापौरजी, मी मा.आयुक्त साहेबांचे आभार मानतो त्याच्यावर पुर्ण भरवसा आहे की आम्ही विचारलेल्या प्रश्नाचे ते कशा न कशा पध्दतीने निराकरण करणार परंतु ते येथे किती काळापर्यत राहणार ते माहिती नाही मागे जेव्हा शिवाजी पुतळयावर उपोषणावर बसलो होतो तेव्हा माहिती नाही अशा घडामोडी घडल्या तेव्हा माजी आयुक्त साहेबांची बदली दुसरीकडे झाली होती मा.हर्डीकर साहेबांनी जे या अगोदर निवेदन दिले होते त्या निवेदनानुसार त्यांनी अनेक गोष्टी अंमलबजावणी करण्याकरिता पाउले उचलली होती परंतु पाउले उचलल्यानंतर पुन्हा मला उपोषणावर बसावे लागणार काय ? माझ्या सोबत सदस्यांना बसावे लागणार काय? मा.आयुक्त साहेबांशी या अगोदर भेटायला गेले असता व्यवस्थित 45 ते 48 मि. देवुन त्यांनी या मुलभुत प्रश्नांचे निराकरण करण्याचा प्रयत्न केला परंतु म्हणण्याचा उद्येश असा होता की आपण या सर्व बाबी आपण दुर केव्हा करु, रोजा महिना सुरु आहे या रोजामध्ये मा.गडकरी साहेबांच्या घराच्या बाजुला जर आपण त्यांच्या छतावरुन बघितले तर किल्ला चा जो प्रभाग आहे त्या भागात रोजा महिना सुरु राहिल्यानंतरही अर्धा तास पाणी आपण देत नसु तर याच्याहुन मोठी शोकांतिका राहणार आहे हा फक्त पाण्याचा प्रश्न दुसरी गोष्ट बघु येथे रस्त्याच्या संबंधित प्रश्न विचारला आहे शिक्षणाच्या संबंधित आपण प्रश्न विचारला आहे, आरोग्याच्या संदर्भात प्रश्न विचारला आहे त्यामध्ये असे आहे की आरोग्याच्या संदर्भात जर प्रश्न विचारला असेल तर खरच माझ्या प्रभागामध्ये सफाई कर्मचारी किती आहे यासंदर्भात भिवगडे साहेबांना म्हणा किंवा पाटील साहेबांना म्हणा या संदर्भात मी पाटील साहेबांचे मी सभागृहातर्फे अभिनंदन या करिता व्यक्त |

करतो की त्यांना आपण कधीही फोन केला तर त्यांनी माझा फोन बिझी मोडवर टाकुन ठेवला आहे त्यावर मी त्यांचे हार फुल घेवुन त्यांचा मानसन्मान करणारच आहे जर अधिकारी अशा पध्दतीने वागत असतील तर आमचे प्रश्न सोडविनार कोण ?

महापौर :– प्रश्न उत्तराचा वेळ संपलेला आहे.

श्री.ऋषिकेश उर्फ बंटी शेळके :– मा.महापौरजी सन्माननिय सदस्य श्री.कमलेश चौधरी यांनी आताच सांगितले की आमच्या सोबत येथे नविन नगरसेवक व नगरसेविका दुस–या पक्षाचेही असो ते येथे निवडुन आलेले आहे त्यांना जास्तीतजास्त वेळ नविन सदस्यांना दिला पाहिजे कारण शहराला मुलभुत सुविधा जर आपल्याला दयायच्या असेल तर जुने नगरसेवक मुलभुत सुविधा देण्यासंदर्भात चांगले प्रश्न मांडत आहे परंतु नविन नगरसेवकांना अभ्यास करण्याच्या दृष्टीकोनातुन शिकण्याकरिता जास्तीत जास्त वेळ दयायला हवा. (बेल)

महापौर :– सक्षम आयुक्त आहे, चांगली कार्यवाही करीत आहे आपण त्यांच्याकडुन चांगल्या भविष्याची अपेक्षा ठेवु आपल्या सर्व प्रश्नांना उत्तरे मिळतील नागपूर शहराकडे पॉझिटीव्हीटीने बघावे.

**प्रश्न क्र. 17** :– नंदनवन घरकुल येथील तळघर बुजविण्याकरिता तसेच 3 वर्षापासुन येणारे घाण पाणी त्वरित बंद करण्या संदर्भात माहिती

श्री.तानाजी वनवे :– मा.महापौरजी, मला प्रश्नाचे उत्तर मिळाले आहे मुद्या असा आहे की मागच्या 5 वर्षापासुन माझ्या मिसेस त्या प्रभागाच्या नगरसेविका होत्या आणि त्या ठिकाणी नंदनवन घरकुल हा परिसर आहे आणि त्या परिसरामध्ये एन.आय.टी. घरकुल बांधत असतांना जवळ जवळ 12 फुटाचा खड्डा ठेवलेला आहे त्या ठिकाणी पुर्वीचे आयुक्त एन.आय.टी. चे चेअरमन यांनी स्वतः दौरा केला तसेच या भागाचे आमदार कृष्णाभाऊ खोपडे यांनी सुध्दा त्या ठिकाणी प्रयत्न केला आणि एक मिटींग मा.पालकमंत्रयाच्या उपस्थितीमध्ये झाली आणि या मिटींगमध्ये सर्वांनी आम्हाला आश्वासन दिले की हा खड्डा ताबडतोब बुजवु या 12 फुट खड्डयामध्ये पाणी आहे आणि इतके घाण पाणी आहे की साक्षात मच्छर फॅक्ट्री तेथे आहे आणि त्यामध्ये मच्छर तयार होतात. फायलेरिया विभागाचे अधिकारी तेथे ऑईल टाकुन तेथे प्रयत्न करतात परंतु त्यामुळे काही समाधान होत नाही. वर्धने साहेब आयुक्त असतांना त्या ठिकाणी फवारणी करुन एक्सपरीमेंट करण्याचा प्रयत्न केला आणि त्या वेळी त्यांनी कमीटमेंट केले की या तळघराला कितीही खर्च आला तरी मा.पालकमंत्र्याच्या मिटींगमध्ये त्यांनी 2 वर्षाच्या पहिले आश्वासन दिले होते परंतु अजुनपर्यत ती कारवाई झालेली नाही, म्हणुन आज हा प्रश्न आम्हाला मांडावा लागला. त्याच्यावर कायम उपचार केला पाहिजे आणि ते तळघर बंद केला पाहिजे तो एरिया महानगरपालिकेला हस्तांतरीत झालेला आहे.

महापौर :– विरोधीपक्ष नेता श्री.तानाजी वनवे यांनी जो विषय मांडला आहे. तेथे प्रत्यक्ष मौका तपासणी आयुक्तांनी करावी व त्यामध्ये नागरिकांच्या तक्रारी राहणार नाही याची काळजी घ्यावी.

प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

**ठराव कमांक 40** :– महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील नियम क्र. 41 अन्वये

आकारण्यात येणाऱ्या थकीत करावरील दोन टक्के शास्ती हि रद्द करण्याबाबत सभेत चर्चा उपस्थित करण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे

| |
|---|
| नोटीस सभागृहाने विचारात घेतला<br><br><br>श्री.प्रफुल्ल गुडधेः— मा.महापौरजी, या विषयाच्या संदर्भात चर्चा झाली. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील नियम क्र. 41 अन्वये आकारण्यात येणा—या थकीत करावरील दोन टक्के शास्ती रद्द करण्याबाबत ठराव मंजूर करून शासनाकडे पाठविण्यात यावा आणि हा नोटीस ठरावामध्ये परिवर्तीत करावा अशी मी विनंती करतो. |
| श्री.संदीप जोशीः— मा.महापौरजी, ज्या नोटीसद्वारे मा.सदस्यांनी मागणी केलेली आहे. माझी आपल्या मार्फत प्रशासनाला देखील विनंती आहे. याच्यावरती मागच्या काळामध्ये देखील आपण कराबद्दलचा 90 टक्के दंड रद्द केलेला होता. मा.स्थायी समिती सभापती यांनी त्यांच्या अंदाजपत्रकात देखील या पध्दतीची पुर्नरचना ही केलेली आहे. 6 जुलै ते 15 जुलै या दहा दिवसाच्या कालावधीत शास्ती रद्द करण्यात येईल, 90 टक्के रद्द करण्यात येईल या पध्दतीचा निर्णय सुध्दा घेतलेला आहे. मला असे वाटते आपल्याला परत काही करण्याची गरज नाही. अंदाजपत्रकात घेतलेले असल्यामुळे तसा मा.आयुक्तांचा विषय असला तरी मा. आयुक्तांना या सभागृहामार्फत विनंती करतो त्यांनी या पध्दतीची शास्ती येणा—या काळात 90 टक्के शास्ती या सभागृहाने रद्द करावी. |
| श्री.प्रफुल्ल गुडधेः— मा.महापौरजी, ही शास्ती रद्द करण्याच्या संदर्भात ही नोटीस आहे. ही शास्ती आपण मा.आयुक्तांना विनंती करून रद्द करू शकतो. यानंतर जर आपल्या वॉटर मिटरींग मध्ये किंवा प्रापर्टी टॅक्समध्ये डीस्पुट निर्माण झाले तर त्यामुळे थकबाकीदार निर्माण होतात आणि त्यांच्यावर शास्ती लागते. ही शास्ती करधारकांना अडचणीत आणते. 24 टक्के वार्षिक याप्रमाणे ही शास्ती लागत असते. ही शास्ती भरतांना लोकांना अडचण येते. दरमहा 2 टक्केप्रमाणे ही शास्ती आकारली जाते. सरसकट ही शास्ती रद्द करण्यात यावी असे रूलिंग या सभागृहात देण्यात यावे. ही शास्ती नामंजूर असेल तर ठरावाच्या विरोधात मा.सत्तापक्ष नेत्यांनी मतदार करावे. |
| श्री.तानाजी वनवेः— मा.महापौरजी, मा.सदस्य श्री.प्रफुल्ल गुडधे पाटील यांनी आकारण्यात येणा—या थकीत रकमेवरील दोन टक्के शास्ती नागपूर शहरातील नागरीकांवर लागत आहे. दर महिन्याला लागणा—या व्याजाचे प्रमाण फार मोठे आहे. मागच्या वेळेला ही शास्ती रद्द करावी अशा प्रकारचा प्रस्ताव आम्ही शासनाला देखील पाठवून आमच्या शासनाला विनंती केली होती. आमच्या शासनाने ती काही मान्य केली नाही. आता आम्ही नवीन शासनाच्या प्रतिनिधींना विनंती करतो त्यांनी या नागपूर शहराच्या जनतेवर मोठया प्रमाणात टॅक्सवर शास्ती लागत आहे. तो रद्द करण्याचा प्रस्ताव घेवून मा. सरकारला पाठवावा अशी मी नागपूर शहराच्या जनतेच्या वतीने विनंती करतो. |
| श्री.अविनाश ठाकरेः—मा.महापौरजी, प्रशासनाला एक प्रश्न विचारावयाचा आहे. ही शास्ती केव्हा केव्हा लागू होते. |
| महापौरः— प्रशासनाने माहिती दयावी. |
| श्री.मेश्राम(सहा.आयुक्त):— मा.महापौरजी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील नियम क्र. 49 अन्वये चॅप्टर 8, रोलनंबर 41 अंतर्गत एखाद्या मालमत्तेवरील कराची रकम डयु |

| |
|---|
| डेट मध्ये भरली नाही तर दर महिन्यात दोन टक्के शास्ती लागते. सध्या स्थितीत डयु डेट 31 डिसेंबर ची असून 31 डिसेंबरपर्यंत मालमत्ता कर भरले नाही तर दोन टक्के शास्ती आकारतो. |
| श्री.अविनाश ठाकरेः—मा.महापौरजी, त्याच्या अनुषंगाने एक माहिती दयावी की ही शास्ती डिमांड जनरेट होण्याच्या आधी लागते की नगरसेवकांनी प्रश्न उपस्थित केला की डिमांड जनरेट झाली नाही आणि मग अचानक डिमांड जनरेट होवून त्याला शास्ती लागून येते की त्यांना डिमांड भरली नाही म्हणून शास्ती लागून येते. |
| श्री.मेश्राम(सहा.आयुक्त):— मा.महापौरजी, थकित रकमेवरती शास्ती लागते. |
| श्री.प्रफुल्ल गुडधेः— मा.महापौरजी,पाईंट ऑफ इन्फोर्मेशन, डिमांड जनरेट केव्हा होते. जर एखादयाच्या इमारतीत, बदल झाला असेल आणि बदल झाल्याची नोटीस दिल्यानंतर आम्ही पत्र दिले असेल की आमच्या इमारतीत बदल झालेला आहे त्याचे टॅक्स रिव्हीजन करण्यात यावे. टॅक्स रिव्हीजनचा अर्ज आल्यानंतर नवीन डिमांड जनरेट करण्याची प्रक्रिया आपण कधी करतो. |
| श्री.मेश्राम(सहा.आयुक्त):— मा.महापौरजी, हया प्रापर्टी ऑलरेडी असेसमेंट नेटमध्ये आहेत. असेसमेंट नेटमध्ये प्रापर्टीच्या डाटा असतो त्या डाटामध्ये काही बदल झाला असेल तर त्या प्रापर्टीचे आपण रिअसेसमेंट करतो एक नोटीस देतो 15/2 अंतर्गत की तुमच्या प्रापर्टीमध्ये बदल झालेला आहे. तुमच्या प्रापर्टीचे असे असेसमेंट येत आहे. त्यांनतर त्याला एक नोटीस देतो त्या टॅक्स भरणा—याला असेसमेंटवर 21 दिवसात आक्षेप नोंदविण्याची संधी दिली जाते. 21 दिवसापर्यंत आक्षेप नाही आला तर त्यानंतर त्यांना आपण डिमांड पारीत करतो. |
| श्री.प्रफुल्ल गुडधेः—मा.महापौरजी, संपुर्ण प्रक्रिया पुर्ण केल्यानंतर डिमांड देतो ही महानगरपालिकेत प्रक्रिया सुरू केली आहे काय? डिमांड देतांना पहिल्यांदा जेव्हा असेसमेंटची नोटीस देतो 21 दिवसाचा आक्षेप घेण्याचा कालावधीची असतो. त्यानंतर त्याचे फायनल असेसमेंट होते. ही पध्दत महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागात सुरू आहे काय? |
| श्री.मेश्राम(सहा.आयुक्त):— मा.महापौरजी, ज्या प्रापर्टी असेसमेंट नेट मध्ये आहेत आणि असेसमेंट नेटमध्ये असल्यामुळे जो डाटा आहे. त्या डाटाच्या अनुषंगाने काही बदल झाला असेल तर त्या प्रापर्टी आणि आपण शोधुन काढलेल्या न्यु प्रापर्टीमध्ये बदल झाल्यानंतर आणि त्याचे असेसमेंट केल्यानंतर नोटीस देतो. ही प्रक्रिया महानगरपालिकेत सुरू आहे. |
| श्री.प्रफुल्ल गुडधेः—मा.महापौरजी, नोटीस शिवाय डिमांड जनरेट झाल्याचे उदाहरण आहेत काय? काही चेंजेस झालेले असतील आणि त्याला नोटीस देण्याची आवश्यक असतांना सुध्दा डिमांड जनरेट झालेल्या आहेत. |
| श्री.मेश्राम(सहा.आयुक्त):— मा.महापौरजी, अशाप्रकारची डिमांड जनरेट झाल्याची तक्रार माझ्यापर्यंत आलेली नाही. |
| श्री.प्रफुल्ल गुडधेः—मा.महापौरजी, एक तक्रार मी स्वःत दिलेली आहे मा.महापौरजी, मी स्वतः हे प्रकरण घेवून आलेलो आहे. त्यामध्ये आपण निर्णयही दिलेला आहे. घरामध्ये झालेला बदल त्या संबंधित व्यक्तिने कळविला आणि कळविल्यानंतर त्याला नोटीस न देता त्याचे असेसमेंट फायनल करून टाकले. त्याला डिमांड नोट दिली आणि तो व्यक्ती म्हणून राहिला की हे बरोबर नाही. आक्षेप घेण्याचा कालावधी मला दिलेला नाही. आपण त्याच्यावर शास्ती लावली. आक्षेप जेव्हा मी आपल्याकडे घेवून आलो त्यामध्ये आपण आता निर्णय दिलेला आहे |

| |
|---|
| पुन्हा त्यावर फेर असेसमेंट करायला लावले. 21 दिवसाच्या कालावधी सुध्दा दिला. असे प्रकार असतील आणि दंडाची रक्कम चुकीच्या पध्दतीने लागल्यामुळे प्रत्येक वेळी नागरीक त्या ठिकाणी जावू शकत नाही. असेसमेंट केल्यामुळे थकबाकी वाढते. एखादया वेळेस हॅबीच्युअल डिफॉल्टर निश्चितपणे काही असतील त्याला आपण वर्गीकरण करू शकता तो कसा करता येईल हा वेगळा विषय आहे. |
| श्री.अविनाश ठाकरेः— मा.महापौरजी, मा.सदस्य श्री.प्रफुल्ल गुडधे यांनी मुद्दा उपस्थित केला. कर आकारणी व कर संकलन समितीमध्ये या विषयावर चर्चा झालेली आहे. मिटींग मिनीटस् सुध्दा फायनल झालेले आहे. हा अहवाल सभागृहाच्या पटलावर दिलेला आहे. याच्यामध्ये कर आकारणी व कर संकलन समितीमध्ये निर्णय घेण्यात आला होता. अशा अशा डिफॉल्टर केसे आहेत त्या सगळयाच्या सगळया इको ऑब्जेक्शनसाठी बोलवाव्यात त्यांची इमिजिएट हिअरिंग घ्यावी. त्याच्यासाठी कालावधी निश्चित करावा हिअरींग घेवून त्या केसेस सेटल कराव्यात. जे डिफॉल्टर नाहीत ज्यांना शास्ती लागलेली आहे त्या शास्तीतून त्यांना बाहेर काढता येईल. |
| श्री.प्रफुल्ल गुडधेः— मा.महापौरजी, पाईंट ऑफ इन्फोर्मेशन, माझा ठराव अगदी स्पेसिफिक आहे. कर आकारणी आणि कर संकलनसाठी आपण वेगळी चर्चा करू. शास्ती रद्द करण्याचा कॉंग्रेस पक्षाचा या ठिकाणी मानस आहे. या नोटीसची ठरावामध्ये परिवर्तीत करून जर या ठिकाणी मतदान विभाजनाची गरज असेल तर आमची मागणी आहे. मत विभाजन करून या ठरावावर सभागृहाचा मानस आपण या ठिकाणी घ्यावा. |
| श्री.अविनाश ठाकरेः— मा.महापौरजी, काल अंदाजपत्रकावर फार मोठी चर्चा झाली. विरोधी पक्षाकडून एक मुद्दा उचलला जात होता की महानगरपालिकेची उत्पन्नाचे स्त्रोत काय? आपण डिफॉल्टरला सुट द्यावी अशा प्रकारची भुमिका घेत आहे. ज्या चुका झाल्या त्या दुरूस्त करण्याची संधी दिली पाहिजे या मताचे आम्ही आहोत. पहिल्यापासून आहोत. ज्या चुका झाल्या आहेत प्रशासनाकडून त्यांना संधी दिली पाहिजे परंतु टॅक्स न भरण्याच्या संधीमुळे उद्या नागरिकांवर टॅक्स भरण्याचा प्रेशर राहणार नाही. प्रफुल्ल गुडधे जेव्हापासून हा नियम लागू झाला तेव्हापासून आतापर्यंत संपुर्ण माहिती काढली असता असे लक्षात येईल अनेक लोकांनी आता टॅक्स भरणे सुरू केले आहे. अनेक लोकांनी थकबाकी जाणूनबजुन ठेवली होती. |
| श्री.प्रफुल्ल गुडधेः— मा.महापौरजी, पाईट ऑफ इन्फोर्मेशन, या ठिकाणी आपण नागरिकांकडून टॅक्स घेतो. टॅक्स विविध ग्रीडमध्ये घेतो. मालमत्ता कर घेतो, सर्वसामान्य कर घेतो, साफसफाई कर घेतो, अग्निशमन कर घेतो. सफाई कराच्या संदर्भामध्ये मी माझ्या प्रभागातील माहिती देवू इच्छितो, माझ्यात ज्या वेळी मी सॅनिटरी इन्स्पेक्टरला बोलाविले आणि संपुर्ण सफाईची माहिती घेतली त्यावेळी त्याने विस्तृत माहिती दिली. 217 बीट माझ्या प्रभागात आहेत, आणि कर्मचारी किती आहेत तर 55 कर्मचारी आहेत. .बाकीच्या संपुर्ण 155 बीटवर... |
| श्री.अविनाश ठाकरेः—पाईट ऑफ आर्डर, मा.प्रफुल्ल गुडधे दोन विषय एकत्र आणत आहेत. सफाई कर्मचा—यांचा विषय आहे. मान्य आहे आपण सफाई कर घेतो. टॅक्सचा विषय आहे आपण टॅक्सच्या संदर्भात बोलावे. |
| श्री.प्रफुल्ल गुडधेः— मा.महापौरजी, पाईट ऑफ आर्डर, अविनाश ठाकरेजीने पुर्ण विषय समजून घ्यावा. सफाई कर्मचा—यांचा विषय यासाठी लिंक करतो तेथील लोक कर भरतात. |

| |
|---|
| माझ्या प्रभागात जवळपास 150 बीटवर सफाई कर्मचारी नाहीत. जर या घरापासून तर फलान्याच्या घरापर्यंत जेथे सर्व लोक कर भरत असतील आणि तेथे पुरेसे सफाई कर्मचारी नियुक्त केले नाही आणि त्या ठिकाणी तो माणूस उपभोक्ता म्हणून साफसफाई कर भरला असेल महानगरपालिकेकडून सफाई कर्मचारी काम करीत नाही. त्या संदर्भात सुध्दा महानगरपालिकेत शास्ती लावण्याचा काही नियम आहे काय? हा माझा प्रश्न आहे. नियम करता येईल काय? की कर भरला नाही तर शास्ती लावण्यात येते परंतु..... (बेल) |
| श्री.प्रवीण दटकेः– मा.महापौरजी, अशी कोणतीही नोटीस दिली तर त्याचे ठरावामध्ये रूपांतर होते काय? त्याच्यावर चर्चा होते काय? त्यावर मतदान होते काय?हा प्रश्न आहे. याची माहिती मला पाहिजे. |
| श्री.प्रफुल्ल गुडधेः– मा.महापौरजी, मी पहिल्यांदा चर्चा करून राहिलो. याला ठरावात परिवर्तीत करण्याची मा महापौरांना विनंती करून राहिलो. मा. महापौरजीच्या निर्देशाने ते मान्य होईल. चर्चा तर करू दया, चर्चा करायला काय हरकत आहे. |
| महापौरः–प्रशासनाने माहिती दयावी. |
| श्री.प्रवीण दटकेः– मा.महापौरजी, दुसरा मुद्दा, अशा प्रकारचा ठराव आपण या आधी शासनाकडे पाठविला आहे काय? तो तपासून बघावा |
| श्री.सुनिल अग्रवालः– मा.महापौरजी,पाईंट ऑफ इन्फॉर्मेशन, प्रफुल्लजी ने कहां की नोटीस का ठराव मे परिवर्तीत करे ऐसा नोटीस ठराव मे परिवर्तीत होता है क्या? |
| निगम सचिवः– मा.महापौरजी, सन्माननीय सदस्यांनी हा नोटीस दिला आहे. तो नोटीस त्यांनी चर्चा करण्याकरिता दिला आहे. त्या अनुषंगाने सदनात चर्चा सुरू आहे. दुसरा प्रश्न आहे की याला ठरावामध्ये कन्वर्ट करू शकतो काय? ठरावामध्ये कन्वर्ट करण्याचे काहीही नियम नाही. |
| श्री.मेश्राम(सहा.आयुक्त):– मा.महापौरजी, असा ठराव सभागृहाने ऑलरेडी 30.4.2012 ला मंजूर केलेला आहे. |
| श्री.प्रफुल्ल गुडधेः– मा.महापौरजी, ठरावाला पुढची पुष्ठी जोडली पाहिजे. तो ठराव मंजूर करून आणण्याची संपुर्ण जबाबदारी दटके साहेबांना देवू. |
| श्री.प्रवीण दटकेः– मा.महापौरजी, पाठपुरावा करण्यास काही हरकत नाही |
| वरील चर्चेनंतर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील नियम क्र. 41 अन्वये आकारण्यात येणाऱ्या थकीत करावरील दोन टक्के शास्ती हि रद्द करण्याबाबत सभेत चर्चा उपस्थित करण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून उपरोक्त आषयाच्या ठरावास यापूर्वी दिनांक 30.04.2012 रोजी मान्यता प्रदान केली असल्यामुळे प्रषासनाने त्याचा पाठपुरावा करावा या मा.सत्तापक्ष नेते श्री.संदीप जोषी यांनी केलेल्या सुचनेसह सादर केलेल्या नोटीसची सभागृहाने एकमताने नोंद घेतली. |
| **<u>ठराव कमांक 41</u> :–** हद्दवाढ झालेल्या क्षेत्रात पायाभूत सोयी सुविधा निर्मिती करिता<br>नागपूर महानगरपालिकाद्ववारा शासनास सादर करण्यात आलेल्या हुडकेश्वर–नरसाळा या भागातील स्मशानघाट विकास कामास्तव रू. ३.२७ कोटी हडकेश्वर प्राथमिक आरोग्य केंद्र बाधकाम करण्याकरीता रू. ०.६६ कोटी आणि हुडकेश्वर –नरसाळा मनोरंजन मैदान विकास करण्यासाठी रू. ३.६७ असे एकूण रक्कम ७.६० कोटीचा प्रस्तावास शासनाने |

महानगरपालिकेची २० टक्के हिस्साची रक्कम रू. १.५१ कोटी भरण्यास सहमती असल्याचा ठराव मंजूर करणे या अटीच्या अधीन राहुन मंजुरी दिलेली आहे. करीता शासनाचे अटीनुसार म.न.पा.चा हिस्सा २० टक्के प्रमाणे उपरोक्त नमूद विकास कामास्तव रू. १.५१ कोटी रक्कमेचा सहभाग देण्याचा व खर्च पद क्र. A42001374602 अंतर्गत सन २०१७ –१८ चे तरतूदी मधुन करण्याचा प्रश्न महासभेमध्ये विचारात घेवून सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्रमांक 42 :–** महाराष्ट्र महानगरपालिका कायद्या १९४९ अंतर्गत कलम २४३ (A) अन्वये नागपूर शहराकरिता पार्कींगचे दर व मोटर वेहीकल अॅक्ट १९८८ कलम ११७ अंतर्गत पार्कींगची जागा मंजुर करण्याबाबत प्रस्ताव

संदर्भ :– १) नागपूर महानगरपालिकाचे ठराव क्र. ३४२ दि. ६.१०.२०१६ अन्वये मंजुर पार्कींग पॉलीसी २०१६ मंजुर करण्यात आली.

२) PIL GT/2015, PIL 5/2016, PIL 65/2012 यात मा. उच्च न्यायालयाचे आदेश.

वरील विषयाच्या अनुषंगाने नागपूर शहराकरिता पार्कींग पॉलीसी तयार करण्यात आली असुन, त्यास म.न.पा. ठराव क्र. ३४२ दिनांक ६.१०.२०१६ अन्वये महानगरपालिका महासभेची मान्यता प्राप्त आहे. या पार्कींग पॉलीसी मध्ये ‘‘पे अॅण्ड पार्क’’ योजना राबविण्या करिता खालील प्रमाणे दर मंजुरीस्तव सादर करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | वाहनांचे प्रकार | दर/वेळ | शेरा |
|---|---|---|---|
| १. | सायकल | रु. ५/– प्रति ८ तासा करिता | |
| २. | दोन चाकी वाहन (स्कुटर मोटार सायकल) | रु. १०/– प्रति ८ तासाकरिता | |
| ३. | चार चाकी वाहन | रु. २०/– प्रति ८ तासाकरिता | |
| ४. | तीन चाकी, पाच चाकी व्यावसायीक वाहन | रु. १०/– प्रति ८ तासाकरिता | |

वरील प्रमाणे प्रस्तावित दर हे पार्कींग पॉलीसी मध्ये सुचित केल्याप्रमाणे तीन झोन करिता बेस दर म्हणून प्रस्तावित करण्यात येत आहेत. आणि पॉलीसी मध्ये नमुद केल्याप्रमाणे कंसेप्ट ऑफ पेड पार्कींग अंतर्गत प्रायझिंग मॅकेनिझमचा उपयोग करुन, मोबीलीटी झोन या अंतर्गत मेट्रो रेल कॉरीडॉर आणि शहरा अंतर्गत हाय वे सामिल असणार यामध्ये २४ मिटर रुंदी व त्यापेक्षा जास्त रुंदीच्या रस्त्यांचा समावेश राहील.

तसेच दुसरे झोन कोर बिझीनेस डिस्ट्रीक यामध्ये कमर्शियल एरीया, कोर सिटी एरिया उदा. सदर, सिताबर्डी, इतवारी, लकडगंज, महाल, धरमपेठ, कॉंग्रेस नगर, गणेशपेठ इ. चा समावेश आहे.

<u>**मिक्स झोन**</u> :– यामध्ये वरील दोन्ही झोन अंतर्गत समावेश असलेला भाग वगळून इतर भागांचा समावेश राहील. त्याचप्रमाणे रहीवाशी व इतर संस्था पब्लीक एरिया यांचा समावेश

राहील. पार्कीग पॉलीसी मध्ये सुचविल्या प्रमाणे वरील तीन्ही झोनमध्ये पार्कीगची निकड लक्षात घेता व उपलब्धता पाहता वरील प्रमाणे पार्कीगचे दर तासाप्रमाणे तसेच ऑफ स्ट्रीट व ऑन स्ट्रीट पार्कीगचे दर निश्चित करण्या करिताचे अधिकार मा. आयुक्त यांना वरील बेस दराच्या आधारे देण्याचा प्रश्न,

मा. उच्च न्यायालय यांनी जनहित याचिका क्र. ६७/२०१५ चे अनुषंगाने सोबत जोडलेल्या नोटीस व मीटींगच्या अनुषंगाने चार चाकी वाहना करिता रु. २०/— प्रति दिवस व दोन चाकी वाहना करिता रु. १०/— प्रति दिवस. मासिक पास चार चाकी वाहना करिता रूपये २५० दर महिना आणि दोन चाकी वाहना करिता मासिक पास रु. १००/— हे दर हायकोर्टच्या वेळेस एक तास अगोदर व एक तास नंतरच्या वेळेकरिता निश्चित करण्यात आले आहेत.

तसेच खालील प्रमाणे नमुद जागांकरिता पे ॲण्ड पार्क ही योजना राबविण्यास्तव मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न,

१.गौरक्षण रहाटे कॉलनी

२ इंडियन जिम खाना ग्राऊंड.

३ पंचशिल चौक ते लोकमत चौक फ्लाय ओवरच्या खालील जागा व वरील जागा पार्कीग करिता मंजुरीस्तव सादर.

४ यंशवंत स्टेडियम समोरील जागा.

**तसेच स्मार्ट पार्कीगचे स्थळ व दर खालील प्रमाणे आहे.**

५ काचीपूरा चौक ते क्रिम्स हॉस्पीटल (दक्षिणेस)

स्मार्ट पर्कीग अंतर्गत चार चाकी वाहनांकरीता खलील प्रमाणे दर प्रस्तावीत करण्यात आलेले आहेत.

| **अनु. क्र** | **तिन तासांकरीता** | **सहा तासांकरीता** | **आठ तासांकरीता** |
|---|---|---|---|
| १. | रू. ३०/— | रू. ५०/— | रू. ७०/— |

प्रत्येक तासा करीता रू. १०/— प्रती तास चार चाकी वाहन किंवा वरील प्रमाणे जे कमी असेल त्या प्रमाणे स्मार्ट पार्कीग नमुद जागेवर स्मार्ट पाकींग योजना राबवीण्यास्तव मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेतला

श्री.दयाशंकर तिवारीः— मा.महापौरजी,इसमे पार्किंग लॉट करने के केवल चार स्थान के नाम दिये गये है । शहर मे और भी कई जगह है जिसमे पार्किंग की बाजारपेठो मे नितांत आवश्यकता है । उदाहरण के तौर पे गांधीबाग बगीचे के दोनो साईड मे पूर्व साईड और पश्चिम साईड मे जो पश्चिम साईड का भाग है वो वनवे है जिसमे अगर उसके आधे रस्ते मे पार्किंग किया और वहां पर जो नास्तेवाले बैठते है उनकी अलग से व्यवस्था की वहां पर खाऊगल्ली निर्मित कर के वहां उन्हे शिफ्ट किया तो पार्किंग की जगह उपलब्ध हो सकती है । पूर्व के साईड फुटपाथ छोटा करके वहां पर थोडी पार्किग उपलब्ध कराई है । उसे अधिकृत पे ॲण्ड पार्क कर दिया तो महानगरपालिका की आय मे वृध्दी हो सकती है । उसीप्रकार से जो वल्लभाचार्य चौक है वल्लभाचार्य चौक से पुलिस स्टेशन जानेवाला जो मार्ग है जो पार्क है जिसपर नो पार्किंग बोर्ड लगा हुआ है । वह पुरा खाली रहता है । ऐसी अवस्था मे वहा भी अगर पार्किंग की व्यवस्था करी तो महानगरपालिका को बाजारपेठ मे

| |
|---|
| पार्किंग की व्यवस्था मिल सकती है । इसलिये तीनो स्थानो का वहां पर समावेश करे ऐसा कृपापुर्ण निवेदन करता हूँ । |
| श्री.संदीप सहारेः—मा.महापौरजी, एक जनतेचा चांगल्या कामाकरिता हा विषय आला आहे. त्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो. याच्यामध्ये एक सुचना मी देवू इच्छितो, मागच्या रेझिममध्ये मी स्थायी समितीमध्ये असतांना एक विषय आणला होता. नागपूर शहरामध्ये जे मॉल आहेत आणि ते मॉल तयार होण्याच्या आधी नगर रचना विभागाकडे पार्किंगच्या व्यवस्थेची संपुर्ण जबाबदारी त्यांना देते आणि नागपूर शहरामध्ये जितके मॉल आहेत. तिकडे खरेदीला जाणारी जनता जेव्हा त्या पार्किंग मॉलमध्ये आपल्या गाडया ठेवतात तर तेव्हा त्यांच्याकडून पैसा वसुल करतात आणि तो पैसा त्यांच्या खिश्यामध्ये जातो. आपण फक्त त्यांच्याकडून टॅक्सच्या रूपाने पैसा घेतो. परंतु पार्किंगच्या रूपाने लाखो रूपये ते जनतेकडून घेत असतात. परंतु याचा काही फायदा नागपूर महानगरपालिकेला होत नाही. बिगबाजारात गेल्यानंतर जर कुणी खरेदीकरिता गेला तर तेथे पार्किंग केली आणि जेव्हा तो बाहेर येतो पार्किंगची रसीद दाखवितो तेथुनही पार्किंगच्या रूपाने पैसा घेतात तेथूनही महानगरपालिकेला कोणताही फायदा होत नाही. तेथून महानगरपालिकेला पैसा मिळायला पाहिजे असा एक विषय मी स्थायी समितीमध्ये ठेवला होता. त्यांच्याकडून कराच्या रूपाने काही प्रमाणात वसुल केला पाहिजे. अश्या प्रकारचा विषय आपल्या समोर ठेवलेला आहे. |
| श्री.प्रविण दटकेः— मा.महापौरजी, उत्तम विषय या ठिकाणी चर्चेला आणला आहे. अनेक चित्रपटगृहामध्ये मॉलमध्ये पार्किग शुल्क आपल्या आयनॉक्स असेल, सिनेमॅक्स असेल, पीव्हीआर असेल, एम्प्रेस मॉल असेल यामधून पार्किंग शुल्क घेत आहे. ते नियमाच्या विरूध्द आहे. ज्या पार्किंग स्लॉटमध्ये पार्किंग होते कायदेप्रमाणे ती पार्किंग बेसिक ॲम्युनिटी असल्यामुळे आपण टॅक्स सुध्दा लावत नाही. अनेक ठिकाणी पार्किंगचे मोफत शुल्क आकारला जातो. या सर्व ठिकाणचे पार्किंग शुल्क रद्द करावे जर ते नियमानुसार रद्द होत नसेल तर कर्मशियल टॅक्स लावल्यास महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल ही फार चांगली सुचना आहे. माझी तर विनंती आहे, महानगरपालिकेत नागरिक येत असतात ते कामासाठी येतात त्या आवश्यक ठिकाणी सरकारी ऑफीसेस असेल, बॅक असेल त्या सगळया ठिकाणी वारंवारं कामासाठी यावे लागते. त्यांच्यामार्फत मोठया प्रमाणात पार्किंग शुल्क घेतला जातो. या संपुर्ण पार्किंगच्या विषयाची आणि जेथे जेथे असे पार्किंग होते तेथे या सगळया बाबतीत नियम निकष तपासले पाहिजे. नागरिकांना या पार्किंग शुल्काच्या पिळवणूकीतून बाहेर काढले पाहिजे. मॉल असतील, बॅका असतील, चित्रपटगृहे असतील सरकारी कार्यालये असतील माझी तर या उपर जावून विनंती आहे दहावी, बारावीचे, युनिर्व्हेसिटीचे पेपर द्यायला मुले सेंटरवर जातात त्या विद्यार्थ्यांकडून पार्किंग शुल्क आकारले जाते. हे जे वाईट आहे. या संपुर्ण पार्किंगच्या विषयाची आणि जेथे जेथे पार्किंग जर निर्माण करता आले तर तेथे निश्चित केले पाहिजे. मी महाल या भागाचा नगरसेवक आहे. माझ्या घरावर जवळ सुध्दा रस्त्यारस्त्यावर गाडया पार्किंग केल्या जातात. मला सुध्दा गाडी ठेवायला जागा नसते त्यामुळे भांडणे, वाद हे सगळे होत आहे. अशा नागरिकांकरिता कसे काय पार्किंगचे शुल्क लावता येईल याचा विचार केला पाहिजे. रस्त्यावर करण्यात आलेल्या पार्किंगमुळे वाहतुकीस न्युसन्स तयार होतो. नागपूर शहरात पार्किंगची फार मोठी समस्या निर्माण होत आहे त्या अनुषंगाने अनुकूल असे अनेक प्रस्ताव तयार केले पाहिजे अशी माझी विनंती आहे. |

| |
|---|
| श्री.संदीप जोशीः—मा.महापौरजी सुचनांचा अंतर्भाव करून विषय मंजूर करावा. |
| श्री. नरेंद्र उर्फ बाल्या बोरकरः—मा.महापौरजी, एक निवेदन करतो, माझ्या प्रभागात नवीन प्रभाग जुळला आयनॉक्स वर्धमाननगर, येथे महानगरपालिकेची जागा आहे. जे एनकुमार आयनॉक्सचे मालक आहे. महानगरपालिकेच्या जागेवर पार्किंगमधून पैसे वसुल करीत आहे. याच्यावर सुध्दा कार्यवाही करण्यात यावी आणि ती जागा मोकळी करण्यात यावी. |
| श्री.दिनेश यादवः—मा.महापौरजी, वहां पर फिजीकल हॅन्डीक्राफ्ट के लिए भी निशुल्क पार्किंग होनी चाहिए । कमिश्नर ऑफीस मे हॅन्डीकॅप लोगो के लिए पार्किंग का बोर्ड लगा हुआ है वहा पर ईश्वर गोयंकाजी इनकी गाडी रिव्हस करते समय ॲक्सीडेंट कर दिया था। पार्किंग मे गाडी तोड दी गई। मै आपसे विनंती करता हू की जहां जहां सरकारी जगह पर जहां पर विशेष कर हॅन्डीकॅप का बोर्ड लगा वहां पर कार्यवाही किया जाये । हमारे कमिश्नर ऑफीस मे जहां टू व्हिलर का पार्किंग है पर पार्किंग के लिए जगह नही है । |

| 1 | a | Advertisements on hoarding or wall posts or in the form of **illuminated &** non illuminated sky - signs. | For a space up to 1 sq. mtr. | 17.5 | **22.00** |
| | | | For every additional sq. mtr. or less | 17.5 | **22.00** |
| | b | If the above advertisements project over or across streets. | For every mtr. | 17.5 | **22.00** |
| | c | Advertisements fixed or suspended in streets or on footpaths in connection with the charitable or educational object for a period not exceeding fifteen days. | Rates as shown in item 1 (a) | | |
| 2 | a | Advertisement fixed or suspended in streets or footpaths | For a space up to 1 Sq. mtr | 15.00 | **19.00** |
| | | | For every additional sq. mtr or less. | 15.00 | **19.00** |
| | b | If the above advertisements project over or across streets. | For every mtr. | 26.5 | **33.00** |
| | c | Advertisement hoarding standing blank "but bearing the name of the advertiser or with the announcement to be let displayed there on. | 0.81 paisa per sq. mtr. Per month | 9.4 | **Delit** |
| 3 | a | Advertisement boards carried on vehicle | For a space up to 2 sq. mtr. | 35 | **44.00** |
| | | | For every additional sq. mtr or less. | 35 | **44.00** |
| | b | Loose poster which are posted or fixed on walls, roads or suspended in streets, etc. | 3.5 rupee per poster irrespective or the size but such posters must bear facsimile of an officer authorized by the corporation in this behalf. Posters without facsimile will be treated as unauthorized. But posters posted on hoardings or wall posters shall be charged at rate shown in item no. l(a) | | |
| 4 | | Illuminated advertisement boards carried on vehicle. | For a space up to 2 sq. mtr. | 62.5 | **78.50** |
| | | | For every additional 2 sq. mtr. or less | 62.5 | **78.50** |
| 5 | | Advertisement boards carried by sandwich board men etc. | For each board not exceeding 1 sq.mtr. | 17.5 | **22.00** |
| | | | For every additional sq. mtr or less | 17.5 | **22.00** |
| 6 | | Illuminated advertisement boards, etc carried by sandwich board men. | For each board not exceeding 1 sq. mtr | 35 | **44.00** |
| | | | For every additional sq. mtr. or less. | 35 | **44.00** |
| | | | For every additional 0.5 sq.mtr. | 70.00 | **92.50** |

| Sr. No. | Description | Scale of fees Per Month | Rate | New |
|---|---|---|---|---|

| | | | | | Rate |
|---|---|---|---|---|---|
| | | | For every additional sq. mtr. or less. | 35 | **46.00** |
| **7** | a | For fixed illuminated sky-signs and advertisements. | For a space up to 0.2 sq.mtr. | 9 | **12.50** |
| | | | For every additional 0.2 sq. mtr. | 9 | **12.50** |
| | b | Advertisements on hoarding or wall posts illuminated by different means. | Rate shown in item 7 (a) above | | |
| **8** | | For illuminated sky - signs and advertisements exhibited on screens by means of lantern, **neon,** slides or similar devices. | For a space to 0.5 sq.mtr | 70.00 | **88.00** |
| | | | For every additional 0.5 sq.mtr. | 70.00 | **88.00** |

श्री.संदीप जोशीः— मा. महापौरजी, आपल्या माध्यमातून एक प्रशासनाकडून माहिती घ्यावयाची होती. जीएसटी मधून जाहिरात कर अॅबालीश झालेला आहे काय?

महापौरः—प्रशासनाने माहिती दयावी.

श्रीमती स्मिता काळे(सहा.आयुक्त)ः—मा.महापौरजी, मी स्मिता काळे महाराष्ट्र प्रशासकीय सेवेतून उतीर्ण झाली आहे. महाराष्ट्र सीपीटीपीसीची विद्यार्थीनी आहे आणि प्रोव्हीजनरी म्हणून येथे जाईन झाले आहे. जीएसटी मध्ये जाहिरात कर अॅबालिश झालेला आहे. टी.व्ही. आणि वर्तमानपत्र हयामध्ये येणारी जाहिरात सोडून बाकी जाहिरात कर जीएसटीमधून अॅबालीश झालेला आहे.

श्री.संदीप जोशीः— मा.महापौरजी, हा कर आता घेता येणार नाही. हा प्रस्ताव प्रशासन वापस घेईल.

श्री.प्रफुल्ल गुडधेः—मा.महापौरजी, कालच्या भाषणामध्ये मी याचा उल्लेख केला होता. तेव्हा सन्माननीय.दयाशंकर तिवारी आमचे मोठे भाऊ यांनी आक्षेप घेतला होता की भ्रमित करून राहिले. माझी कुठलीही मनिषा भ्रमित करण्याची नव्हती. जी वास्तविक माहिती प्राप्त झाली होती ती कदाचित चुकीची माहिती असती तर चुकीची माहिती म्हणावे आणि बरोबर असेल तर बरोबर आहे म्हणावे. अशाप्रकारे माझ्या इन्टेंशनवरती आक्षेप घेण्यात येवू नये.

श्री.संदीप जोशीः— मा. महापौरजी, हा विषय प्रशासनाने वापस घ्यावा.

श्री.प्रविण दटकेः—मा.महापौरजी, आपल्या परवानगीने खाजगी होर्डिंग, महानगरपालिकेची होर्डिंग लावली जाते. आता या होर्डिंगला कोणत्या आधारावर परवानगी देणार आहे याची माहिती दिली पाहिजे.

महापौरः— जाहिरात विभागाकडे माहिती तयार आहे काय?

श्री.प्रविण दटकेः—मा.महापौरजी, याच्या आधी ज्यांच्याकडे जाहिरात विभाग होता त्यांना विचारले पाहिजे. होर्डिंगच्या बाबत काय पॉलिसी राहणार आहे. या महानगरपालिकेला रेव्हेन्यु कसा येईल.

श्रीमती स्मिता काळे (सहा.आयुक्त)ः—मा.महापौरजी, माझ्या माहितीनुसार या ठिकाणी लायसेंस जाहिरातीवरील का रद्द केला आहे. ग्राऊंड रेंट आहे तो तसाच आहे लायसेन्स बद्दल मला जास्त माहिती नाही.

श्री.संदीप जोशीः— मा. महापौरजी, त्यांच्याजवळ अर्धवट माहिती आहे. त्या बोलतांना अशा म्हणाल्या की माझ्या माहितीप्रमाणे याचा अर्थ त्यांना 100टक्के माहिती नाही आहे. हा विषय सोनवणे साहेबांनी सांगावा.

| |
|---|
| श्री.सोनवणे(अपर आयुक्त):—मा.महापौरजी महोदया, महानगर मालकीच्या जागेवर जाहिरातीचे भाडे घेते हा वेगळा विषय आहे आणि ज्या ठिकाणी जाहिरात लागतात त्या खाजगी जागा किंवा शासकीय जागा असोत. ज्या ज्या ठिकाणी जाहिरात लागते त्या जाहिरातीवर आपण कर वसुल करीत असतो. तो महानगरपालिका अधिनियम 127 अन्वये महानगरपालिकेला अधिकार होता. तो आता आहे किंवा नाही. जीएसटीमध्ये यासाठी काय तरतूद आहे याचा अभ्यास करणे आवश्यक आहे तो अभ्यास करून सभागृहात प्रस्ताव ठेवण्यात येईल तोपर्यंत हा प्रस्ताव स्थगित ठेवावा अशी विनंती करतो. |
| श्री.प्रविण दटके:—मा.महापौरजी, हा प्रस्ताव मंजूर करावा समजा त्यामध्ये प्रोव्हीजन जर असेल तर... |
| श्री.प्रफुल्ल गुडधे:—मा.महापौरजी, तोपर्यत स्थगित ठेवण्यात यावा. |
| वरील चर्चेनंतर सभागृहाचा मानस लक्षात घेता जीएसटीच्या अनुषंगाने या प्रस्तावाची तपासणी करून कार्यालयाने आपले अभिमत पुढील सभेत सादर करावे तोपावेतो हा विषय स्थगित ठेवण्यात यावा या मा.सत्तापक्ष नेता श्री संदीप जोशी यांनी केलेल्या सुचनेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली. |
| <u>**ठराव कमांक 53 :–**</u> **(न्यूसन्स डिटेक्शन स्क्वॅड)** वाढत्या नागरीकीकरणामुळे शहरांची लोकसंख्या झपाटयाने वाढत आहे. वाढत्या लोकसंख्येचा ताण शहरातील पायाभूत सुविधांवर पडतो तसेच अतिक्रमणांची संख्या वाढणे, कच—याचे प्रमाण वाढणे, उघडयावरती कचरा फेकण्याचे प्रमाण वाढणे, उघडयावर जनावरे बांधणे त्यामुळे अस्वच्छतेचे उपद्रव निर्माण होतात. तसेच नागरीकांकडून बिनापरवाना होर्डींग्स् उभारणे, बांधकामाचा मलबा रस्त्यावर टाकणे, थुकणे, घाण फेकणे, व्यवसायीकांनी, ठेलेवाल्यांनी परीसर अस्वच्छ करणे इत्यादी प्रकारही घडत असतात अशा प्रकारचा उपद्रव शोधून काढून त्यावर वेळीच दंडनीय कार्यवाही केल्यास शहर परीसरात स्वच्छता व शिस्तीचे वातावरण निर्माण करणे शक्य होवु शकते. त्यादृष्टीने उपद्रव शोध पथके (Nuisance Detection Squad) निर्माण करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आलेला असून त्यामध्ये खालीलप्रमाणे बाबींचा समावेश आहे.<br>१) प्रत्येक झोनमध्ये एक पथक या प्रमाणे १० पथके असतील.<br>२) प्रत्येक प्रथकात एक पथक प्रमुख व चार मदतनीस व चालकासहीत जीप प्रकारचे वाहन राहील.<br>३) या सर्व दहा पथकांवर नियंत्रणासाठी विशेष कार्य अधिकारी नेमला जाईल. हे सर्व कर्मचारी माजी सैनिकांमधूनच नेमले जातील.<br>४) कोणत्याही प्रकारचा उपद्रव आढळल्यास किती प्रशासकीय शुल्क आकारावे या बाबतचे मनपाने ठरवून दिलेल्या दरपत्रकानुसार पथक प्रामुखाने संबंधितांस दंड आकारणे आवश्यक राहील.<br>५) मनपा मुख्यालयास ई—गव्हर्नस सोबत जोडता येवु शकेल असे लहान Electronic Handheld device दंडाच्या पावत्या देण्याकरीता राहतील आणि पावती फाडल्याबरोबर त्याची नोंद मनपाच्या ई—गव्हर्नस प्रणालित होईल.<br>वरील प्रमाणे पथकाव्दारे उपद्रवाचे/अपराधाचे स्वरुप बघून दंडात्मक रक्कम वसूल करण्याकरीता तक्ता तयार करण्यात आलेला असून सोबत जोडलेला आहे. सर्वसाधारणपणे अशा पथकांवर होणारा खर्च पथकातर्फे नागरीकांना आकारलेल्या प्रशासकीय शुल्कातूनच भरुन |

निघेल असे दुरगामी धोरण ठेवण्यात आलेले आहे.

यासाठी ढोबळामानाने खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

१) १० पथक प्रमुख व १ विशेष कार्य अधिकारी
*i.e* 11 X 30,000 रु. = 3,30,000/- रुपये मासिक.

२) ४० मदतनीस व १ विशेष कार्य अधिकारी
*i.e* 40 X 24,000 रु. = 9,60,000/- रुपये मासिक.

३) जीप संवर्गातील ११ वाहने चालकासहीत
*i.e* 11 X 40,000 रु. = 4,40,000/- रुपये मासिक.
उपरोक्त सर्व कर्मचारी माजी सैनिकांमधूनच घेतले जातील.

४) दूरध्वनी खर्च प्रतीपुर्ती ५१ कर्मचारी
*i.e* 51 X 500 रु. = 25,500 /- रुपये मासिक.

अशा प्रकारे मासिक एकुण रु. १७,५५,५००/— म्हणजेच वार्षीक एकुण रु. २,१०,६६,०००/— खर्च (हॅण्डहोल्ड पावती यंत्रे वगळता) येईल. प्रशासकीय शुल्क वसुलीची यंत्रणा निर्माण होईपर्यंत संकीर्ण पावती पुस्तकांद्वारे वसुली केली जाईल. प्रशासकीय शुल्क वसुलीचे प्राधीकार पथक प्रमुखास असतील व पथकातर्फे शुल्क आकारणीचा वाद उद्‌भवल्यास संबंधीत विशेष कार्य अधिकारी व सहाय्यक आयुक्त त्यावर निर्णय घेतील. त्यात अडचण उद्‌भवल्यास प्रकरण संबंधीत उपायुक्त, अपर आयुक्त वा मा. आयुक्तांकडे निर्णयार्थ पायरी पायरीने जाईल, मा. आयुक्तांचा निर्णय अंतीम राहील.

उपरोक्त प्रस्ताव विचारात घेवून धोरणात्मक निर्णय घेण्याच्या मंजुरीस्तव सादर प्रस्तुत.

**उपरोक्त विषयाचा तक्ता :— उपद्रवाचे प्रकार व प्रस्तावित प्रशासकीय शुल्क /दंडाची रक्कम**

| अ. कं. | ठिकाण | दंडाची रक्कम |
|---|---|---|
| १ | सार्वजनिक ठिकाणी, रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा अवांछीत ठिकाणी थुंकणे | रु. ५०/— |
| २ | सार्वजनिक ठिकाणी रस्ता,फुटपाथ, मोकळी जागा अशा अवांछीत ठिकाणी/उघडयावर मलमुत्र विसर्जन करणे | रु. १००/— |
| ३ | हाथगाडया, स्टॉल्स्, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परीसरात अस्वच्छता करणे | रु. २००/— |
| ४ | व्यक्तीने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा अवांछीत ठिकाणी कचरा टाकणे | रु. ५०/— |

| | | |
|---|---|---|
| ५ | दुकानदाराने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा अवांछीत ठिकाणी कचरा टाकणे | रु. २००/— |
| ६ | शैक्षणिक संस्था, कोचिंग क्लासेस अश्या संस्थांनी रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा अवांछीत ठिकाणी कचरा टाकणे | रु. ५००/— |
| ७ | दवाखाने, इस्पितळे, पॅथलॅब इत्यादींनी रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा अवांछीत ठिकाणी कचरा टाकणे | रु. १०००/— |
| ८ | मॉल, उपहारगृहे, लॉजिंग, बोर्डींगचे हॉटेल, सिनेमाहॉल, मंगल कार्यालये, कॅटरर्स सर्व्हिस प्रोव्हायडर इत्यादींनी रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा अवांछीत ठिकाणी कचरा टाकणे | रु. १०००/— |
| ९ | विना परवानगी शहरात जाहिरातीचे फलक,बॅनर, होर्डींग इत्यादी सार्वजनिक, खाजगी जागा, विद्युत खांब, वृक्ष, कंपाऊड वॉल, पूल इत्यादी ठिकाणी लावणे. | The Outdoor Advertising Policy, Nagpur 2001 नुसार कार्यवाही करणे. |
| १० | वाहतुकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तीक कामाकरीता बंद करणे | यासंदर्भात विविध उत्सवाच्या/ समारंभाच्या वेळी सार्वजनिक रस्त्यांवर किंवा पादचारी मार्गावर उभारण्यात येणाऱ्या तात्पुरत्या स्वरुपाचे मंडप—मंच—स्वागतद्वार—कमानी इत्यादींना परवानगी देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या मनपाच्या धोरणा नुसार कार्यवाही करणे. |
| ११ | सार्वजनिक ठिकाणी रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा अवांछीत ठिकाणी जनावरे बांधणे | रु. ५००/— |
| १२ | रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा अवांछीत ठिकाणी वाहने/जनावरे धुवून परिसर अस्वच्छ करणे. | रु. ५००/— |

| | | |
|---|---|---|
| १३ | चिकन सेंटर, मटन विक्रेते यांनी त्यांचा कचरा रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा अवांछीत ठिकाणी टाकणे | रु. ५००/— |
| १४ | वैद्यकिय व्यवसायिकांनी बॉयोमेडीकल वेस्ट सर्वसाधारण कच—यात टाकणे | Bio-Medical waste (Management and handling) Rules-1998 अंतर्गतकार्यवाही करणे. |
| १५ | वर्कशॉप, गॅरेजेस व इतर दुरुस्तीचे व्यवसायीकांने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा अवांछीत ठिकाणी कचरा टाकणे | रु. ५००/— |
| १६ | ५० मायक्रॉन पेक्षा कमी जाडीच्या प्लास्टीक कॅरीबॅग निर्माते, विक्री करणारे, स्टॉक करणारे इत्यादी | महाराष्ट्र अविघटनशिल कचरा नियंत्रण अधिनियम २००६नुसार कार्यवाही |
| | अ) फुटपाथ, पथारी टाकून, हातगाडीवर व्यवसाय करणारे अत्यंत लहान/ किरकोळ विक्रेते | रु. २००/— |
| | ब) पक्के बांधकाम/दुकान असलेले व्यवसायीक | रु. १०००/— |
| १७ | सार्वजनिक ठिकाणी, रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा इत्यादी ठिकाणी विना परवानगी बांधकाम साहीत्य (Construction Material) साठवणे. प्रथम ४८ तासात हटविण्याची नोटीस देवुन न हटविल्यास | **व्यक्ती**— रु. १०००/— प्रति दिन<br>**बिल्डर**— रु. ५०००/— प्रति दिन |
| १८ | सार्वजनिक ठिकाणी, रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा इत्यादी ठिकाणी बांधकामाचा मलबा/टाकावू कचरा टाकणे/ साठवणे. प्रथम ४८ तासात हटविण्याची नोटीस देवुन न हटविल्यास | **व्यक्ती**— बांधकामाचा मलबा/ टाकावू कचरा उचलण्याकरीता येणारा प्रत्यक्ष खर्च + खर्चाच्या ५० टक्के प्रशासकीय शुल्क वसुल करणे<br>**बिल्डर**— बांधकामाचा मलबा/टाकावू कचरा उचलण्याकरीता येणारा प्रत्यक्ष खर्च + खर्चाच्या |

| | | |
|---|---|---|
| | | १०० टक्के प्रशासकीय शुल्क वसुल करणे |
| १९ | उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव (व्यक्ती) | रु. १००/— |
| | उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव (संस्था) | रु. ५००/— |

वर नमूद पैकी संस्था, दुकाने, गॅरेजेस, दुरुस्ती केंद्रे, मॉल, हॉस्पीटल इत्यादींना (म्हणजेच नागरीक व्यक्ती आणि अगदी लहान पथारी वाले, उघडयावर व्यवसाय करणारे, फेरीवाले, स्वयंमचलित वाहनाद्वारे व्यवसाय न करणारे वगळता) प्रथम वेळीस तक्त्यातील दर आकारले जातील, दुस—या वेळी दुप्पट, तिस—या वेळी तिप्पट दर व चौथ्या वेळे पासून पाचपट दंड आकारला जाईल.

श्री.नरेंद्र उर्फ बाल्या बोरकर :—मा. महापौरजी, हा विषय जो आणला आहे कोणत्या विभागाकडून आणि कोणते अधिका—याने आणला आहे ती माहिती दयावी.

महापौरः— प्रशासनाने माहिती दयावी.

श्री.सोनवणे(अपर आयुक्त)ः—मा.महापौरजी महोदया, घनकचरा व्यवस्थापन आणि हाताळणे अंतर्गत तरतुदी नुसार घनकच—याची विल्हेवाट लावण्यासाठी घनकचरा निर्माण करणारे नागरिक, आस्थापना, दुकाने, कारखाने त्याचप्रमाणे घनकच—याची शास्त्रोक्त पध्दतीने व्यवस्थापन करण्याची जबाबदारी असणारी महानगरपालिका यासाठी सगळया तरतूदी आहे. त्या नियमामध्ये आहे. त्यानुसार आपण सेग्रीगेशन ॲक्ट सोर्स सुरू केले. त्याच पध्दतीने धनकच—याची शास्त्रोक्त पध्दतीने साठवणूक करून वाहतूक करणे आणि शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करून विल्हेवाट लावणे. यासाठी प्रयत्न महानगरपालिका प्रशासनाकडून सुरू आहे. त्यामध्ये मोठया प्रमाणात एक गोष्ट लक्षात येते घनकचरा निर्माण करणारे नागरिक किंवा जे आस्थापना कारखाने आहेत ते कचरा रस्त्यावरती किंचा रस्त्यांच्या कडेच्या गटरामध्ये, नाल्यामध्ये, नदयामध्ये टाकून देतात. यापूर्वी त्यामध्ये दंड करण्याची तरतूद नव्हती. घनकचरा व्यवस्थापन आणि हाताळणे तरतूदी अंतर्गत 2016 नियम 15 प्रमाणे आपल्याला उपविधीप्रमाणे दंड आकारता येईल त्याप्रमाणे उपविधीमध्ये तरतूदीही केल्या आहेत. परंतु जोपर्यंत उपविधी तयार करीत नाही तोपर्यंत या सभागृहाच्या मार्फत दोन गोष्टी करणे आवश्यक आहेत. एक उपद्रव निर्माण करणा—या व्यक्ति आहेत त्यांचा शोध घेण्यासाठी न्युसन्स स्कॉड स्थापन करणे आणि हे स्कॉड स्थापन करण्यासाठी माजी सैनिक नियुक्त करण्यासाठी एक प्रस्ताव आहे त्यासाठी मान्यता मिळण्यासाठी हा एक प्रस्ताव आहे. त्याचबरोबर उपद्रव निर्माण करणारे जे उपद्रवी आहेत, रस्ता विना परवानगीने खोदणे, इतर प्रकारचे जे उपद्रव आहेत. उपद्रव निर्माण करणा—या व्यक्तिला आळा बसावा आणि स्वच्छ व सुंदर शहर व्हावे यासाठी या सभागृहासमोर निर्णयासाठी विषय ठेवलेला आहे.

श्री. नरेंद्र उर्फ बाल्या बोरकरः—मा. महापौरजी, विषय क्र 42 मध्ये जो ढोबळमानाने जो खर्च अपेक्षित केला आहे.11X30,000=3,30000, 40X24000=9,60000, 11X40,000=4,40000, 31X40=3,30000 आणि 5131X40=25,555 असा एकुण वार्षिक खर्च 2,10,66,000 खर्च येईल. महानगरपालिकेमध्ये आपल्या येथे सेक्युरेटी गार्ड एजन्सी आहे त्या एजन्सीच्या गार्डला किती

| |
|---|
| मानधन देतो. आणि ज्या टॅक्सी लागलेल्या आहेत त्यांना किती मानधन देतो. |
| श्री.सुनिल अग्रवालः—मा.महापौरजी, एक जानकारी मै चाहूँगा, इसका टाईम पिरेड क्या रहेगा । |
| श्री. नरेंद्र उर्फ बाल्या बोरकरः—मा. महापौरजी, अपने यहां पर जो सेक्युरिटी गार्ड है उसका पगार कितना है । |
| श्री.धामेचा(सहा.आयुक्त.साप्रवि):—मा.महापौरजी, सेक्युरिटी गार्ड का ॲक्चुअल तो नही लाया फिर भी सेक्युरिटी गार्ड का 21,200 के करीब मानधन है । |
| श्री. नरेंद्र उर्फ बाल्या बोरकर :— ॲक्च्युअल पगार कितना मिलता है । |
| श्री.धामेचा(सहा.आयुक्त.साप्रवि):—मा.महापौरजी, कट के 13 से 14 हजार मिलता होगा । |
| श्री.नरेंद्र उर्फ बाल्या बोरकरः— इन्होने इसमे 40 हजार रू. लगाया है । अपने यहां पर जो गाडीयां लगी है उसका कितना किराया लगता है । |
| श्री.धामेचा(सहा.आयुक्त.साप्रवि):—मा.महापौरजी, अपने यहां पर दो टाईप की गाडीया लगाई है। इंडीका और मारूती व्हॅन, इंडिका का किराया 24 हजार है आणि.मारूती व्हॅन का 28 से 30 हजार तक आता है । सॅटरडे संडे छोडके, सॅटरडे संडे युझ किया तो उसका 1000 रू. अलग से लगते है । |
| श्री. नरेंद्र उर्फ बाल्या बोरकर :—मा.महापौरजी, मा.आयुक्तजी हा प्रश्न नागपूर शहरासाठी चांगला प्रश्न आहे. लोकांना आळा घातला पाहिजे परंतु खर्च अपेक्षित दिला आहे. खर्चात काही दुरूस्ती करून हा विषय आपण मंजूर करावा. जे भाडे 500 रू.,1000 रू लावलेले आहे ते स्थायी समितीकडे मंजूरीसाठी पाठविण्यात यावे. |
| श्री.अविनाश ठाकरेः—मा.महापौरजी, या विषयाच्या अनुषंगाने काही प्रश्न आहे. या अगोदर महानगरपालिकेद्वारे माजी सैनिकाच्या माध्यमातून सेक्युरिटीची व्यवस्था केली होती काय? |
| श्री.सोनवणे(अपर आयुक्त):—मा.महापौरजी, माझ्या माहितीप्रमाणे अशा प्रकारचे सैनिकांच्या माध्यमातून न्युसन्स एस स्कॉड स्थापन करण्याचा प्रयत्न मा.चंद्रशेखर येथे आयुक्त असतांना झाला होता. त्याची निश्चित स्वरूपाची माहिती माझ्याकडे नाही. असा पूर्वीचा प्रयत्न लक्षात घेता या वर्षी आता नियमातील तरतूदी कठीण झाल्या आहेत. |
| श्री.अविनाश ठाकरेः—मा.महापौरजी, ही व्यवस्था कां बंद करण्यात आली. |
| श्री.सोनवणे(अपर आयुक्त):—मा.महापौरजी, ती कां बंद झाली याची सध्या तरी माझ्याकडे माहिती नाही. |
| श्री.संदीप जोशीः— मा. महापौरजी, यामध्ये बंद करण्याचे कारण काय हे जुने अधिकारी जाणतात पण सांगणार नाही. त्याचे कारण मी सांगतो यामध्ये नार्मल जी मानसिकता असते ती मानसिकता त्याही वेळी आली. सभागृहाने मंजूर केले सभागृहाची इंटेशन सांगतो, आयुक्तांनी मंजूर केले, आयुक्तांचे इंटेशन सांगतो. इंटेशन चांगले होते परंतु हे होत असतांना त्यामध्ये काही फ्री हॅन्ड दिल्या गेले. ज्या ज्या व्यवस्थेमध्ये ज्या ज्या गडबडी तयार होतात त्या याही व्यवस्थेमध्ये तयार झाल्या. दुर्देवाने कुठेतरी कच—यासाठी 500 रूपयाचा.दंड लागतो आहे मला 200 रू.दे नाही तर दंड ठोठावतो या पध्दतीच्या धमक्या आणि या प्रकारचे उपव्याध झाले आणि त्यामुळे ही संपुर्ण योजना त्यावेळेला बंद झाली. |
| श्री.अविनाश ठाकरेः—मा.महापौरजी, माझा दुसरा प्रश्न असा आहे. ही जी योजना आणतो आहे याचा कालावधी किती, ही परमानंट योजना आहे काय? |

| |
|---|
| श्री.सोनवणे(अपर आयुक्त):—मा.महापौरजी,प्रशासनाकडून याचा कालावधी निश्चित करण्यात आला नाही. परिणामकारक ठरले तर त्याचा कालावधी निश्चित करण्यात येईल. ही सुरूवातीला प्रायोगिक तत्वावर घेत आहोत. |
| श्री.सुनिल अग्रवालः— मा.महापौरजी, जे कर्मचारी रहेंगे उन पर कोई जबाबदारी फिक्स करने वाले है क्या ? |
| श्री.अविनाश ठाकरेः—मा.महापौरजी, याचा अगोदर प्रयोग झाला आहे. आणखी किती प्रयोग करणार आहे आणि किती दिवसासाठी करणार आहे. |
| श्री.सोनवणे(अपर आयुक्त):—मा.महापौरजी, प्रायोगिक तत्वावर किमान एक वर्ष राबविली जाईल. सभागृहाची परवानगी मिळाली तर 3 वर्षाकरिता किंवा 5 वर्षाकरिता सुध्दा राबविता येईल. अशा प्रकारची प्रभावी यंत्रणा निर्माण करणे ही काळाची गरज आहे. |
| श्री.अविनाश ठाकरेः—मा.महापौरजी, सव्वा दोन करोड रूपयाचा खर्च प्रस्तावित केला आहे. |
| श्री.कमलेश चौधरीः— मा.महापौरजी, सव्वा दो करोड रूपया खर्च कर रहे है तो कुछ कायटेरिया रखना चाहीये की इतना वसुली महिने मे होनी चाहिये । |
| श्री.अविनाश ठाकरेः—मा.महापौरजी, सव्वा दोन करोड रूपयाची एवढी मोठी रक्कम ट्रायल बेसिसवर घेत आहेत. |
| श्री.मनोज सांगोळेः—मा.महापौरजी, कठोरतेने नागपूर शहर सुधारावयाचे असेल तर खुप चांगला विषय आहे. त्याचा काय परिणाम होणार आहे हेही दिसून येईल. याला मंजूर केले पाहिजे. याच्याकरिता निधी पाहिजे तर आमच्या वार्ड फंडातून आम्ही निधी देण्यास तयार आहोत. |
| श्री.अविनाश ठाकरेः—पाईंट ऑफ इन्फोमेशन, मा.महापौरजी, नागपूर शहर यादीमध्ये 137क्रमांकावर गेले याची तर वारंवारं चर्चा होत आहे. ही यादी कुठल्या नार्म्समध्ये दिल्या गेली. तिस—या क्रमांकावर जो विषय आहे त्याची प्रशासनाने योग्यरित्या अंमलबजावणी न केल्यामुळे शहराचे नाव खराब होत आहे(बेल) |
| श्री.प्रकाश भोयरः— मा.महापौरजी, हा विषय फार सुंदर आहे. या शहरात जर कडक नियम लागले नाही तर फार मोठी वाईट परिस्थिती निर्माण होवू शकते. स्थिती अशी आहे. सव्वा कोटी रूपये खर्च होत असेल तर दहा झोन आहेत जे पथक राहणार आहे त्यांच्यावर जबाबदारी फिक्स करून दयावी. पथकाच्या माध्यमातून उत्पन्न झाले पाहिजे. जबाबदारी फिक्स झाली तर ते त्यांच्या जबाबदारीने काम करतील. 2 कोटीवर 30 लक्ष रूपयाची जबाबदारी फिक्स करण्यात यावी आणि हा विषय मंजूर करावा. |
| श्री.अविनाश ठाकरेः—मा.महापौरजी,विषयाबद्दल आमचे काही म्हणणे नाही. इम्प्लीमेंट नीट झाली पाहिजे याच्यावरती आमचे म्हणणे आहे. |
| श्री.संदीप सहारेः—मा.महापौरजी, विषय चांगला आहे. आम्ही आपल्या नागपूर शहरासाठी विकासासाठी मग तो सिमेंट रस्त्याचा प्रश्न असो, परिवहनाचा प्रश्न असो, आम्ही अनेकदा सल्लागार नेमले आहे. परिवहनसाठी सल्लागार नेमले परिवहनचे आजपर्यंत काम झाले नाही. कनकने घोटाळा केला ते मी प्रुफ करून दिले, करोडो रूपये त्याच्यात गेले. स्वच्छतेकरिता जर चांगले काम करीत असतील तर काही ना काही तर रिझल्ट येईल.बाळ जन्माला आल्या आल्या बाळ हिरो बनेल की बदमाश बनेल हे आता ठरविण्यात काय अर्थ आहे. बाळाला जन्म तर घेवू दया. प्रशासनाने चांगली योजना आणली आहे. एक त्यांना अवधी दया. त्यांनी चांगले |

| |
|---|
| काम केले नाही तर त्याच्यानंतर काय करायचे ते ठरवावे. |
| श्री.विरेंद्र कुकरेजाः– पाईंट ऑफ आर्डर, एक बहोत अच्छा विषय यहां पर आया है। नागपूर शहर के अंदर स्वच्छ नागपूर सुंदर नागपूर का काम होना चाहिये। स्वच्छता के अंदर हम बहोत पीछे हो गये है । मेरी सुचना है, दस झोन मे निगरानी के लिए एक–एक अधिकारी रखने चाहिये । अधिकारीयों की संख्या बढनी चाहिये और इस मे अच्छी तरह से इम्प्लीमेंट होना चाहिये। |
| श्री. जितेंद्र घोडेस्वारः– मा.महापौरजी, विषय अतिशय चांगला आहे. लोक नागपूर शहरात घर बांधत असतांना मलबा रस्त्याच्या कडेला टाकतात. नगरसेवक प्रभागात फिरत असतात संबंध प्रस्तावित होत असता. तो मलबा उचलण्यासाठी नगरसेवकांना सुचित करतात. जर मलबा उचलण्यासाठी आम्ही सुचना केली किंवा प्रशासनाच्या नोटीस दिली तर ते आमच्या संदर्भात उलझने पैदा करतात. प्रशासनाने माती उचलली नाही तर नगरसेवकांना त्याकरिता दोष देतात. 1990 मध्ये आमची मुंबई चांगली मुंबई अशा प्रकारचा प्रयोग करण्यात आला. अनेक कलाकरांना इन्वॉल करून त्यांचा प्रपोगंडा करण्यात आला. जे कुणी लोक रस्त्यावर चालतांना थुंकतात त्याकरिता एनजीओला कामावर लावण्यात आले. आज चांगली मुंबई म्हणून सगळे जगभरचे लोक म्हणतात. प्रशासनाच्या माध्यमातून चांगला प्रस्ताव आहे. त्याच्यावरती योग्य नियंत्रण प्रशासन ठेवतील. या व्यवस्थापनासाठी जर खर्च येत असला तरी जो शुल्क आकारण्यात येईल त्यातून महापालिकेला आणि शासनाला उत्पन्न मिळेल. आमचे शहर सुंदर होईल असे मला वाटते. प्रशासनाने चांगला विषय आणला हा पास करण्यात यावा. |
| श्री.अभय गोटेकरः–मा.महापौरजी, याच्यामध्ये जे माजी सैनिक ठेवण्यात येणार आहे. त्याच्याऐवजी नागपूर शहरातील बेरोजगार अभियंता आहेत त्यांचा सुध्दा विचार करण्यात यावा. याच्यामध्ये जी झोनस्तरावर समिती गठीत होईल त्या समितीत त्या प्रभागातील सर्व नगरसेवक आणि सभापती आहेत त्या सर्व नगरसेवक आणि सभापतीला निगडीत ठेवायला पाहिजे त्यामुळे होणा–या कार्यावर वचक राहील आणि काम व्यवस्थित होईल अशी माझी सुचना आहे. |
| श्री.अविनाश ठाकरेः– मा.महापौरजी, या विषयाच्या संदर्भात आमचे काही वाईट मत नाही. विषयाची अंमलबजावणी होत नाही हा भाग आहे. या प्रस्तावात त्रुटया आहेत. दंड आकारणे आवश्यक राहील, अधिकार काय दिला आहे त्यांना. दंड आकारण्याचा अधिकार आपण त्या बाहेरच्या कर्मचा–याला देवू शकतो काय? वसुलीचा अधिकार त्याला राहील. अशाप्रकारच्या त्रुटया प्रस्तावात येतात. डायरेक्ट कार्यवाहीची सुचना केली. पहिल्यापहिल्या आपल्या कायदयाप्रमाणे त्याला एक संधी देण्याची तरतूद आहे. रस्त्यावर कुणी कचरा टाकत असेल तर त्याला चोवीस तासाची नोटीस दिली पाहिजे नाही केले तर मग दंडात्मक कार्यवाही केली पाहिजे. परंतु याच्यात डायरेक्ट कार्यवाही करण्यास म्हटले आहे. याचे परिणाम गेल्या दहा वर्षाअगोदर नगरसेवकांनी भोगले आहे. सभागृहाच्या माध्यमातून तो विषय नगरसेवकाच्या माध्यमातून ती व्यवस्था करण्यात आली होती. या अधिका–यांची एक आचारसंहिता असावी. अधिका–याने कशा प्रकारे काम करावे, दंड कसा आकारावा, कसे वागावे याची आचारसंहिता असली पाहिजे. त्या आचारसंहितेची माहिती संपुर्ण नगरसेवकांना असावी. याच्यानंतर त्याच्या आचारसंहितेत त्यांनी निश्चित करून काम केले नाही तर त्यांचे बडतर्फीचे अधिकार सुध्दा असायला पाहिजे. या उद्देशाने विचार करण्याची सुध्दा आवश्यकता |

| |
|---|
| आहे. दुसरा विषय आहे, ही जी दरसुची आहे. ही महानगरपालिकेच्या दरसुचीमध्ये संमेलित केली पाहिजे. आज आपण जर मंजूर केले तर उद्या कुणीही कोर्टात जाईल. या दरसुचीला स्थायी समितीची मंजूरी घ्यावी. या प्रस्तावातील त्रुटया दूर करण्यात याव्यात, या सूचनेसहित हा विषय मंजूर करावा. |
| श्री.जितेंद्र कुकडे –मा.महापौरजी, मा.सत्तापक्ष नेते यांनी एक विषय सुचविला आपल्याकडे ती योजना चालविण्यात आली नाही ती बंद केली. यावर उत्तर देण्यात आले होते की प्रायोगिक तत्वावर चालविण्यात आली होती. मा.सत्तापक्ष नेत्याने चांगली सुचना सुचविली मी त्यांच्या बरोबर आहे. योजना राबवितांना 50 रू. घ्यावयाचे आहे आणि आपण त्याला 10 रू. निपटविले तर ही योजना सक्सेस होणार नाही. |
| श्री.संदीप जोशीः– मा.महापौरजी, या विषयावर अनेक ठिकाणी चांगल्या सुचना मा. सदस्यांनी केल्या आहेत. ते करीत असतांना माझी सभागृहाला आपल्या मार्फत विनंती आहे. आपण ज्या सुचना दिलेल्या आहेत. सदस्याचे काही बाबतीत मतभेद आहेत. आपण एक झोनमध्ये एक पथक सुचविलेले आहे. एक पथकामध्ये चार–पाच मंडळी ठेवलेली आहेत. ज्यावेळी कुठे एका झोनमध्ये चार प्रभाग असतील तर कुठे एका झोनमध्ये पाच प्रभाग असतील किंवा तीन प्रभाग असतील. संपुर्ण प्रभागात एक पथक एकत्र फिरणे अत्यंत कठीण आहे. एका वेळी अनेक ठिकाणी ते लक्ष ठेवू शकणार नाही माझी सुचना आहे. ज्या पध्दतीने जुन्या काळात होते त्याच पध्दतीने एका प्रभागात चार नगरसेवक असतात त्या प्रमाणे चार आणि ज्या प्रभागात तीन असतील त्यामध्ये तीन याप्रमाणे 151 सुरक्षा रक्षक ठेवण्यात यावे. 151 सुरक्षा रक्षक ठेवल्यानतर त्या ठिकाणी प्रत्येक झोनला एक सुपरवायजर ठेवण्यात यावे. आणि दहाही सुपरवायरजरच्या वरती एक केंद्रीय कार्यालयाशी अटॅाचमध्ये कार्यकारी अधिकारी एक असावा. संपुर्ण सभागृहाचा हा मानस आहे की यामध्ये ज्या जुन्या गडबडी झाल्या त्या होवू नये म्हणून याच्यामध्ये इलेक्ट्रानिक्स व्दारे यामध्ये काही करता येईल जसे स्टार बसमध्ये जी मशीन वापरली जाते तसे काही मशीनचा वापर करता येईल काय? ई–गर्व्हनस्मध्ये ताबडतोब फोटो काढून जसाचा तसा फोटो ई–गर्व्हनस्च्या केंद्रीय कार्यालयाशी जोडता येईल काय? या पध्दतीची रचना यामध्ये केली पाहिजे. हे होत असतांना अनेक सेवाभावी संस्था, जेष्ठ नागरिक, तरूण हेबघत असतात त्यांना प्रचंड चीड की लोक रस्त्यावर थुंकतात. काही खर्रा खाऊन थुंकणारे लोक असतील त्यांनी जर फोटो काढून जर याच्यामध्ये टाकले तर त्याच्यावर कार्यवाही करण्याचा अधिकार आपण याच्यामध्ये देणार आहोत काय? या संपुर्ण योजनेचा अंतर्भाव त्यांनी केला पाहिजे. दुसरी गोष्ट आपल्याला सभागृहाच्या माध्यमातून आपल्याला नम्र विनंती आहे. |
| श्री.जगदीश ग्वालबंशीः–मा.महापौरजी,नाले मे कचरा डाला जा रहा है । कुंऐ मे कचरा डाला जा रहा है । पीने के पानी के कुंऐ मे कचरा डाला जा रहा है । इसमे कॅटगिरी दर्शाते हुये कुंऐ का वर्णन नही किया गया है । |
| श्री.संदीप जोशीः– मा.महापौरजी, यामध्ये जी जगदीशजींनी जी सुचना दिली आहे. नाल्याचे वर्गीकरण करणे, विहिरींचे वर्गीकरण करुन त्याचा देखील अंतर्भाव यामध्ये करण्यात यावा, त्याचप्रमाणे सन्मानणीय श्री.अविनाशजी ठाकरे यांनी या ठिकाणी सांगितले की भरतीची प्रक्रीया ही आपण तात्काळ सुरु करणे अत्यंत आवश्यक आहे. संपुर्ण सभागृहाचा मानस आहे की हे सुरु केले पाहिजे, त्यामुळे महिन्याभराच्या कालावधीमध्ये भरतीची प्रक्रीयेला आपण पुर्ण |

केली पाहिजे परंतु हे होत असतांना शास्तीच्या दंडाचे जे दर आहे त्याला मंजुरी मा.स्थायी समिती कडुन घेतली पाहिजे, यामध्ये करामध्ये चेंजेस करायचे असतील तो पर्यत स्थायी समिती कडुन घेतले पाहिजे परंतु बाकी भरती एक महिन्याच्या कालावधी मध्ये आपण पुर्ण केली पाहिजे. या सुचनेसह हा संपुर्ण विषय मंजुर आणि एक वर्षाकरिता अपॉईंट करण्याचे अधिकार तसेही स्थायी समितीकडे आहे. त्यामुळे 1 वर्षाकरिता तात्पुरता अपॉइंट करु त्यानंतर प्रायोगिक तत्वावर 1 वर्षानंतर संपुर्णरित्या त्यावर निर्णय करु.

श्री.प्रफुल गुडधे :– मा.महापौरजी,या विषयावर विस्तृत भाष्य केले प्रत्येक प्रभागामध्ये 4/4 कर्मचारी नेमणार आहे आणि ते संपुर्ण कर्मचारी हे माजी सैनिकामधुन नेमले पाहिजे ही सुचना यामध्ये अंतर्भुत करण्यात यावी. शेवटच्या तक्तावर प्रथम वेळेस, चौथ्या वेळेस दुप्पट दर पाचव्या वेळेस तिप्पट दर सहाव्या वेळेस चौपट दर म्हणजे दुस–यांदा त्यांनी चुक केली तिस–यांदा त्यांनी चुक केली हे निश्चित करण्याची सिस्टीम आपल्याकडे काय आहे हे पण निर्धारित करावे लागेल, हे निर्धारित केले नाही तर त्याचा दुरुपयोग करण्याची शक्यता मोठया प्रमाणावर राहील. म्हणुन दुप्पट, तिप्पट, चौपट हे रद्द करुन फक्त एकपट त्याला सातत्याने त्याला दंड मिळावा.

श्री.संदीप जोशीः– मा.महापौरजी, श्री.प्रफुल गुडधे यांची अत्यंत चांगली सुचना आहे दुप्पट, तिप्पट, चौपट न करता जे स्थायी समिती ठरवेल त्याप्रमाणे दराची रचना करण्यात यावी. यामध्ये 12 महिन्यासाठी टोटल देणार असु कुठल्याही कर्मचा–याला 6 महिन्याच्या वरच्या कालावधी साठी ठेवण्यात येवु नये त्याची बदली 6 महिन्यानंतर दुस–या ठिकाणी करण्यात यावी.

वरील चर्चेनंतर उपरोक्त प्रस्ताव सभागृहाने विचारात घेऊन प्रत्येक प्रभागनिहाय सुरक्षा रक्षकाची एकुण संख्या १५१ सुरक्षा रक्षक ठेवण्यात यावे. त्याचप्रमाणे प्रत्येक झोनकरिता एक सुपरवायजर राहील. या सर्वांवर नियंत्रण व देखरेखीकरीता विशेष कार्याधिकारी (एक) राहील. त्याचेवर नियंत्रण उपायुक्त दर्जाचा अधिकारी ठेवील व ही संपुर्ण व्यवस्था अति.आयुक्त (आरोग्य ) यांचे माताहत कार्यरत राहील. भरतीची प्रक्रिया ही महिनाभराच्या आत पुर्ण करण्यात यावी. शास्ती/दंड दराची निश्चिती आणि त्याचे विनिमयन ठरविण्याकरिता स्थायी समितीची मंजूरी घेण्यात यावी. त्याचप्रमाणे झोनमध्ये येणा–या तक्रारी व महानगरपालिकेच्या ॲपवरील तक्रारीचा अंतर्भाव करून तात्काळ कार्यवाही करण्यात यावी तसेच नियुक्त पथकातील कर्मचा–यांना ६ महिन्यानंतर कार्यरत झोनमध्ये ठेवण्यात येणार नाही याची प्रशासनाने दखल घ्यावी. त्याचप्रमाणे प्रस्तावात नमुद दुप्पट, तिप्पट, चौपट अशाप्रकारची दंड आकारणी न करता संबंधिताकडून रोज दंडाची एकाच ठरलेल्या दरानी आकारणी करण्यात यावी. या तसेच ही भरती माजी सैनिकांमधूनच करण्यात यावी. मा.सत्तापक्ष नेते श्री.संदीप जोशी, मा.सदस्य श्री.प्रविण दटके, मा.सदस्य श्री.प्रफुल्ल गुडधे यांनी केलेल्या सुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येतो. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्रमांक 54 :–** विकास योजना नागपूर.

मौजा – इंदोरा, खसरा क्र. 29, 30, 31/1–2–3, 32/4, 33 मधील मॅटरनिटी होम, डिस्पेन्सरी, प्राथमिक शाळा व माध्यमिक शाळा करीता नामनिर्देशित असलेल्या अंदाजित क्षेत्र – 18644.10 चौ.मी. या

जागेवर समाजभवन बांधणेकरीता महराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 विकास योजनेत जागेच्या वापरात फेरबदल करणेबाबत.

महराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे तरतुदी नुसार नागपूर शहराकरीता तयार करण्यात आलेली सुधारीत विकास योजना महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाची अधिसुचना क्र. टिपीएस–2496–2643–प्र.क्र.300(अ)–97–नवि–9 दि. 07.01.2000 अन्वये भागशः मंजुर झाली असून ती दि. 01.03.2000 पासून अमंलात आली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसुचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस–2400–1628–सी.आर.–200–नवि–9 दि. 10.09. 2001 अन्वये मंजुर झाली असून ती दि. 21.09.2001 पासून अमंलात आलेली आहे. तसेच शासनाचे नगर विकास विभागाचे अधिसुचना क्र. टिपीएस–2401–855–प्र.क्र.–76/नवि–9 दि. 27.02.2002 अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या क्षेत्रांतर्गत सात योजनांचे क्षेत्र वगळुन उर्वरित नागपूर शहराकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे.

मौजा – इंदोरा, खसरा क्र. 29, 30, 31/1–2–3, 32/4, 33 मधील नागपूर शहराच्या मंजुर विकास योजनेनुसार सार्वजनिक – निमसार्वजनिक झोन अंतर्गत मॅटरनिटी होम, डिस्पेन्सरी, प्राथमिक शाळा व माध्यमिक शाळाकरीता नामनिर्देशित असलेली जागा अंदाजित एकंदरीत क्षेत्र – 18,644.10 चौ.मी. या जागेवर समाजभवन (Community Centre) बांधण्याचे नागपूर सुधार प्रन्यासद्वारा प्रस्तावित असून, हि जागा नागपूर सुधार प्रन्यासच्या मालकीची आहे.

उपरोक्तप्रमाणे नमुद मॅटरनिटी होम, डिस्पेन्सरी, प्राथमिक शाळा व माध्यमिक शाळेकरीता नामनिर्देशित असलेल्या जागेच्या वापरात बदल करुन उक्त जागा सार्वजनिक – निमसार्वजनिक झोन अंतर्गत समाजभवन (Community Centre) या वापराकरीता आरक्षित करण्यास्तव महराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अंतर्गत फेरबदलासंबंधी संपुर्ण संवैधानिक कार्यवाही महानगरपालिकेतर्फे केल्यानंतर उक्त आरक्षण विकास योजनेत समाविष्ठ करण्यासाठी शासनाच्या मान्यतेकरीता पाठविण्यात येईल. सदर प्रस्तावास म.न.पा. सभागृहाची मान्यता प्राप्त झाल्यास सदर जागेच्या फेरबदलाची अधिसुचना शासन राजपत्रात व दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द् करून त्यावरील आक्षेप / हरकतींवर योग्य निर्णय घेवुन प्रस्ताव शासनास मंजुरीस्तव सादर करण्याकरीता मा. आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांना अधिकार प्रदान करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवुन मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

<u>**ठराव कमांक 55**</u> :– मौजा–नागपूर खसरा क्र. 338 मधील नागपूर सुधार प्रन्यासच्या मालकीची आराजी–39600.00 चौ. फुटाची जागा अखिल कुणबी समाज चिटणीसपुरा यांना 1978 मध्ये नागपूर सुधार प्रन्यासद्वारे सार्वजनिक उपयोगाकरिता भाडेपट्टयावर दिलेली आहे. संस्थेला वाटप केलेली 0.3678 हेक्टर जागा लगतच विद्यमान एम.

| |
|---|
| ई.सी.बी. च्या जागेसह (एकूण 1.0728 हेक्टर) एम.ई.सी.बी. करीता खसरा क्र. 337(P), 338(P) या जागेवर आरक्षण क्र. सी.–10 अन्वये आरक्षित करण्यात आली. या आरक्षित जागेपैकी उत्तरेकडील 0.3678 हेक्टर जागेचे आरक्षण एम.ई.सी.बी. मधून वगळून ''सार्वजनिक व निमसार्वजनिक'' असा फेरबदल करण्याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदलाची कार्यवाही करण्याबाबत तसेच या कलमा अंतर्गत फेरबदलाची कार्यवाही करुन प्रस्ताव शासनास सादर करण्यास मा. आयुक्त, महानगरपालिका यांना अधिकार देण्याबाबतचा म.न.पा. सभागृहाने मंजुरीकरिता चर्चा करुन निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून विद्यमान एम.एस.ई.बी. कार्यालयाच्या आणि पूर्वेकडील रतन कॉलनीच्या पब्लिक युटीलिटी अंतर्गत दर्शविलेल्या जागेच्या मधील जागा एम.एस.ई.बी.च्या विस्ताराकरिता दर्शविली आहे. ती जागा सुध्दा आरक्षणातून वगळून निवासी विभागात दर्शविणे. ती जागा रतन कॉलनीच्या मैदानाकरिता वापरात आहे या मा.सदस्य श्री.प्रविण दटके यांनी केलेली सुचना व मा.सदस्य श्री.अविनाश ठाकरे व मा.सदस्या श्रीमती विशाखाताई मोहोड यांनी सादर केलेली मौजा सोमलवाडा खसरा क्र 84/5, घरकुल को.ऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटी व खसरा क्र 84/3 पितृछाया को.ऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटी मधील सी.जी.ॲन्ड बी.जी.(एमएस –134 ) चे आरक्षण सी.जी.ॲन्ड बी.जी.मधून वगळून सार्वजनिक असा फेरबदल करण्याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 1966चे कलम 39 अन्वये फेरबदलाची कार्यवाही करण्याबाबत तसेच या कलमा अंतर्गत फेरबदलाची कार्यवाही करून प्रस्ताव शासनास सादर करण्यास मा. आयुक्त महानगरपालिका यांना अधिकार देण्याबाबत दिलेल्या लिखीत सुचनेसह हा विषय मंजूर करण्यात यावा या मा.सत्तापक्ष नेते श्री.संदीपजी जोशी यांनी केलेल्या सुचनेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.<br>श्री.प्रविण दटके:–मा.महापौरजी, एम.एस.ई.बी. कार्यालयाच्या आणि पूर्वेकडील रतन कॉलनीच्या पब्लिक युटीलिटी अंतर्गत दर्शविलेल्या जागेच्या मधील जागा एम.एस.ई.बी.च्या विस्ताराकरिता दर्शविली आहे. ती जागा रतन कॉलनीच्या मैदानाकरिता वापरीत आहे. ती जागा आरक्षणातून वगळून निवासी भागात दर्शविण्यात यावी. |
| अविनाश ठाकरे :– मा.महापौरजी,या विषयाच्या संलग्न असा एक प्रश्न आहे की गुंठेवारी कायद्याअंतर्गत सेक्शन 37 चे अधिकार नागपूर सुधार प्रन्यासला आहे की, नागपूर महानगरपालिकेला आहे. |
| श्रीमती थुल (सहा.संचालक नगररचना) :– मा.महापौरजी, 2002 च्या शासन परिपत्रकानुसार गुंठेवारी कायद्याकरिता नियोजन प्राधिकरण म्हणुन नागपूर सुधार प्रन्यास आहे. |
| श्री.अविनाश ठाकरे :– मा.महापौरजी, माझ्या प्रभागात सी.जी.डी.जी. चे एक आरक्षण आहे. त्या आरक्षणाचा टेबल सर्व्हे झालेला आहे आणि त्या ठिकाणी 60 टक्के घरे आहे. मी नागपूर सुधार प्रन्यासला प्रस्ताव दिला होता की यांचे आरक्षण डि–रिझर्व करावे, पण नागपुर सुधार प्रन्यासनी दि. 18/09/2016 ला नागपूर महानगरपालिकेला पत्र पाठविले आणि त्याची शेवटीची लाईन मी वाचतो, सी.जी ॲण्ड डी.जी. सेक्शन 134 या आरक्षणाखाली समुचित विकास प्राधिकरण असल्यामुळे उक्त आरक्षण वगळण्याबाबत महानगरपालिकेला हरकत नसेल तर उक्त आरक्षण वगळण्याबाबत एम.आर.टी.पी. कायदा 1966 च्या कलम 37 अन्वये आरक्षण बदलाची कार्यवाही आपल्या कार्यालयाव्दारे करणे अपेक्षीत आहे. मा.महापौरजी असे अनेक |

| |
|---|
| आरक्षण आहे जे एन.आय.टी.ला डि–रिझर्व करायचे आहे, पण एन.आय.टी अशा प्रकारचे प्रश्न नागपूर महानगरपालिकेकडे पाठवुन हे विषय प्रलंबित ठेवत आहे. माझी आपणाला विनंती आहे सभागृहाच्या मार्फेत आपण नागपूर सुधार प्रन्यासला स्पष्ट निर्देश दयावे, पत्र पाठवावे की या आरक्षणाचे डि–रिझर्वेशनचे अधिकार त्यांचे आहे त्यांनी ताबडतोब ज्या ठिकाणी 50 टक्यापेक्षा जास्त घरे झाले असतील ते आरक्षण ताबडतोब हटवावे आणि तेथील नागरिकांना होणा–या त्रासापासुन त्यांची मुक्तता करावी अशाप्रकारची सभागृहाचा मानस नागपूर सुधार प्रन्यासला आपल्या माध्यमातुन कळविण्यात यावा हीच आपल्याला विनंती आहे. |
| <u>ठराव कमांक 56</u> :– नागपूर शहरातील श्रद्धास्थान असलेल्या श्री. गणेश मंदीर टेकडीच्या दर्शनार्थ जाणाऱ्या भाविकांना त्याचप्रमाणे रेल्वे स्थानकावर ये/जा करणाऱ्या प्रवासांकरिता पूर्व–पश्चिम नागपूर जोडणाऱ्या रामझुला मार्गे जयस्तंभ चौकात येणाऱ्या वाहन चालकांना वाहतूक कोंडीचा करावा लागणारा सामना पाहता गणेश मंदीर टेकडी समोरील फ्लाय ओव्हर पाडण्याबाबत चर्चा करुन निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून मा.सदस्यांचा चर्चेचा मानस लक्षात घेता या पूलाची उपयोगिता व तांत्रिक बाबी प्रशासनाने तपासून परिपुर्ण प्रस्ताव सभागृहाच्या पटलावर ठेवावा या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली. |
| श्री.प्रफुल गुडधे :– मा.महापौरजी, विषय क्र 46 मध्ये सन्माननिय सदस्य श्री.प्रविणजी दटके यांनी ही सुचना दिली. वास्तविक पाहता जो फ्लाय ओव्हर आहे रेल्वेस्टेशन समोरचा तो तोडण्याची ही नोटीस आहे. आता ही तातडीची काही बाब नाही आणि नियम 1 अन्वये जी नोटीस दयावी लागते ते अत्यंत तातडीच्या बाबींच्या संदर्भात ती दयावी लागते. |
| श्री. प्रविण दटके :– मा.महापौरजी पॉइंट ऑफ इन्फॉरमेशन, तातडीची बाब कोणासाठी काय आहे, अनेक संस्था या बाबतीत अनेक ठिकाणी आंदोलन करित आहे. नागरिकांच्या सहया घेत आहे. मुळ मुद्या असा आहे की, चर्चा करुन निर्णय घ्यावा असे म्हणणे आहे, त्यामुळे तातडीची बाब कुणासाठी होवु शकते कोणासाठी नसु शकते हा वेगळा मुद्या आहे. भविष्यामध्ये तेथे रामझुलाचा दुसरा पार्ट तयार होत आहे, तेथे ट्राफिकची प्रचंड अडचण होत आहे. नागरिकांना रेल्वेस्टेशनवर जायला खुप त्रास होतो. टेकडी गणेश मंदीर तेथे आहे त्यामुळे तातडीची बाब त्यांच्यासाठी नसेल इतर नागरिकांसाठी असेल त्यामुळे हा माझा मुद्या नाही त्यामुळे यावर नीट टेक्नीकली चर्चा करुन त्यावर निर्णय घेण्यात यावा. |
| श्री.प्रफुल गुडधे :– मा.महापौरजी, सन्माननिय दटके साहेब या सभागृहाचे जेष्ठ सदस्य आहे आणि हा विषय आणण्याचा त्यांचा हा अधिकार आहे. तातडीची बाब यासाठी म्हणतो जर ती बाब तातडीची आहे तर सभागृहामध्ये रितसर प्रस्ताव प्रशासनाच्या माध्यमातुन पुर्ण सविस्तर प्रस्ताव येथे आणला असता तर बरे झाले असते चर्चा करायला हरकत नाही आणि मा. सदस्यांच्या इंटेशनवर आम्हाला आक्षेप नाही. |
| श्री.प्रविण दटके :– मा.महापौरजी मी म्हणतही नाही की माझ्या नोटीसला प्रस्ताव म्हणावे आणि तसे मला म्हणायचेही नाही. नियमानुसार प्रस्ताव आणला आहे चर्चा झाली तर योग्य प्रस्ताव होईल. |
| श्री.प्रफुल गुडधे :– मा.महापौरजी, या ठिकाणी हा जो उडाणपुल तोडण्यासंदर्भात जी चर्चा आहे तो उडाणपुल तोडण्याची गरज कुणाला वाटत आहे, त्यासंदर्भात प्रशासनाचे मत |

| |
|---|
| आपण जाणुन घेतले पाहिजे. कारण कोटयावधी रुपये जमा करुन हा आपण उडाणपुल तयार केला. तेथील काही लोकांची मागणी आहे काय, कशापध्दतीची मागणी आहे, त्यामुळे कुठला त्रास होत आहे. वाहतुकीला कोणत्या अडचण निर्माण होत आहे या संदर्भामध्ये प्रशासनाकडुन माहिती जाणुन घ्यावी तेथे आपण मोठया प्रमाणात दुकांनाचे आवंटन केले, दुकाने लावले, हॉटेल्स लावुन बसलेले आहे त्यांच्या व्यवसायाच्या संदर्भात, पुनर्वसणाच्या संदर्भात आपले काय निश्चित धोरण राहील ही मागणी कुणाची आहे आणि कोणाच्या मागणीवरुन हा प्रस्ताव आहे याची सुध्दा माहिती सन्माननिय सदस्यांनी सभागृहाला करुन दयावी. |
| श्री.प्रविण दटके :— मा.महापौरजी, हा पत्र जनआक्रोश संघटनेचे आहे त्याची प्रत मी तुम्हाला देतो, यात पुंडलीकराव जवंजाळ, अध्यक्ष, टेकडी गणेश मंदीर, श्रीराम कुळकर्णी त्याचे सचिव आहे, जनआक्रोशचे अध्यक्ष श्री.अनिल लद्दड, त्याचे सचिव आहे रविंद्र काचखेडीकर आहे त्यांचे एक पत्र मला प्राप्त झाले आहे यावर अनेक नागरिकांच्या सहया घेतल्या आहे. मा.डिव्हीजनल कमीश्नरला पण त्यांनी पत्र दिले आहे त्या पत्राची एक प्रत माझ्याकडे आहे. त्यामध्ये त्यांनी तयार केलेला अहवाल सुध्दा आहे. माझा कुठलाही दुराग्रह नाही मी म्हणतो म्हणुन तो पुल पाडा किंवा मी हा नोटीस आणला म्हणुन हा पुल पाडा माझे असे बिलकुल म्हणणे नाही. हा नोटीस मा.महापौरजी यांच्या माध्यमातुन सभागृहात आणण्याचा ऐवढाच उद्येश आहे की या बाबतीत अनेक तर्क वितर्क आहे. एखादया योग्य या जो बाबतीतला योग्य कंन्सलटंट असेल किंवा जाणकार माणुस असेल त्याची प्रशासनाने मदत घेवुन तेथील ट्राफिकचा त्रास गणपती मंदीर रेल्वेस्टेशन नविन होणारा रामझुला या सर्व गोष्टीचा निट अभ्यास करुन जर तो योग्य असेल तो प्रस्ताव रितसर आणावा या करिता नोटीस दिला आहे. माझा कुठलाही दुराग्रह नाही की याचा ठराव करा परंतु या बाबतीत चांगली चर्चा व्हावी तेथील दुकानदार असतील त्यांच्या नियमानुसार व महानगरपालिकेच्या कायद्यानुसार काय करता येईल तो विचार करावा यामध्ये कुठलेही दुमत नाही. पण याबाबतीत सांगोपांग चर्चा होवुन टेक्नीकल फिजीबिलीटी या सर्वाचा तपास करावा आणि चचेअंती आणि जे काही टेक्नीकल एक्सपर्ट लोक असतील त्यांचा विचारांअंती योग्य निर्णय घ्यावा या करिता मी नोटीस आणला आहे. |
| श्री.प्रफुल गुडधे :— मा.महापौरजी, सन्माननिय सदस्य श्री.प्रविणजी दटके यांनी जनआक्रोश नावाची या शहरातील संघटना आहे त्या संघटनेने पत्र दिले त्या पत्राच्या आधारावर त्यांनी नोटीस दिला आहे. मला असे वाटते की, त्यांची जी मागणी आहे त्यांची मागणी प्रशासनाने तपासण्याची आवश्यकता आहे. मागणी तपासुन घेतल्यानंतर त्याच्या फिलीबिलीटी बघुन या सभागृहाकडे यथायोग्य प्रस्ताव सादर करावा, या विनंतीसह हा प्रस्ताव प्रशासनाला परत करण्यात येते. |
| श्री.मनोज सांगोळे :—मा.महापौरजी, जर उडानपुल न तोडता भुयारी रस्ता तयार करता येतील काय आणि त्याला कुठेतरी वळण देता येईल काय या संदर्भात सुध्दा विचार करावा अशी माझी सुचना आहे. |
| <u>ठराव कमांक 57 :—</u> मौजा नागपूर, खसरा क्र. 615/2 या जागेवरील विकास योजनेतील "प्राथमिक शाळा (आ.क्र.—एमई—28)" आरक्षण म.प्रा. व न.र. अधिनियम 1966 चे कलम—37 अन्वये फेरबदल करुन खेळाचे मैदान या उपयोगात समाविष्ट करण्याकरीता सदर फेरबदलाची अधिसूचनावर प्राप्त आक्षेपा/हरकतीवर निर्णय घेवून |

शासनास प्रस्ताव मंजूरीकरीता सादर करण्याचे अधिकार आयुक्त महानगरपालिका नागपूर यांना प्रदान करण्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून यास सभागृहाने मान्यता प्रदान करावी या मा.सत्तापक्ष नेते श्री. संदीपजी जोशी यांनी केलेल्या सुचनेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्रमांक 58 :–** नागपूर महानगरपालिका निर्मित अंबाझरी ओव्हरफ्लो पॉइंट येथील स्वामी विवेकानंद स्मारकाचे संचालन व पुढील देखभाल स्वामी विवेकानंद विचारधारेशी जुळलेल्या रामकृष्ण मठ हया संस्थेस दहा वर्ष कालावधीसाठी देण्याकरीता सभागृहात चर्चा करून निर्णय घेण्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून स्थायी समितीने घेतलेल्या निर्णयानुसार स्मारक रामकृष्ण मठास हस्तांतरीत करण्यात यावे तसेच नागपूर महानगरपालिका व रेल्वे पोलीस यांच्या प्रयत्नाने सुरू असलेल्या प्लॅटफार्म ज्ञानमंदीर निवासी शाळा विश्व हिंदू जनकल्याण परिषद, विदर्भ हया संस्थेच्या सहकार्याने संचालित असून ही प्लॅटफार्म ज्ञानमंदीर निवासी शाळा 10 वर्षाकरिता या संस्थेला संचालन व देखभालीकरिता देण्यात यावी.या मा.सदस्य श्री.दयाशंकर तिवारी व मा.सत्तापक्ष नेते श्री.संदीपजी जोशी यांनी केलेली सुचना मंजूर करण्यात येते. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

श्री.दयाशंकर तिवारीः–मा.महापौरजी, स्थायी समितीने घेतलेल्या निर्णयानुसार स्मारक रामकृष्ण मठास हस्तांतरीत करण्यात यावे तसेच नागपूर महानगरपालिका व रेल्वे पोलीस यांच्या प्रयत्नाने सुरू असलेल्या प्लॅटफार्म ज्ञानमंदीर निवासी शाळा विश्व हिंदू जनकल्याण परिषद, विदर्भ हया संस्थेच्या सहकार्याने संचालित असून ही प्लॅटफार्म ज्ञानमंदीर निवासी शाळा 10 वर्षाकरिता या संस्थेला संचालन व देखभालीकरिता देण्यात यावी.

**ठराव क्रमांक 59 :–** नागपूर महानगरपालिकेचे रेशिमबाग येथील नवनिर्मित स्व. कविवर्य सुरेश भट सभागृहाच्या परिसरात कविवर्य सुरेश भट हयांचा अर्धाकृती पुतळा स्थापीत करण्याकरिता महानगरपालिकेच्या सभागृहात चर्चा करुन निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून यास एकमताने मान्यता प्रदान करण्यात यावी या मा.सत्तापक्ष नेते श्री.संदीपजी जोशी यांनी केलेली सुचना मंजूर करण्यात येते. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

यानंतर राष्ट्रगित होवून सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित करण्यांत आली.

**निगम सचिव**
**नागपूर महानगरपालिका,नागपूर**

**महापौर**
**नागपूर महानगरपालिका,नागपूर**

| |
|---|
| |